श्रमणारी लक्ष्मी

साने गुरुजी

श्रमणारी लक्ष्मी

साने गुरुजी

अभिनंदन प्रकाशन
कोल्हापूर

श्रमणारी लक्ष्मी / साने गुरुजी

अभिनंदन प्रकाशन

नवीन आवृत्ती २०११

© सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशिका – सौ. नेहा त्रिभुवननाथ जोशी
१४९५ 'बी', इंदुमती अपार्टमेंट, गुलाब गल्ली, मंगळवार पेठ,
कोल्हापूर – १२.
दूरध्वनी : (०२३१) ३२९६९०९, मो.: ९४२३०४१९६५

अक्षर जुळणी – वैभव ग्राफिक्स, कोल्हापूर.

मुद्रक – मयूर इंडस्ट्रीज.

किंमत – ७५/– रूपये

अभिवादन

गंगाधर जोगळेकर

नंदादीपापरि निमाला उजळुनि जीवन
गुरुजी तुमच्या अमरस्मृतीला हे अभिवादन ।
सह्यागिरीपरि कणखर होता तुमचा निश्चय
महोदधिपरि विशाल तुमचा सद्‌गुण संचय
शततीर्थांहुनि पावन होती तुमची वाणी
स्वतंत्रतेची स्तोत्रे झाली तुमची गाणी
शब्दाशब्दातून प्रकटले तुमचे स्पंदन.... गुरुजी तुमच्या ।।
धडपडणाऱ्या मुलांस दिधली तुम्ही प्रेरणा
तुम्ही उमलत्या रोपाची जाणिली कामना
तुम्हास कळली मातीचीही आर्त वेदना
अश्रूंची आमरण तुम्ही केलीत साधना
तुम्ही सुखवले अश्रूंतूल दलितांचे स्पंदन.... गुरुजी तुमच्या ।।
तुम्ही जाणिली सेवेमधली अपार शक्ती
तुम्ही जोडिल्या कर्मामधुनि चारी मुक्ती
तुमचे होते वेड जगाला सुखवायाचे
तुमचे होते वेड खगासम विहरायाचे
असीम तुमच्या आकांक्षांना नव्हते बंधन.... गुरुजी तुमच्या ।।
गुरुजी तुमचे मन मातेचे, स्वप्न कवीचे
हास्य मुलांचे, लास्य फुलांचे, सुख योग्याचे
दधीचीपरी तुम्ही त्यागिली नश्वर काया
मिळवाया जणु चिरंतनाची शाश्वत माया
योगसमाधित तुम्ही रंगला देह समर्पून.... गुरुजी तुमच्या ।।

प्रास्ताविक

लहानपणी साने गुरुजींनी दारिद्र्याचे दशावतार अनुभवले. दारिद्र्याचे ग्रहण लागले की, सुसंस्कृत जीवन लयाला जाते. समाजमनात विपरित गोष्टी रुजतात, वाढतात. लहानपणी याचा एक अत्यंत विदारक अनुभव त्यांना आला. त्यांच्या भावाला देवी आल्या. उष्णतेने गात्रांना ग्रासून टाकले. ही उष्णता कमी व्हावी म्हणून काहीतरी करणे भाग होते. गरिबाला गुलकंद कुठला मिळायला ! त्यांच्या आईने गूळ आणि कांदा यांचा पाक केला. गरिबीमुळे इतर भावंडांना त्याची वानगीदेखील देणे शक्य नव्हते. पण लहानग्यांना आशा असते. आईने समजून सांगितले. ''त्याला देवी आल्या म्हणून कांदेपाक.'' इतरांनी ती माऊली कसा देणार ? मग तो भाऊ म्हणतो, ''होऊ दे मला देवी, मग तर देशील ना कांदेपाक?'' ही एक भीषण अशी मनोवस्था होय !

अशी अवस्था निर्माण होते कारण गरज ही वस्तू उपलब्ध करून देण्याचा निकष ठरण्याऐवजी तिजोरीतले पैसे हा निकष मानला जातो. यावर उपाय? साने गुरुजींना त्याचाच एक ध्यास होता. समाजवाद हाच यावर तणोपाय आहे, असे त्यांना वाटू लागले. पण समाजवादाचे नुसते बौद्धिक आकलन पुरेसे नाही, हेही त्यांच्या ध्यानी आले. समाजवाद समाजाला

पटवायला केवळ शब्दोच्चार पुरेसा नाही. आपल्या आचरणातून त्याचा इसार दिला पाहिजे, तरच समाजवादाचा विचार लोकांना पटेल. समाजवाद ही केवळ एखादी व्यवस्था नव्हे. ती एक संस्कृती आहे, जीवनाचा मार्ग आहे आणि भावबळाच्या आधारावरच त्याची निर्मिती होऊ शकेल. करुणेची भावना जागवली तरच रोकडा समजावाद माणसांच्या अनुभवाला येईल, असे त्यांना वाटतहोते.

भावबळाच्या पायावर जो समाजवाद येईल त्या मानवाला मानव म्हणून स्थान असेल. त्याला यंत्र किंवा पशूची कळा येणार नाही. माणसाला पशू किंवा यंत्र बनवले तर सांस्कृतिक समाजवाद कोठला, असे त्यांना वाटे. म्हणून सत्याग्रह आणि समाजवाद यांची सांगड घातली पाहिजे, अशा निष्कर्षावर ते पोचले. म. गांधींच्या एका मार्मिक वचनाचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव पडला होता. समाजवाद्यांनी जेव्हा गांधींच्या मागे 'तुम्ही समाजवादी आहात काय ?'' या प्रश्नाचा लकडा लावला तेव्हा गांधीजी म्हणाले, ''होय, मीही समाजवादी आहे. पण माझ्या समाजवादाची सुरुवात स्वतःपासून होते.'' समाजवादाची सुरुवात स्वतःपासून झाली तरी त्याचा पुढचा टप्पा सबंध समाजाचे परिवर्तन हा आहे, ही गोष्ट त्यांच्या या उद्‌गारातून सूचित होते. इतर समाजवादी होईपर्यंत गांधी बघ्याची भूमिका घेऊन स्वस्थ बसणार नाहीत. विचार पटला म्हणणाऱ्याच्या आचारावरही त्याचा प्रभाव न दिसला तर इतरांवर त्याचा प्रभाव कसा पडणार? सत्याग्रहातील एकादश व्रताचे अनुशासन यातूनच पुढे आले.

साने गुरुजींनी आपल्या अखेरच्या निरवानिरवीच्या पत्रात लिहून ठेवले आहे की, ''लोकशाही सत्याग्रही समाजवाद हे ध्येय धरा. ते तारील. अजातीय व अहिंसक, लोकशाही व सत्याग्रही दृष्टी घ्या. भारतात रक्तपात न होता समाजवाद येवो. व्यक्तिस्वातंत्र्यासह समाजवाद फुलो.'' साने गुरुजींच्या प्रायः सर्वच लिखाणामागे ही दृष्टी होती. परंतु अखेरच्या दिवसात

'समाजवादाशिवाय तरणोपाय नाही' या नावाने त्यांनी एक भावचित्रमाला लिहिली. त्यात अनेक उदाहरणे देऊन त्यांनी समाजवादाची महती पटवली होती. सर्वांना विकासाची पूर्ण संधी देणारी, श्रमाच्या आराधनेतून निर्माण होणारी समता, हा त्यांच्या समाजवादाचा आशय होता. या पुस्तकात एकत्रित कथांतून तो ठसवण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

'श्रमणारी लक्ष्मी' या नावाने त्यांचे हे लिखाण संग्रहित झाले. त्याचेच हे पुनर्मद्रण साने गुरुजी कथामालेच्यावतीने करण्यात येत आहे. साने गुरुजींच्या तोडीचा कथानिवेदक आधुनिक काळात तरी दुसरा झाला नाही. त्यांच्या कथा ऐकणे हा एक अनुभव असे. त्यांची कथा ऐकायला मिळावी म्हणून लहान–थोर स्त्री–पुरुष झुरत. साने गुरुजींनी कथानिवेदनाच्या या माध्यमातून श्रोत्यांना भावसाक्षर केले. भावनाही स्वस्थ बसू देत नाहीत, कार्याला प्रेरित करते. 'गुरुजी भावविवश आहेत' असा काही मंडळी त्यांच्याबद्दल आक्षेप घेत. यांना साने गुरुजींनी एकदा उत्तर दिले. ते म्हणाले, ''असाच आक्षेप महात्मा गांधींवरही घेतला जाई. तेव्हा ते म्हणाले, भावना म्हणजे काय? बुद्धी परिनिष्ठित झाली म्हणजे तिला भावनेचे रूप येते (एमोशन्स आर कंडेन्स थॉट्स) ! केवळ बुद्धी म्हणजे शुष्क आणि बहुधा स्वार्थपर बुद्धी. बुद्धीच निष्कर्षांना जेव्हा मूल्यांचे रूप येते तेव्हा बुद्धी कार्यवती होते. साने गुरुजी हे भावसाक्षरतेची दीक्षा देणारे आधुनिक महाराष्ट्राचे महान शिक्षक होते. महाराष्ट्रातील उगवत्या पिढ्यांचे भाव जीवन फुलवणे हा एकच त्यांना ध्यास होता.

– यदुनाथ थत्ते

१. जनी

मावशीचे घर म्हणजे माझे माहेरघर. जीवनात कधी निराशा वाटली, असहाय्य असे वाटले, मनाला वा शरीराला बरे नसेल, म्हणजे मी एकदम मावशीकडे जायचो. आधी कधी पत्र पाठवीत नसे. अकस्मात् जाण्यात एक प्रकारची गोडी असते. अकस्मात् पाऊस यावा, अकस्मात् वाऱ्याची झुळूक यावी, अकस्मात् फुललेले फूल दिसावे, अकस्मात् पत्र यावे, त्यात गंमत असते, नाही?

असाच तेव्हा मी मावशीकडे गेलो होतो. ती शाळेत शिकवायला गेली की मी घरी एकटाच असे. दुपारी भांडी घासायला राधी येत असे. तिच्याबरोबर तिची मुलगी जनीही यायची. मावशी उरलेसुरले तिच्यासाठी ठेवीत असे. जनीला एकदा परकरही मावशीने शिवून दिला होता. जनी फार मोठी नव्हती. असेल आठ–दहा वर्षांची. परंतु तिला उजाडत थंडी–पावसात आईबरोबर भांडी घासायला जावे लागे. दुपारीही जावे लागे. कधी कोणाचे दळण दळून आणणे, कोणाला गवळ्याकडून शेण आणून देणे, नाना लहानसहान कामे जनीला करावी लागत. शाळाबिळा तिला माहीत नव्हती.

खरे म्हणजे तिचे खेळण्याबागडण्याचे वय. हसण्यारुसण्याचे वय. गमतीने शिकण्याचे वय. त्या वाड्यातील इतर मुली दोरीवरच्या उड्या मारीत; झोपाळ्यावर बसून ओव्या म्हणत, गाणी म्हणत; बरोबरीच्या मुलींना बोलावून परोपरीचे खेळ खेळत; कधी बालग्रंथालयात वाचायला जात; तेथे नाना प्रकारचे कल्पनाशक्ती वाढवणारे चित्रांचे, ठोकळ्यांचे खेळ खेळत; कधी कमिटीबागेत जात; कधी दूर वनभोजनाला जात. परंतु जनीला ते सारे भाग्य कोठून मिळणार?

त्या दिवशी दुपारी जनी आईबरोबर आली. भांडी घासून आली.

''जने, मी जाते शेजारी भांडी घासायला. तू बाईंची खोली नीट सारवून टाक बरं का. नुसते शेण नको लिंपूस. नीट हात फिरव. ते शेण आहे, हे भाऊ पाणी देतील. थोडे फिनेल देतील. मी जाते.''

जनीला सांगून राधी गेली. जनीने शेण घेतले. मी तिला पाणी दिले. थोडे फिनेल दिले. जनी सारवायला लागली. परंतु तिला नीट जमेना.

''जने, मी येऊ का तुझ्याबरोबर सारवायला ? आपण दोघे मिळून सारवू.''

''असे कसे होईल ! तुम्ही का सारवणार ? बाई मारतील मला आणि आई घालील कमरेत लाथ. तुम्ही खुर्चीत बसा. अंगावर उडेल. दूर व्हा भाऊ तुम्ही.''

''मी येतोच सारवायला. मुला सुद्धा शिकू दे.''

''तुम्ही पुस्तके शिका. तुम्ही बाईंचे भाचे ना? बाई शाळेत शिकवतात, तुम्हीही शिकवा. शेणात नका घालू हात. आई आली तर मला काय म्हणेल?''

मी ऐकले नाही. मीही शेण कालवले. मीही सारवू लागलो. जनीने सारवले होते, त्याच्यावरून हात फिरविला. जनी माझ्याकडे बघे. आम्ही

दोघे खोली सारवण्यात रंगून गेलो. खोली लवकर सारवून झाली.

''भाऊ, रांगोळी घाला.''

''तुला येते का घालता जने ?''

''मला कोण शिकवणार ?''

''मी शिकवतो. ये.''

मी जनीला लहानशी रांगोळी शिकवली. नंतर मी तुला एका पुस्तकातील चित्रे दाखवीत बसलो.

'मला वाचायला तर येत नाही.''

''तू शीक.''

''तुम्ही इथे रहा, मी शिकेन.''

''जने, मी इथे चार दिवस राहणार. कायमचा कसा राहू ? तू शाळेत का जात नाहीस ?''

''आई एकटी कशी भांडी घासणार ? मी मदत करते. चार भावंडे आहेत मला. आम्ही गरीब आहोत भाऊ. तुम्ही इथे रहा.''

इतक्यात राधी आली.

''झाले का सारवून ? वा ! भाऊंनी रांगोळी घातली वाटते ? छान सारवलेस आज, नाहीतर परवा त्या देशमुखांकडे किती घाण ठेवलीस करून. चला घरी.''

''आई, भाऊंनी मला चित्रे दाखवली.''

''चित्रे पाहून का पोरी पोट भरते ? चल, नीघ !''

राधीबरोबर जनी गेली. मी बाहेर गॅलरीत येऊन उभा होतो. जनी मागे वळून पाही. मी एकदम जनीला हाक मारली,

''जने, जरा येऊन जा.''

''आई, येते हां मी !''

असे म्हणून हरणाप्रमाणे उड्या मारीत ती आली.

''काय भाऊ ?''

''अग, आज काही भाजीबिजी उरली नव्हती. हा खाऊ घेऊन जा.''

मी तिच्या हातात दोन वड्या ठेवल्या.

''बाई रागावतील.''

''बाईंना आनंद होईल. त्या का तुला देत नाहीत कधी वडी?''

''करतात त्या दिवशी देतात. मी पातेले खरवडते. चुरा भुगा किती असतो.''

''खा ना, जने.''

''मी घरी नेईन. तारी, बाळ, सर्वांना देईन.'' असे म्हणून टपोऱ्या डोळ्यांची ती पोरटी गेली निघून. आई वडाखाली वाट बघत उभी होती.

त्या दिवशी सकाळी आईबरोबर जनी आली. तिचे केस भरभरीत दिसत होते.

''राधी, हात कर पुढे. त्यावर तेल घालतो ते जनीच्या केसांना लाव.'' मी म्हटले.

''कशाला दादा तेल ? डोक्यावर धूळ बसायची आणखी.''

''नाही ग. हे घे.''

राधीने जनीच्या केसांना तेल चोळले. भांडी घासून झाली.

''भाऊ जाते.'' जनी म्हणाली.

''घरी गेल्यावर केस विंचर.'' मी म्हटले.

''भाऊ, तुम्ही मला फुलांची वेणी द्याल?''

''तुला आवडते का?''

''फूल का कोणाला आवडत नाही ? त्या दिवशी काच्छेवाडीत किती फुले होती. मी दुरून बघत होते. मला आवडतात फुले.''

''तू संध्याकाळी ये. मी आणून ठेवीन हां.'' जनी गेली, राधीही गेली, मावशी शाळेत गेली. मी खोलीत होतो. वाचीत बसलो. परंतु पुस्तक मिटून फेऱ्या घालू लागलो. माझ्या डोळ्यासमोर जनी दिसे. तिचे ते हसरे अकपट तोंड, मोठाले टपोरे डोळे, गालांवर गोंदलेले ! दुपारी भांडी घासायला राधा एकटीच आली.

''राधे, जनी ग कोठे गेली ?''

''तिला बरे नाही, दादा.''

''काय होते ?''

''जरा कणकण वाटते.''

''मी गोळ्या देईन. त्या तिला दे. थोडे दूध ने जाताना.''

मी राधीबरोबर दूध व कोयनेलच्या गोळ्या दिल्या.

''राधे, तू राहतेस कुठे ?''

''हाथीपोळात.''

''मला सापडेल तुझे घर ?''

''हो. जवळ आहे.''

राधी गेली. तिसरा प्रहर संपला आणि आता पाच वाजले. मावशी घरी आली. फराळ करून मी बाहेर पडलो. मी काच्छेवाडीत गेलो. तेथे फुलांच्या वेण्या होत्या. सोनचाफ्याच्या फुलांच्याही होत्या. मी एक सुंदरशी वेणी घेतली. मोसंबी घेतली. एक डाळिंब घेतले आणि त्या हाथीपोळांत मी आलो. परंतु जनी राहते कोठे कळेना. मी पुढे–मागे फिरत होतो.

''येथे राधी मोलकरीण कोठे राहते ?'' मी एका मुलीला विचारले.

''जनीची आई ना?''

''हो.''

''त्या पलीकडच्या बोळात.''

''तू मला दाखवतेस ?''

''हो. चला.''

त्या मुलीने मला जनीचे घर दाखविले.

''हे घे तुला मोसंबी.'' मी म्हटले.

''मला नको.'' असे म्हणून ती मुलगी पळाली.

मी त्या अंधाऱ्या खोलीत शिरलो. तेथे अंथरुणावर जनी होती.

''जने–'' मी हाक मारली.

''कोण, भाऊ ?'' असे म्हणून ती उठू लागली.

''नीज, बाळ. ही बघ तुला वेणी आणली आहे.''

''आता तापात मी कशी घालू ? ही तारीला होईल.''

''तुझा ताप सकाळला निघेल. मग ही वेणी घाल व मला दाखवायला ये. घरात का कोणी नाही ?''

''आई गेली कामाला. भावंडे गेली खेळायला.''

''तुझे बाबा ?''

''ते रात्री दहाला येतील साहेबांकडून.''

''तुला हे घे डाळिंबाचे दाणे.''

''चालतील का तापात?''

''तापात तर मुद्दाम देतात. घे.''

तिला मी दाणे दिले. मोसंबे सोलून दिले. ती पडून होती. मी तिच्या केसांवरून हात फिरविला.

''तुम्ही सकाळी तेल दिले होते.''

''आता बरी हो, दोन दिवस कामाला नको जाऊस.''

''आईला मदत नको का ? कशाला आला हा ताप?''

''तो लवकर जाईल. तू गोळी घेतलीस?''

''हो.''

''दूध प्यायलीस?''

''दूध बाळाला दिले.''

''तू का नाही घेतलेस?''

''तो बघत होता दुधाकडे. तो लहान आहे. तुम्ही आता जा. बाई तिकडे तुमची वाट बघत बसतील.''

''जने, जातो हां.''

''तुही बडोद्यास बरेच दिवस रहा भाऊ. लौकर नका जाऊ.''

''तू बरी झालीस म्हणजे मी जाईन.''

दोन–तीन दिवस जनीचा ताप निघाला नाही. परंतु एके दिवशी निघाला. ती पुन्हा कामावर जाऊ लागली. त्या दिवशी तर पावसातून डोक्याला फडके गुंडाळून ती आली.

''जने, भिजलीस ना? पुन्हा आजारी पडशील.''

''असे नका म्हणू भाऊ. एकदा आजारी पडले तर दोन ठिकाणची भांडी गेली. आई एकटी. तिला जायला उशीर झाला एक दिवस, तर येत जाऊ नको भांडी घासायला म्हणाले. आणि ती एक आजीबाई ! खरकटं

म्हणे राहिले पातेल्याला. नको येऊ म्हणाली. यांची भांडी खरकटलेली. पाणीसुद्धा नाही नीट लावून ठेवीत. भाऊ, आई घाईत होती. राहिले असेल खरकटे थोडे तर का काम काढून घ्यावे ? गरीबाचे भाऊ, कोणी नाही.''

''बोलत नको बसू. चल नळावर.'' राधी ओरडली.

जनी नळावर गेली. घासलेली भांडी विसळू लागली आणि सारी झाल्यावर जिन्यावरून ती भांडी घेऊन ती वर येत होती. तापात ती अशक्त झाली होती. तिच्या हातून भांडी पडली ! मावशी बाहेर आली. परंतु मी एकदम म्हटले,

''जनी किती अशक्त झाली आहे !''

मी भांडी गोळा केली. जनी व मी ती वर घेऊन आलो.

''हात का मोडले होते?'' राधी रागाने म्हणाली.

''राधे, नको तिला बोलू; ती तापातून उठलेली.''

''आणखी कोणाची भांडी पडती, तर शिव्या देती. येऊ नको कामाला म्हणती. तुम्हाला काय भाऊ? दोन ठिकाणचे काम गेले. गरिबाला दुखणे नाही; काही नाही. चल त्या घरी, जने.''

मायलेकरे गेली. पाऊस टपटप पडत होता. माझे डोळे भरून आले. आज मी तेथे नसतो तर जनीला राधी बोलती, मारती. काय त्या अल्लड मुलीचा अपराध? गोड प्रेमळ जनी! किती तिला समजूत, किती निरलस! जनी म्हणजे रत्न होते. परंतु दारिद्र्यात किंमत नाही. मी दिवसभर विचारमग्न होतो.

''काय रे, आज असा का?'' मावशीने विचारले.

''आज वादळी हवा आहे. जरा गारवा आहे, नाही?''

''तू गरम बंडी घाल.''

''जनी आज सकाळी पावसातूनच आली होती. नुकतीच ती तापातून उठली. लागली कामाला. राहून राहून मला वाईट वाटते. मावशी, याला उपाय काय? आम्ही स्वराज्यासाठी तुरुंगात गेलो. परंतु त्या तुरुंगातही आमची किती व्यवस्था असे. पांघरायला घोंगडी मिळे. थंडीत गरम बंडी मिळे. जे स्वराज्य आम्ही आणू, त्यात तरी या सर्वांची स्थिती सुधारेल का? जनी किती चांगली मुलगी आहे. माझा आश्रम असता तर तिला मी नेले असते.''

''अरे, ती तिच्या आईला मदत करते. ती मिळवते महिन्याकाठी पाच–सात रुपये. कोणाचे दळण आणते, कोणाचे धान्य निवडते. गरिबांची मुले लौकर स्वावलंबी होतात.''

''परंतु ना शिक्षण ना आनंद. या वाड्यातील इतर मुली बघ. जनीचे काय पाप की तिला थंडीवाऱ्यात उठायला लागावे? तिच्या हातात नेहमी माती, शेण असावे? तिच्या हातात पुस्तक का नसावे? तिने का खेळू नये, वनभोजनाला जाऊ नये?''

''अरे पण तिच्या घरी कोण हातभार लावील?''

''तिच्या घरचीही स्थिती सुधारायला हवी. स्वराज्यात कोणाची आबाळ नाही होता कामा, कोणाल ददात नाही असता कामा. मावशी, भांडीवालीला आपण रुपया देतो. म्हणजे दिवसाला अर्धा आणा. अर्धा तास तिचा कमीत कमी दोन्ही वेळची भांडी घासण्यात जातो. शिवाय दळण आणणे वगैरे आहेच. काय पडली मजुरी ? राधीला जर अधिक मजुरी मिळाली, तर जनी शाळेत जाईल. कोणतेही काम पवित्रच आहे. शिक्षकाला जर ताशी चार आणे पडत असतील तर मोलकरणीला ताशी एक आणा का? आणि न्यायाधिशाला ताशी पन्नास–शंभर रुपये का? कोणी बॅरिस्टर तासभर बोलतो, हजार दीड हजार रुपये घेतो? एकदा डॉक्टर ऑपरेशन करतो, रक्त संक्रांत

करतो, तर पाचशे घेतो. हे आहे काय? स्वराज्यात हे सारे बदलावे लागेल.''

''काय कराल ते खरे.''

''मी जातो बाहेर.''

''गरम घालून जा.''

मी गरम बंडी घालून गेलो. काच्छेवाडीत गेलो. फुलांची वेणी घेतली. गाडीवाल्याजवळून खिसमीस वगैरे मिश्रण घेतले. मी निघालो. त्या हाथी पोळातल्या जनीच्या घराकडे वळलो. ते माझे मंदिर होते. लहानपणी मी रामाच्या मंदिरात जायचो. आता माझा राम अन्यत्र होता. राममंदिरात कोठला राम? आम्ही देवाच्या मूर्तीला नटवतो, सजवतो, त्याला पीतांबर, शेलार, रत्ने, माणके, मुकुट सारे वैभव चढवतो. तो सकल ब्रह्मांडाचा पती, आमच्या बुद्धीची कीव करीत असेल ! तो म्हणत असेल, हे सारे सोने, हे जडजवाहीर, गरिबांचे संसार सुंदर करण्यात खर्च करा. जेथे आळशी आरामात आहे तेथे राम नाही. जेथे दुःखीकष्टी जीव आहे तेथे तो प्रभू रामचंद्र आहे. वेद म्हणतो, ईश्वर श्रमणाऱ्यांच्या मैत्रीसाठी भुकेला असतो. विश्वचालक परमात्मा श्रमणाऱ्यांजवळ आहे. म्हणून मला जनीचे ते अंधारमय घर पवित्र वाटे. ती व तिची आई अनेक सुखी लोकांचे संसार चालवायला राबत. गरीब माणसे श्रमणार नाहीत तर दुनिया ओस पडेल, श्रमणारा जगाचा आधार, परंतु तो निराधार आहे ! किती अन्याय ? तो का नाही बंड करीत ? माझे मन विचारात रमले होते. मी कोठे तरी दूरवर फिरत गेलो. हातात ती फुलांची वेणी होती. डोळ्यांसमोर हिंदुस्थानातील श्रीमंत देव आले. मी एकदा मावशीबरोबर द्वारकेला गेलो होतो. किती श्रीमंत तो द्वारकेचा राणा ! आणि भावनगरीची व इतर ठिकाणची ती मोठमोठी जैन मंदिरे मी पाहिली ! किती संपत्ती तेथे ! काही ठिकाणी सोन्याचे रथ ! काही ठिकाणी जवाहराने भरलेली

भांडी ! तो दक्षिणकडचा तिरुपती ! तो तर मोठा सावकार आहे. तेथून व्यापारी कर्ज नेतात ! हिंदुस्थानातील सर्व मंदिरातील संपत्ती एकत्र केली तर कोट्यावधी रुपयांचे भांडवल उभे राहील. त्यातून शेकडो ग्रामोद्योग सुरू करता येतील. परंतु देवांच्या अंगावरचे जडजवाहर दूर राहिले; आमच्या दशातील घरोघरचे दागदागिने एकत्र केले, तरी अब्जावधी भांडवल उभे राहील. सर्वत्र बेकारी आहे. अंगावर दागिने का घालतात हे लोक? शद्ध रानटीपणा आहे. देशात उपासमार असता अंगाखांद्यावर दागिने घालणे हे का मानवतेला शोभते? हातातील सोन्याच्या बांगड्या, बोटातील अंगठ्या सारे भांडवल पडून आहे. उद्या स्वराज्य आले तर उत्पादन धंदे काढायला भांडवल हवे त का परदेशातून घ्यायचे ? आणि घरीदारी का हे दागदागिने पडून असावेत ? माझे डोके तर सुन्न झाले. मी तेथील मैदानात बसलो. जमीन गार होत होती. गवत ओलसर होत होते. दव का पडत होते? मी उठलो. मावशी वाट बघत असेल मनात आले. मी पावले जोराने उचलू लागलो. एक कुत्रे आले अंगावर ! भ्यालो जरा, परंतु ते गेले दूर. किती भीती असते आपल्या मनात? निर्भय होणे सोपी नाही गोष्ट. सारे सवयीचे आहे. साहेबलोक कुत्रे बघताच आनंदतील. मी लहानपणापासून कुत्रा कधीच नाही जवळ घेतला. तो कुत्रा अंगावर आला होता, का माझे प्रेम मागायला आला होता? कोणाला माहीत ? बिचारा भुंकला नि दूर गेला. त्याच्या भुंकण्याचा एकच का अर्थ ? अनंत भाव त्यात असतील आणि तो हाथीपोळ आला. ती बघ जनीची खोली. रॉकेलचे डबरे तेवत होते. त्याचा तो धूर वर जात होता. जनी जुडी करून बसली होती. तिची भावंडे तेथे होती.

''जने, बरी आहेस?''

''होय, भाऊ''

''ही घे वेणी. सकाळी घालून ये.''

''त्या दिशी आणलीत. आज पुन्हा कशाला?''

''त्या दिवशी तू तापात होतीस, बाळ, आता बरी आहेस आणि हा घे खाऊ. तुम्हा सर्वांना.''

तिच्या भावंडांनी पुडी फोडली.

''तुम्हीही भाऊ, घ्या.'' जनी म्हणाली.

त्या मुलांबरोबर मीही खाऊ खाल्ला.

''जने, जाऊ ?''

''बाई वाट बघत असतील. जा तुम्ही. आई उशिरा येईल. तुम्ही कधी जाणार?''

''लौकरच जाईन. तू आता बरी आहेस ना बाळ?''

असे म्हणून मी तिला जवळ घेतले. जनीने माझ्या मांडीवर डोके ठेवले. मी तिच्या केसांवरून हात फिरविला.

''जने, माझे घरदार असते तर तुला नेले असते.''

''आणि आईला कोण मदत करील? तुम्ही मधून मधून येथे येत जा.''

''बसा, मी जातो.''

मी खोलीतून बाहेर पडलो. भारताची रत्ने तेथे होती. कधी त्यांची काळजी घेतली जाईल? माझे पाय तेथून निघत नव्हते. जनी दारात होती. मी पुन्हा तिच्याकडे वळलो.

''जा भाऊ, बाई वाट बघत असतील.''

''तू जा का म्हणतेस?''

''मग का या अंधारात रहा म्हणू ? परवा दोन विंचू निघाले येथे.''

''बडोद्यात विंचू फार.''

''ढेकूणसुद्धा. जा तुम्ही भाऊ, उशीर होईल.''

मी गेलो. विंच, गोमा, साप यांच्या संगतीत वाढतात ही गरीब मुले, मरणाबरोबर जणू जगत असतात.

भीती आम्हा सुखवस्तूंना. मरण हा गरीबांचा सोबतीच असतो.

मी घरी आलो. मावशी वाट बघत होती. आम्ही जेवायला बसलो.

''मावशी, मी परवा जाईन म्हणतो.''

''रविवारी जा. मुला सुट्टी आहे. काहीतरी करीन.''

''त्या दिवशी जनीला जेवायला बोलव. माझ्याबरोबर ती जेवायला बसेल. जणू आक्काची कुमी. मामांची शांती.''

''घरवाले हसतील.''

''हसोत. देव आशीर्वाद देईल.''

''बरे, बघू.''

रविवार जवळ आला. उद्या मी जाणार ! आज शनिवार. एकच दिवस राहिला. सकाळचे आठ वाजले होते. आज राधी अजून भांडी घासायला आली नव्हती. शेजारची बाई तणतणू लागली.

''केव्हा येणार ही भांडी घासायला ? आणि स्वयंपाक केव्हा करावयाचा ?'' असे ती म्हणत होती.

इतक्यात राधी लगबगीने आली. परंतु माझे लक्ष दुसरीकडे होते. तिकडे रस्त्यातून सर्कशीच्या जाहिराती वाटीत बँड वाजवीत सर्कशीतील बहुरूपी माणसे जात होती. मुलांची ही गर्दी ! जाहिरात मिळविण्यासाठी मारामारी! जाहिरातीत सिंहाची वगैरे चित्र होते ! मी वरून बघत होतो.

''मला दे जाहिरात, मला दे'' करीत मुले जात होती आणि त्यांच्यात

जनीही ! जनी जाहिरातींसाठी धडपडत आहे. पाठोपाठ जात आहे. मिळाली तिला एक ! अरे, पण कोणी हिसकवली तिच्या हातातून ! ती हिरमुसली झाली. 'दे रे एक, दे रे एक' करीत ती जात होती. ''दिली ना एकदा'' तो ओरडला. ''ती दुसऱ्याने पळविली'' ती म्हणाली. त्याने पुन्हा तिला एक दिली. जनी आनंदली. ती त्या चित्रांकडे पाहत होती. तिला कोण नेणार सर्कशीला ? चित्रातील सिंह, हत्ती याचीच तिची सर्कस ! ती जाहिरात हातात घेऊन तिच्याकडे बघत ती हळूहळू येत होती.

राधी नळावर भांडी घाशीत होती. ती रागाने लाल झाली होती.

''या कारटीला जाऊन भांडी घास म्हटले तर गेली भटकायला मेली ! दोन घरची भांडी सुटली ! खाल काय उद्या. ये तर खरी, खोड मोडते चांगली.'' जोराने भांडी घाशीत राधी जोराने बोलत होती आणि जनी आली. आईने पाहिले मात्र, तिने हातातील पळीच मारली तिला. तिने ओढले तिला. ''सांगितले होते ना भांडी घासायला जा म्हणून ? कोठे गेली होतीस मसणात?'' असे म्हणून ती मारीत होती. मी धावतच आलो. मी जनीला जवळ घेतले.

''सोडा तिला. तुम्ही तिला चढवून ठेवता. तुम्ही जाल उद्या निघून. भांडी सुटली लोकांची तर खातील काय? सर्कशीची जाहिरात हवी. पाठीची जाहिरात काढते चांगली. मरत नाही कारटी !''

''नको असे बोलू. ती का मोठी आहे.''

''तिच्याएवढ्या मुली चार ठिकाणी भांडी घासतात.''

''तीही घासते. नका मारू. मी येथे आहे तोवर तरी तिला नका मारू. चल जने वर!''

मी तिला वर नेले. ती रडत होती. कपाळावर पळी लागून रक्त येत

होते. माझ्या शर्टाला ते निष्पाप रक्त लागले होते. मी तिच्या कपाळाला पट्टी बांधली. मी तिला जवळ घेतले. ती मुसमुसत होती.

''उगी बाळ.'' मी म्हटले.

भांडी घासून राधी वर आली.

''चल जने.'' ती म्हणाली.

''राहू दे येथे.'' मी म्हटले.

''राधे, जनीला उद्या जेवायला पाठव.'' मावशी म्हणाली.

''बरं बाई; चल जने आता.''

''जाते भाऊ.''

''राधे, जनीला मारणार नाही, कबूल कर.''

''हौस म्हणून का मारते? भाऊ, आम्ही गरीब माणसे. आम्हाला का माया नाही?'' राधीने जनीला जवळ घेतले. दोघींचे डोळे भरून आले.

''चल घरी.'' राधी तिला म्हणाली.

''येते हा भाऊ.'' जनी म्हणाली.

गेली मायलेकरे. दुसऱ्या दिवशी जनी माझ्याजवळ बसून जेवली आणि मी तिला चित्रे दिली, चेंडू दिला.

''जने, आज मी जाईन.''

''भाऊ, पुन्हा कधी याल?''

''देवाला माहीत.''

''येत जा तुम्ही. बाई, भाऊंना बोलवा हां लौकर लौकर.''

जनी गेली. मीही त्या रात्री मावशीला प्रणाम करून गेलो. जनी पुन्हा त्यानंतर कधी भेटलीच नाही. तिचे लग्न झाल्याचे कळले. ती सासरी गेली.

कोठेतरी मोलमजुरी ती करीत असेल आणि तिलाही मूलबाळ झाले असेल. तीही का अशीच मोलमजुरी करतील? आता स्वराज्य ना आले? परंतु गरिबांचे कोठे आहे? ते केव्हा येणार, कोण आणणार? समाजवादाशिवाय कोठले खरे स्वराज ?

जने, तुझी स्मृती माझ्याजवळ अमर आहे ! तू डोळ्यांसमोर आहेस. परंतु नुसती तुझी स्मृती ठेवून काय उपयोग बाळ?

२. रामा

''धर्मा, आज तुझे तोंड उतरलेले का?''

''आज पोराची लई आठवण येते भाऊ. तुम्ही आज सर्वांनी गोड करून खाल्लंत, मलाही पोटभर दिलेत. परंतु पोटात घास जाताना डोळ्यांतून पाणी येत होते. तुम्ही स्वराज्य यावे म्हणून तुरुंगात आलात. तुम्हाला तुरुंगातही किती सवलती, सोयी आणि आम्हाला बाहेरही पोटभर खायला नसते? आम्ही का अपराधी आहोत, पापी आहोत का आम्हांस पोटभर खायला नसावे, अंगाला कपडा नसावा? तुम्ही स्वराज्याचे कैदी आणि मी चोर म्हणून कैदी. परंतु कशासाठी केली चोरी? सर्वांना पोटभर खायला मिळावे म्हणून तुम्ही तुरुंगात आलात. मी माझ्या मुला-बाळांना घास मिळावा म्हणून तुरुंगात आलो.''

''धर्मा, पालवणीचा ना तू ?''

''तुमच्या ध्यानात राहिले नाव. पालवणीचाच मी. त्या वेळेस घरात काही नव्हते खायला. पोरांची तोंडे सुकून गेली. माझा रामा मोठा गोड मुलगा आहे. काकडी खाऊन, भोपळ्याची भाजी खाऊन कोठवर पोरांची

भूक राहणार ? अजून शेतेभाते पिकली नव्हती. भात तयार झाल्यावर दोन भारे झोडपले असते. परंतु त्यालाही अवकाश होता. रामजीभाईंचे गावात कोठार. भाताने भरलेले. काढावे कुलूप, न्यावे चार पायली भात मनात आले आणि त्या रात्री गेलो. कुलूप तोडायची खटपट करीत होतो. अंधार होता आणि पाऊसही होता. आकाश गरजायला लागले. मला बरे वाटले. आवाज कोणाला ऐकायला जाणार नाही वाटले, परंतु एकाएकी कुत्रा भुंकू लागला. मालकही उठला. मी निसटलो. 'चोर चोर' रामजीभाई ओरडला. त्यांचा गडी उठला. कुत्रा भुंकत निघाला. आजूबाजूचे लोक धावले. मला घेरले त्यांनी. 'कोण धर्मा, आणि तू चोरी करायला आलास?' मला म्हणाले.''

''मग काय केलेस तू?''

''त्यांनी त्यावेळेस मला जाऊ दिले. मागून रितसर खटला भरला. मला अटक झाली. लॉकपमध्येच चार महिने गेले. बायको कधी येई नि रडे. एकदा पोरगा रामाही आला. गजांवर त्याने डोके आपटले.''

''तुला का एकच मुलगा ?''

''चार पोरे आहेत. रामा मोठा. त्याच्यावर माझा लई जीव. कसा दिसतो देवावाणी.''

''शाळेत जातो का तो ?''

''म्हारवाड्यात शाळा नाही, तिकडे लांब जायला पोरे कंटाळा करतात. परंतु चार अक्षरे पोराने शिकावी वाटे. रामा जायला लागला होता. परंतु मला अटक झाली. त्याची शाळा सुटली. तो काम करतो. मजुरीला जातो. रानातून मोळी आणतो. गवत विकतो. दहा–बारा वर्षांचा पोर. पोरगा शिकेल वाटत होते. आमच्या नाही नशिबी दादा.''

''स्वराज्यात शिका सारी.''

''कधी येणार तुमचे स्वराज्य आणि दाद तरी लागेल का नाही कोणाला ठावं? गरीबाला शिक्षण मिळू नये म्हणून महागाई कराल नाही तर?

''धर्मा, असे कसे होईल ? स्वराज्य म्हणजे का थट्टा ?''

''माझे मन म्हणत असते, वेडी आशा करू नये. तुम्ही इतके स्वराज्यवाले येथे आहात. तुरुंगात सुद्धा घाणेरडे काम आमच्याच लोकांना. तुम्ही केला आहे याचा विचार ? मागे तुमचे लोक दिवाण होते. तुरुंगातील भंगीकाम आमच्याच नशिबी असते हे का माहीत नव्हते तुमच्याच लोकांना ? तुरुंगाच्या वाऱ्या तर मोप केल्या. पण अजून महार, भिल्ल अशांच्याच नशिबी तुरुंगात हे वंगाळ काम ? मोठे मन दादा नाही आढळत फारसे. सोन्यावाणी, माणकावाणी ते दुर्मिळ आहे.''

''धर्मा, तुझा मुलगा कधी आला होता भेटायला ?''

''कसा येणार भेटायला? कोठले पैसे ? घरी दोन घास खाऊ देत म्हणजे झालं.''

धर्माच्या डोळ्यांना पाणी आले. तो पुन्हा म्हणाला,

''आज गोड खाताना त्यांचीच आठवण येत होती. हे थंडीचे दिवस. पोरांना पांघरायलाही काही नसेल. देव आहे सर्वांना.

मी उठून गेलो. धर्माजवळ मी मधूनमधून जाऊन बसत असे. तो तुरुंगातले काम करी. एका बाजूला भिंतीजवळ बसे. आम्ही स्वराज्यवाले. आमचे संडास साफ करण्याचे काम धर्मा करायचा. ते आम्हीच आमच्या अंगावर पाळीपाळीने का बरे घेतले नाही ? तसा विचार तरी आमच्या मनात आला का ? ४२ चा बाहेर चाललेला लढा हिंसक की अहिंसक याच्यावर आमच्या व्याख्यानमाला चालत. आमचे समाजवादाचे अभ्यासवर्ग

असत. कोणी संगीत शिकत, कोणी संस्कृत. परंतु धर्माचा विचार केला होता का? धर्मा व्यक्ती म्हणून नव्हे. परंतु ही जी गुलामगिरी देशभर आहे, ती इंग्रज गेला तरी कशी जाणार? भंग्याचे भंगीपण कधी जाईल, अस्पृश्यांची अस्पृश्यता कधी जाईल, निरनिराळे धंदे शिकून ते कधी प्रतिष्ठित नागरिक होतील, याचा विचार आमच्या मनाला शिवत होता का? प्रभू जाणे ! धर्माजवळ जाऊन बसलो म्हणजे तो म्हणायचा, ''दादा, कशाला तुम्ही येथे बसता? तुम्ही मोठे लोक.'' मी त्याला म्हणायचो, ''आपण सारे समान.'' तो म्हणाला, ''शब्द आहेत दादा हे.'' आणि माझे मनही मात खाई.

दिवस जात होते.

एके दिवशी मी एकटाच फिरत होतो. थोडी पावसाची झिमझिम सुरू होती. आज कोठून आला पाऊस ? नुकसान करणार पाऊस. आंब्याचा मोहर गळेल. गरीब लोक आंबे खाऊनही राहतात. पुढे आंब्यातल्या कोया खाऊन राहतात. कशाला ही अभ्रे, हा अकाली पाऊस, असे मनात येत होते. परंतु अनंत विश्वाच्या योजनेत घडामोडी होतच असतात, आपणास काय कळे त्यांचा अर्थ ? डोक्यात विचार थैमान घालीत होते. मी भराभर चालत होतो.

''दादा,'' धर्माने हाक मारली.

''काय रे धर्मा ?'' मी म्हटले.

''हे पत्र वाचून दावा.''

''कोणाचे पत्र ?''

''पोराचा असेल कागद. दुसरं कोण लिहिणार?'' मी पत्र हातात घेतले. पालवणीहून आलेले होते. धर्माच्या बायकोने लिहून घेतलेले होते.

कोकणातील पद्धतीप्रमाणे लिहिणाऱ्याने वाचणाऱ्याला रामराम असे शेवटी होते. पत्र नीट लावून मी वाचले. ते पुढीलप्रमाणे होते–

''रा. राण धर्मास रमीकडून कागद देण्यात येतो की, तुम्ही कधी सुटून याल इकडे सर्वांचे डोळे आहेत. सहा महिने गेले, अजून आठ आहेत म्हणता. साहेबाला सांगून लौकर सुटा. चार दिवसांपूर्वी येथे वादळ झाले. असे जन्मात कधी झाले नव्हते. आपल्या झोपडीवरचा शाकार सारा उडून गेला. थंडी मनस्वी पडते. रात्री वारा येतो. पोरे गारठतात. काय करायचे ? कर्ज मागायला गेलं तर चोराला कोणी द्यावे असे म्हणतात. परवा तुमचा लाडका रामा ते शब्द ऐकून अंगावर धावला. मी आवरले. पोराची भीती वाटते. नागाच्या पिलावाणी फणकरतो. गरीबाला असे करून कसे चालेल ? त्याला चार शब्द लिहा आणि तुमच्या तेथे स्वराज्यवाले आहेत. कोणाला दहा रुपये पाठवायला सांगा. पेढे घेऊ आणि चंद्रमौळी घर शाकारू. पोरांना थंडी कमी लागेल. तुम्ही जपा. येईल दिवस तो जातच आहे. लवकर सुखरूप या.''

अशा अर्थाचे ते पत्र होते. लिहिणारा हुशार असावा. आम्हा स्वराज्यवाल्यांचीही कसोटी घ्यायची त्याने ठरविले असावे. पत्र वाचून झाले.

''देवाची गरिबावरच धाड. मोठे वाडे नाही पडायचे, ते नाही उडायचे. आमची घरे उघडी पडायची. कोठून आणतील शाकार? थंडीचे दिवस.''

''मी माझ्या बाहेरच्या एका मित्राला तुझ्या घरी दहा रुपये पाठवाया लिहितो.''

''कशाला उपकार घ्यायचे ?''

''उपकार कसले धर्मा ? एकमेकांनी एकमेकांस मदत नको का

करायला? आणि मी तर मित्रालाच लिहिणार.''

''बघा लहून, परंतु हे मिंधेपणाचे जिणे. कोणाचे उपकार नये घेऊ बघा. जीव मरतो, गुदमरतो.'' मला एका लेखकाचे शब्द आठवले. भांडवलशाही समाजरचनेत आत्मा मारला जातो, व्यक्तित्व मारले जाते. आपण अगतिक होतो, स्वतःच्या आशा, आकांक्षा, स्वप्ने सारे दूर ठेवावे लागते. दुसऱ्याच्या लहरीवर नाचावे लागते, त्याला आवडेल असे बोलावे लागते. तो सांगेल ते करावे लागते. धर्मा म्हणाला जीव मरतो, गुदमरतो. केव्हढे सत्य, केवढी ही हिंसा ! म्हणजे केवळ मान कापणे, खंजीर भोकसणे, गोळी घालणे एवढीच नव्हे, दुसऱ्यांच्या जीवांचा गुदमरा करून स्वतः सुखविलासात राहणारे हिंसकच नव्हेत का ? अधिक हिंसक. कारण ते आत्म्याचे मारेकरी. गांधीजी म्हणाले होते, ब्रिटिश सत्तेने केलेले सर्वात मोठे पाप म्हणजे हिंदी राष्ट्राचा आत्माच मारला. या आत्म्याचा उद्धार कसा व्हायचा? भांडवलशाहीत हे शक्य नाही. हुकूमशाहीत कम्युनिझम तोही आत्मा मारणारच. आत्म्याचा, मनोबुद्धीचा कोंडमारा न करता अन्नवस्त्र, आनंद लोकशाही समाजवादच कदाचित् देऊ शकेल. तीच एक आशा.

तिकडून पोलिस अंमलदार आला. धर्मा उठून केरसुणी मारू लागला. मीही निघून गेलो. माझ्या एका मित्राला मी लिहिले. त्याने धर्माच्या घरी दहा रुपये पाठविले. धर्मालाही पैसे मिळाल्याचा आनंद झाला.

''भाऊ, पोरं रातची सुखानं झोपतील. तुम्ही या. आमच्या गावाला लागतील का तुमचे पाय ?''

''धर्मा, असे म्हणू नकोस. आपण सारी साधी माणसं. मी मूळचा तिकडचाच. पालवणीला मागे एक सन्याशी राहत होते.''

''ते बोवा जंगलांतील सांबाच्या देवळात रहात. वाघरूही आसपास असायचे. परंतु ते लंगोटीबाबा भीत नसत.''

''मी त्यांना भेटलो होतो. मला तिकडच्या आठवणी येतात. तुमच्या तिकडची करवंदे, काजू, कोकम, बोर्डे–सारे मेवे आठवतात. ती लाला माती, ते जांभे दगड, सारे आठवते. परंतु मी पोटासाठी दूर गेलो, धर्मा.''

''पुन्हा या मुलखात, आमच्यात रहा. आमच्या पोरांना शिकवा. मी सुटेन सहा महिन्यांनी. तुम्ही कधी सुटाल समदे ?''

''तडजोड झाली तर सुटू. स्वराज्याशिवाय तडजोड नाही. परंतु धर्मा, तुला मी विसरणार नाही.''

दिवस गेले. त्या दिवशी जरा खिन्न होतो. कधी कधी अकस्मात मला आईची आठवण येते, नी मी त्या दिवशी दुःखी होतो. जणू ती बोलवीत आहे असे वाटते. मी माझ्या विचारात होतो. भावससमाधीत होतो.

''दादा ?''

कोणी हाक मारली? मी पाहिलं तो दारात धर्मा उभा.

''ये, धर्मा. ये, आत ये, बस.''

''तुमच्या जवळ कसे बसायचे ? भंगीकाम करणारे आम्ही.''

''म्हणजेच माझ्या आईसारखे. ये, धर्मा.''

धर्मा आत आला. माझ्या घोंगडीवर बसला. त्याच्या हातात कागद होता.

''पत्र आले वाटते घरचे?''

''पत्र येऊन चार दिवस झाले.''

''कोणी वाचून दाखवले?''

''नेहमी तुम्हाला किती त्रास द्यायचा ? दुसऱ्याकडून घेतले वाचून परंतु कागदाचा जबाब तुम्हीच लिहा. तुम्ही पोराला चार गोष्टी समजावून सांगा. पोरगा बिघडला बघा. वाचा हा कागद.''

ते पत्र मी घेतले. काय होते त्यात ?

रा. रा. धर्मास रमीचा कागद.

''तुम्ही पोराला लाडावून ठेवलात. फार शेफारला, तुम्ही कैदेत. संसार कसा मी चालवू ? धाकडी जानकीसुद्धा मोळी घेऊन विकायला जाते. परंतु हा रामा एवढा मोठा पोर, त्याने का काम करू नये ? खोताने कामाला बोलावले होते. दोन दिवस गेला परंतु तो रोज उठेच ना. अरे पोरा, ऊठ लवकर, कामाला जा, खाल काय ? ऊठ. असे मी म्हटले, तर सापाप्रमाणे अंगावर धावून आला. नाही जात कामाला असे म्हणाला. या पोराने का माझ्या अंगावर धावून यावे ? याला जन्म दिला तो का यासाठी? दोन गोष्टी या पोराला लिहा. तुम्ही कधी सुटणार ? मला धीर नाही धरवत. सखू तर अगदी उघडी. चिंधी नाही तिच्या अंगावर. परंतु तुम्ही काय कराल ? प्रकृती सांभाळा, जिवास जपा. खोताचे कोठार कशाला फोडायला गेलात ? आणखी थोडे उपास घडले असते. नशिबातले थोडेच चुकणार. तुमच्या वाटेकडे डोळे आहेत. पोराला समजुतीचा कागद लिहा.''

मी ते पत्र वाचले. मला वाईट वाटले. मी त्या दिवशी माझ्या देवाघरी गेलेल्या आईच्या विचारात होतो आणि हे पत्र एका मातेचेच होते. श्यामच्या आईतील श्याम आपल्या आईवर अपार प्रेम करी. ती तिचे काम करी, तिचे पाय चुरी; परंतु धर्माचा हा रामा, आपल्या आईच्या अंगावर धावून जातो. हात उगारतो? का बरे असे? का हा फरक? रामाचे का आईवर प्रेम नव्हते, परंतु ते प्रेम दारिद्र्यात गोठून गेले. थंडीचा दिवसात श्याम

लौकर उठला तर त्याची आई म्हणे, ''नीज अजून जरा. इतक्या लवकर कशाला उठतोस.'' परंतु रामाला त्याची आई थंडीत उठवते, कामाला जा म्हणते, मोळी आण म्हणते. दोन दिवस रामा उठला. त्या दिवशी त्याला कंटाळा आला असेल. पांघरून घेऊन पडला असेल. बारा वर्षांचा तो पोर, आईने लकडा लावला. तो संतापून तिला मारायला धावला. नाही जात कामाला म्हणाला. कोणाचा दोष? रामाला थंडीतही उठविणाऱ्या त्या मातेचा दोष नाही. कारण नवरा तुरुंगात. तिला घर चालवायचे. पोराच्या तोंडात सुका कोरडा घास घालायचा. मुलाला न उठवील, कामाला जा न म्हणेल तर तिचे कसे चालणार? आणि तो रामा ? अल्लड पोर. बापाचा लाडका. तोही एखादे दिवशी रागावला असेल, आईला उलटून बोलला असेल. काय त्याचा दोष ? दारिद्र्याचा, समाजरचनेचा, विषमतेचा. रात्रंदिवस श्रमणाऱ्यांना सुखाचा नीट घासही मिळू नये. काय ही दैना? कधी हा घोर अन्याय दूर होईल? समता, न्याय येतील?

''भाऊ, पत्र लिहिता ना?''

''लिहितो हां.''

मी सुंदर पत्र लिहिले. ''आईवर रागावू नकोस. तिचे पाय धर पोरा. आईसारखे दैवत नाही. मी येईपर्यंत नीट नांदा. मग तुला शाळेत घालीन. चांगला हो. पुन्हा असे पाप नको करूस. आई एकटी किती काम करील? तिला मदत कर आणि गावात कलागती नको करूस. लौकरच स्वराज्य येईल, आपली मानहानी थांबेल.''

मी किती तरी त्या लहान कार्डात बारीक अक्षरात लिहिले. धर्माला मी ते पत्र वाचून दाखविले.

''छान लिहिलेत पत्र.'' तो म्हणाला.

''तुझ्या रामाला भेटायला येईन.'' मी म्हटले.

''या खरेच या.''

धर्मा गेला, मी मात्र दिवसभर विचारातच होतो. मातृप्रेम, बंधुप्रेम, पतीपत्नी प्रेम, सारी ही गोड प्रेमे पिकायलाही आर्थिक परिस्थिती बरी हवी. गरीबीत सारी प्रेमे गारठून जातात. दारिद्र्य दुर्गुणाची जननी, हेच खरे. संस्कृती फुलायला, प्रेममय संबंध वाढायला, सांसारिक सुस्थितीही हवी आणि हे सारे करायचे म्हणजे समाजवाद हवा. अशा विचारात मी होतो.

''कसला चालला आहे विचार ?'' कोणी विचारले.

''समाजवादाशिवाय तरणोपाय नाही.'' मी म्हटले.

३. काकडीवर जगणारी मायलेकरे

बोर्डी मोठा सुंदर गाव. मी कधी कधी तेथे जातो. तेव्हा मन कष्टी असते, काय करावे ते सुचत नाही, त्या वेळेस मी तेथे जातो. ४५ साली सुटल्यावर मी जवळजवळ दोन वर्षे महाराष्ट्रभर हिंडत होतो. प्रथम ४२ सालच्या लढ्याचे समर्थन करीत हिंडलो. नंतर निवडणुकांच्या प्रचारार्थ. परंतु ती सारी प्रचारी कामे संपली. नंतर सेवादलाच्या शिबिरांसाठी हिंडत होतो. त्या वेळेस मी अस्पृश्यतानिवारणावर सारखे सांगत असे. परंतु मनात येई, बडबड करून काय होणार? या कामी देह अर्पावा असे वाटे. पंढरपूरचे मंदिर खुले व्हावे, त्यासाठी उपवास करावा, असाही विचार मनात येत होता. अधीर होऊ नका म्हणून मित्र सांगत होते. मी बेचैन होतो आणि मी बोर्डीस भावाकडे गेलो.

पावसाळ्याचा भर कमी झाला होता. श्रावण–झड संपली होती. शेते मस्त दिसत होती. समुद्रही जरा शांत झाला होता. मी तेथे नारळीच्या झाडामध्ये उभा राहून दूरचा समुद्र बघत असे. सूर्याचा प्रकाश पडल्यावर रुपेरी प्रवाहच तिकडे पसरला आहे असे वाटे. एके दिवशी असाच मी झाडाखाली बसलो होतो. नारळी नाचत होत्या. जणू माझ्या त्रस्त मनाला

ती झाडे सुखवू इच्छित होती. आसपास ऊन होते. परंतु मी छायेत होतो. वारा वाहत होता. त्यामुळे ऊन भासत नव्हते. भाऊ शाळेत गेला होता. समोरच्या मैदानात शांतपणे गायीगुरे चरत होती. एक गायीचे वासरू दूध पीत होते. घरी मालकाने थेंबथेंब दूध काढून घेतले असेल. बच्चा उपाशी असेल. परंतु रानात पान्हा फुटला. मी हे सारे बघत होतो.

इतक्यात एक गरीब बाई तेथे कुंपणाजवळ आली आणि पाठीमागून एक मुलगा आला. तो तिला बिलगून उभा राहिला. पाचसात वर्षांचा तो मुलगा असेल. एक चिंधीवजा कुडते त्याच्या अंगावर होते. काळासावळा मुलगा. त्याचे चंचल डोळे माझ्याकडे बघत होते. जणू मुकेपणाने बोलत होते. मध्येच तो आपल्या आईकडे बघे. मध्येच माझ्याकडे बघे. ती माता अत्यंत कृश होती. लज्जारक्षणापुरते वस्त्र होते. तिचे प्राण जणू डोळ्यांत आले होते. मी त्या मायलेकरांकडे पाहत राहिलो. मी काही बोललो नाही. शेवटी मुलाची आई म्हणाली,

''दादा, ही काकडी घेता ?''

''ही जून आहे ग, एवढी मोठी काकडी आम्हाला कशाला? आमच्या घरात जून काकडी कोण खाणार ? माझ्या भावाला कोवळी काकडी आवडते. ही नको.''

'' घे रे दादा. नको मला हिंडायला लावूस. या दोन्ही काकड्या घे.''

''दोन्ही ?''

''दोन्ही घे. आता नाही हिंडवत. ऊन झालं बाहेर. पोराला किती हिंडवू? घे, दोन्ही काकड्या घे.''

''एकच पुरे. काय तिची किंमत ?''

''चार आणे एकीचे.''

आमचे असे बोलणे चालले होते. तो तिकडे शाळेची छोटी सुट्टी झाल्याची घंटा झाली. भाऊही आला. सुधाही आली. सुधा धावत येऊन म्हणाली,

''काय रे अण्णा, काकडी वाटते ?''

''अग, जून आहे ती.''

''घे तू. आपण मीठ लावून खाऊ. काकडी पाहिली की दादांची आठवण येते. ते हिंगमीठ–मिरची लावून खायचे. त्यांना फार आवडायची. घे अण्णा; अण्णा, ती मोठी घे.'' सुधा म्हणाली.

''दोन्ही घ्या रे दादांनो.''

''दोन काय करायच्या?'' भाऊ म्हणाला.

''तुम्ही भाऊ आहात. एकेकाला एकेक घ्या.''

''आणि ही आमची पुतणी आहे, तिला एक.'' मी म्हटले.

''आणि घरात ताई आहे, तिला एक.'' सुधा म्हणाली.

''अग जेवढी माणसे तेवढ्या का काकड्या घ्यायच्या? एक पुरे ही सांग किंमत.'' मी म्हटले.

''दादा, दोन्ही घ्या. खा पोटभर काकडी. गरीबांकडची काकडी बाधणार नाही. दोन्ही घ्या.''

''एक पुरे.'' भाऊ म्हणाला.

ती बाई केविलवाण्या दृष्टीने बघत होती आणि तिच्या डोळ्यांतून पाणी आले. आम्ही दोघे भाऊ गंभीर झालो.

''अग, रडू नकोस. दोन काकड्या घेऊन आम्ही काय करू? या मोठाल्या जून काकड्या. खरे ना?''

''अरे दादा, हा पोरगा दोन दिवसांचा उपाशी आहे. काकडी खाऊन

आहे. आता शेतातील कामे संपली. कापणीच्या हंगामात आता काम मजुरी मिळत नाही. घरात खायला नाही. सरकारी दुकानातून धान्य घ्यायला जवळ दिडकी नाही. या दोन काकड्या विकत घ्या. आठ आणे मिळतील. त्याचे तांदूळ घेईन. पोराला खायला देईन. पुढे कधी शेत पिकेल तेव्हा दाणे. आधी तर मालकाला घातले पाहिजे भात. आम्ही राबावे, त्यांना नेऊन घालावे. दोनतीन महिने खायला पुरते. पुन्हा मजुरी कायमची नशिबी आणि जेव्हा मजुरीही मिळत नाही तेव्हा उपासमार होते दादा. गरीबाचे हाल कुत्रा नाही खाणार !''

''तुमची स्वतःची जमीन नाही वाटते?''

''कोठली जमीन? का देत नाही आम्हाला जमीन ? त्या शेट्जीची तिकडे गवताची जमीन आहे. तेथे भात पिकेल. परंतु त्याने तेथे गवत वाढवले. तिकडे सरकारच्या लढाईला म्हणे गवत लागते. भाव आहे गवताला. ती जमीन आमच्याजवळ असती तर सोन्यासारखे दाणे पिकवले असते. दादा, आम्ही गाईगुरे, बकऱ्या–शेळ्या झालो असतो तर चारा तरी खाल्ला असता. पाला ओरडबून खाल्ला असता. या देशात गरिबीने माणसाचा जन्म घेणे वाईट. आम्ही राबायला तयार आहोत. काम करायला तयार आहोत. परंतु पुरेशी सत्तेची जमीन नाही. पिकवावे ते त्यांना घालावे. काय आमची ही दशा ? बघा या पोराकडे. अंगावर चिंधी नाही, पोटात घास नाही आणि या लोकांच्या चिकूच्या बागा, यांचे मळे, यांचे बंगले, शेतीही यांचीच. काम करायचे आम्ही. सुखात राहायचे यांनी. खऱ्याची दुनिया नाही. दादा, दोन दिवस झाले. काकड्या खाऊन जगत आहोत. होईल मग पोटात थंडी, ढाळ सुरू होतील. मरतील पोरे. एक मुलगा दोन वर्षापूर्वी असाच गेला रे दादा !''

ती मटकन् खाली तेथे रस्त्याच्या कडेला बसली. त्या काकड्या तेथे गवतावर होत्या. ती रडू लागली. तिचा मुलगा, तो तेथे उभा होता. त्याने मातेच्या गळ्याला मिठी मारली.

माझा भाऊ गंभीर होऊन घरात गेला. मी पुतळ्याप्रमाणे उभा होतो. भाऊ घरातून आठ आणे घेऊन आला.

''रडू नकोस. दोन्ही काकड्या घेतो. हे घे आठ आणे आणि मुलालाही बिस्किटे घे. घे रे बाळ. ये पुढे.'' हळूच भाऊ म्हणाला.

तो बाळ कुंपणाजवळ आला. त्याने ते चिमुकले हात पुढे केले. भावाने त्याच्या हातावर बिस्किटे ठेवली. तो लहान बाळ ती आईला दाखवू लागला.

''खा, तू खा.'' ती म्हणाली.

एक स्वतःच्या तोंडात घालून एक आईच्या तोंडात घातले. ती माया-लेकरे निघून गेली. आम्ही दोघे भाऊ झोपाळ्यावर बसलो. तिकडे घंटा झाली. भावाला तास नव्हता. आम्ही बोलत नव्हतो. वारा जोराने वाहू लागतो. सों सों वारा करीत होता. तिकडे लाटा धो धो करीत होत्या.

''भरती बघ केवढी'' भाऊ म्हणाला.

परंतु माझे लक्ष समोरच्या उचंबळणाऱ्या समुद्राकडे नव्हते. सृष्टीचे सौंदर्य मला मोहवीत नव्हते. ती गरिबांची दैना, ते दुःखी संसार माझ्या दृष्टीसमोर होते. मी एकदम म्हटले,

''समाजवादाशिवाय तरणोपाय नाही. सर्वोदयाच्या गप्पा फोल आहेत. या लोकांना का देत नाही, जमीन का नाही यांना स्वतःची, जमीन श्रम करणाऱ्यांनाच, बाकीच्यांचा काय अधिकार ? कधी मिळणार यांना या गरिबांना न्याय ? कोठवर यांनी धीर धरावा ? आणखी धीर धरा सांगणे

म्हणजे हिंसा आहे. अहिंसा अहिंसा म्हणणाऱ्यांच्या हे कसे नाही लक्षात येत? माझे तर डोके सुन्न होऊन जाते !''

४. कलिंगडाच्या साली

मी तेव्हा मुंबईस होतो आणि ते उन्हाळ्याचे दिवस. रात्रभर मला झोप आली नव्हती. जेथे राहत होतो तेथे ना वारा ना काही. मुंबईत राहणे महा कर्मकठीण असे वाटले. मला नेहमी उघड्यावर रहावयाची सवय. परंतु मुंबईत मी उघड्यावर कोठे झोपणार? परंतु मी जेथे होतो तेथे झोपायला जागा तरी होती. माझ्यासमोर ती लाखो माणसे आली, जी एकेका खोलीत डझनावारी राहतात. त्यांची काय दशा असेल? फूटपाथवर ती झोपतात. परंतु पावसाळ्यात काय करीत असतील; कधी त्यांना रहायला नीट चाळी मिळतील ? रात्रभर या विचारातच मी होतो. पहाटे जरा डोळा लागला. परंतु लौकरच उठलो. एका मित्राला अगदी उजाडत भेटायला जायचे होते. उठणे भाग होते आणि चाळीतील हालचालींमुळेही लागलेला डोळा लगेच उघडला. शहरात केव्हाच रहदारी सुरू होती. बारा–एकला मिलमधील कामगार सुटतात. शेवटची ट्राम मुंबईला एक वाजता परतते. तो दोनतीन तासांनी पुन्हा सुरू. लोकलगाड्या तीनपासून पुन्हा सुरू. दूधवाले भय्यै तीन–साडेतीनपासून स्टेशनवरून दिसू लागतात आणि पाण्याचे तेव्हा दुर्भिक्ष. उन्हाळ्यामुळे पाणी

कमी. पहाटे तीन–साडेतीनपासूनच मायबहिणी उठायच्या. नळावर भांड्यांचे आवाज. धुण्याचे आवाज. परीक्षा जवळ आल्या होत्या. मुलेही लौकर उठून वाचू लागली होती. मी तेथे गॅलरीत कसा झोपणार ? सर्वत्र कर्ममय जागृती असता मी का लोळत राहू ? मीही उठलो. थोड्या वेळाने मित्राची भेट घ्यायला बाहेर पडलो.

मला ग्रँटरोडच्या बाजूला जायचे होते. दादरला गाडीत बसलो. वसईहून आलेली मंडळी अजून बाकावर झोपलेली होती. लोक त्यांना उठवीत होते. ते जांभया देत उठत होते. मी बाजूला बसलो. काय हे जीवन, असे मनात येई. कृत्रिम, अनैसर्गिक जीवन. दूधवाले भय्ये केव्हा उठत असतील? ते कष्ट त्यांनीच काढावेत आणि दिवसा तेथेच गुरांजवळ चाऱ्यावर झोपताना मी त्यांना पाहिले आहे. त्यांना कोणी उठवू लागले म्हणजे वाईट वाटे. परंतु सर्वांचीच धावपळ. कोणी कोणास दोष द्यावा ?

ग्रँटरोड आले. मी पटकन उतरलो. आता चांगले उजाडले होते. मी झपझप चाललो होतो. ते एक कुरूप दृश्य मला दिसले. मी काय पाहिले? झाडूवाले लांब केरसुण्यांनी कचरा गोळा करीत होते. झाडूवाल्या मायबहिणी गोळा केलेला कचरा टोपल्यांनी एकत्र करीत होत्या. वास्तविक ठायीठायी खांबांना कचरापेट्या आहेत. परंतु त्यात कपडे, कचरा, साले टाकायची आपल्या लोकांस अजून सवय नाही. सुशिक्षित माणसेही खिडकीतून साली साली फेकतात, फुटलेल्या काचा खळकन फेकतात. सार्वजनिक नीतीचा सद्गुणच नाही. आगगाडीत तेथेच शेंगा खाऊन साले टाकतील, संत्री खाऊन घाण करतील. तेथेच थुंकतील. सिगरेटची थोटके टाकतील. खिशातील कागद फाडून फेकतील. स्वच्छ डबा घाण करून ठेवतात आणि रस्त्यावरची घाण तर विचारूच नका. सार्वजनिक स्वच्छता हे राष्ट्र कधी शिकणार ?

उन्हाळ्याचे दिवस. खानदेशातील फळाची आठवण येई. तिकडील नद्यांच्या पात्रात उन्हाळ्याची फळे अपार होतात. टरबुजे, खरबुजे, साखरपेट्या, गूळभेल्या, नाना फळे. मुंबईलाही ती येतात. कलिंगडाच्या राशी मुंबईला ठायीठायी दिसत. फूटपाथवर कलिंगडवाले बसतात. फाकी करून ठेवलेल्या. येणारे-जाणारे घेत आहेत, खाऊन साली फेकत आहेत. असे सकाळपासून शेवटचा सिनेमा सुटेपर्यंत चालायचेच. तो लाल थंडगार गर ! कलिंगडे कापून देणारे जवळ एक भांडे ठेवतात. त्यात कापताना पडणारा रस साठवतात. तो रसही कोणी रसिक पितात ! लालसर सुंदर सर. कलिंगड अद्‌भूत वस्तू. फुलेफळे ही एक थोर सृष्टी आहे. कलिंगडाचा तो लाल रंग किती सुंदर दिसतो ! आणि मधून डोकावणाऱ्या त्या काळ्या बिया. त्या वाळूतून एवढा माधुरी प्रगत होते. हे रंग, हे रस नद्यांच्या वाळवंटातून मिळतात. गंमत वाटते नेहमी मला.

ते झाडूवाले कलिंगडांच्या सालीची घाण गोळा करीत होते. स्वस्तिक सिनेमाजवळची ती जागा. रात्रभर फोडी भरभर खाऊन साली फेकलेल्या आणि त्या साली नीट कोण खातो ? सारीच पटपट वरचा लाल भाग खाऊन, कुरतडून साली फेकलेल्या होत्या. गोळा केलेल्या त्या फोडींजवळ त्या कचऱ्याजवळ ती पाहा दोनचार मुले धावत आली. काय पाहिजे त्यांना ? त्या सालीकडे ती पाहत आहेत. त्यांचा का काही खेळ आहे? परंतु ती पाहा एक फोड एका मुलाने उचलली. ते अर्धवट उरलेले लाल लाल तो भराभर खाऊ लागला आणि ती सारी मुले घसरली. ज्या फोडीला थोडे अधिक लाल शिल्लक असेल तिच्यासाठी झोंबाझोंबी, मारामारी. त्या साली लवकर कचऱ्याच्या मोटारीत फेकल्या जातील म्हणून मुलांना घाई. एकीकडे खात असताना दुसऱ्या फोडीवर त्यांचे डोळे आशेने खिळलेले असत. त्या फोडी भराभर खाण्यासाठी त्यांचे दात शिवशिवलेले जणू असत.

मी ते दृश्य पाहत होतो. त्या मुलांना ताजी फोड कोण देणार ? आणि एक दिवस कोणी देईल. रोज कोण देणार ? सकाळ केव्हा होते आणि फार गर्दी ठायीठायी दिसू लागल्यापूर्वी त्या फोडी जाऊन केव्हा खातो असे त्या मुलांना होत असेल. काय ही दशा ! परंतु देशभर अशी दृश्ये ठायीठायी दिसत असतील. आंब्यांच्या साली, कोयी रस्त्यावर टाकलेल्या चुंबताना मी मुलांना पाहिले आहे. उकिरड्यावर टाकलेले अन्नाचे तुकडे गोळा करून ते खाताना कितीतरी जणांना मी पाहिले आहे. ही मुले का त्याला अपवाद होती!

माझे पाय पुढे जात ना. घाणीतल्या त्या साली. मी का त्या मुलांना स्वच्छतेवर प्रवचन देऊ ? असे खाऊ नये. घाणीतील त्या साली. आजूबाजूला थुंकलेले. झाडूने गोळा केलेल्या नका खाऊ. असे का त्यांना सांगू ? मी त्यांना स्वच्छता शिकवू जाणे, म्हणजे जखमेवर मीठ चोळण्याप्रमाणे झाले असते.

उन्हाळ्याचे दिवस ! दिवसभर ती मुले कलिंगडाच्या फोडींकडे आशाळभूत नजरेने बघत असतील. हजारो लोक खाताहेत आणि आपणाला ? ती तरी गरीब मुले होती. कुठे होते त्यांचे आईबाप, कुठली ती राहणारी? ना त्यांना शिक्षण, ना संस्कार. कधी कुठे मजुरी करतात, आणा अर्धाआणा मिळवितात. अधिक मागतील तर थप्पड खातात. मी त्यांच्याकडे बघत होतो. अंगावर चिंध्या, केस वाढलेले. कुठला साबण, कोठून तेल ? कुठे स्नान, कुठे भोजन ?

एका मुंबईत अशी हजारो मुले आहेत म्हणतात. जी कुठे तरी राहातात, कुठे तरी पडतात. मानवतेची ही विटंबना कशी थांबायची ?

मी माझ्या मित्राकडे जाणे विसरलो. मी विचारमग्न होतो. तसाच चौपाटीकडे वळलो. समुद्राच्या किनारी जाऊन बसलो, समुद्र उचंबळत

होता. माझे लक्ष त्याच्याकडे होते. माझ्या मनातही शत विचार उसळले होते. एकाएकी लोकमान्यांच्या पुतळ्याकडे लक्ष गेले. स्वराज्यासाठी तो महापुरुष झगडला. कुठे आहे ते स्वराज्य? सर्वांचे संसार सुखी करणारे स्वराज्य ? ज्या स्वराज्यात अशा मुलाबाळांसाठी बालगृहे असतील, जेथे त्यांची जीवने फुलविली जातील, जेथे त्यांचा स्वाभिमान जागा होईल, अशी स्थिती कधी येईल? असे स्वराज्य आणणे म्हणजे समाजवाद आणणे. समाजवादाची, सर्वांच्या विकासाची दृष्टी आल्याशिवाय समाजाचा कायापालट व्हायचा नाही ! मी लोकमान्यांच्या पुतळ्याला प्रणाम केला. ते स्वराज्य लवकर येवो, असे मनात म्हणून निघून गेलो.

९. दुसरे वस्त्र नाही

पुष्कळ वर्षांपूर्वीची गोष्ट. एका मित्राज़वळ मी बोलत होतो, चंपारण्यातील कथा मी सांगत होतो. एकदा कस्तुरबा एका किसान स्त्रीला अंग का धूत नाहीस, म्हणून विचारीत होत्या. ती शेतकरीण म्हणाली, ''काय सांगू आई, अंग धुवीन तर नेसू काय? नेसायला दुसरे वस्त्र असेल तर ना ? हे एक लुगडे कसे तरी गुंडाळले आहे. हे भिजवले, धुऊन वाळत टाकले तर मी काय नेसू ?'' कस्तुरबांनी ती गोष्ट गांधीजींना सांगितली. असे दारिद्रें या देशात. ती श्रमणारी माणसे धनधान्य निर्माण करणारी. परंतु त्यांना ना पोटभर घास, ना अंगभर कपडा. जमीनदाराच्या घरी वैभव. एकाएका जमीनदाराची तिकडे हजारो एकर जमीन. खपणारे मात्र शेतकरी. त्यांनी सारे धान्य निर्माण करावे. परंतु त्यांचा त्यावर हक्क नाही. कधी हे सारे बदलणार?

माझा मित्र गंभीरपणे ऐकत होता. एकाएकी त्याचे डोळे चमकले. पुन्हा ते शांत झाले. त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव मी पाहत होतो. जणू हृदय सागरातील काही तरी उठून उसळून वर येऊ पाहत होते. कशाची तरी तीव्र स्मृती त्याला होत असावी. वारुळातून भुजंग पाडावा, त्याप्रमाणे कोणता तरी प्रखर विचार त्याच्या अंतरंगातून बाहेर पडू पाहत होता.

''तू असा का ? काय सांगायचे आहे तुला?''

''सांगतो. महात्माजींच्या ज्या आमदाबादजवळ आश्रय त्या आमदाबादचीच एक रडणारी, संतापवणारी सत्यकथा तुला सांगतो. मी एकदा साबरमती आश्रम पहावा म्हणून गेलो होतो. अकस्मात गेलो. त्या बाजूला गेलोच होतो म्हणून म्हटले बघावा. महात्माजी तेथे जेव्हा राहत नसत. १९३० मध्ये दांडी प्रयाणाच्या वेळेस ते बाहेर पडले ते पडले. स्वराज्य मिळेल तेव्हाच आश्रमात परत येईन असे म्हणूनच ते बाहेर पडले होते. पुढे सेवाग्रामला ते राहू लागले. महात्माजी तेथे नसणारच हे मला माहीत होते. मी आश्रम पाहिला. हरिजन कार्याला तो दिलेला आहे. महात्माजींच्या कागदपत्राची सारी नोंद ठेवण्याचे काम तेथे एक सज्जन करीत होते. दक्षिण आफ्रिकेपासूनचा महापुरुषाचा पत्रव्यवहार. सरकारजवळचा, असंख्य मित्रांबरोबरचा, राजकारणी पुरुषांजवळचा. सांसारिकाजवळचा मुमुक्षूंजवळचा. महात्माजी येथे प्रार्थना करीत ती जागा पाहिली. अनेक पुण्यपावन स्मृती तेथे आहेत. एके काळी दधिची तेथे राही अशी दंतकथा. तेथे दुधेश्वराचे मंदिर, दधिचीची खूण म्हणून दाखवतात. एकीकडे स्मशान. एकीकडे तुरुंग. साबरमती कलरव करीत, प्रार्थना गुणगुणत सदैव वाहतच आहे.

भावनांनी ओथंबून मी परत येत होतो. सायंकाळ होऊन गेली होती.पश्चिमेकडचे रंग अस्तंगत होत होते. अधांर पसरू लागला. अमदाबादचे दीवे दिसत होते.साबरमतीचे पाणी काळसर निळसर दिसत होते. मी विचारमग्न जात होतो. साबरमतीच्या पुलावर आलो. मला तीरावर कोणीतरी दिसले. अंधार होता. कोण होते ते ? अशा वेळेस कशाला कोण तेथे आले होते. तेथे का डोह होता. कोणी अभागी का जीव द्यायला आला होता ! परंतु हे काय ? इकडे-तिकडे बघून नेसूंचे वस्त्र पटकन तीरावर ठेवून ती व्यक्ती पाण्यात शिरली. ती अंग धूऊ लागली. लांबसडक केस. ती एक स्त्री होती. तर

एकदम सारा लख्ख उजेड डोक्यात पडला. तेथे जरा अंधार होता. परंतु माझ्यासमोर भारतीय परिस्थितीचे चित्र स्वच्छ दिसू लागले. ती स्त्री दुरिद्री होती. त्या बिहारमधील किसान स्त्रीप्रमाणे हिलाही नेसायला दुसरे वस्त्र नव्हते. अंधारात गुपचूप येऊन वस्त्र दूर ठेवून ती स्नान करीत होती. ती बाहेर आली. ते वस्त्र पटकन गुंडाळून ती निघाली. मी तेथे खिळल्याप्रमाणे उभा होतो. मी काय बघितले, काय पाहिले. उघड्या भारतमातेचे ते करूण दृश्य होते.

अहमदाबाद शहरात शेपाऊणशे गिरण्या. कोट्यवधी वार कापडा तेथे रोज तयार होतो. हिंदुस्थानातील कापडाचा जवळजवळ पाचवा–सहावा हिस्सा एका अहमदाबाद शहरातून मिळतो म्हणतात आणि त्याच शहरात एका भगिनीला बदलायला दुसरे वस्त्र नाही ! लज्जारक्षणार्थ लुगडे नाही ! कदाचित तिचे कोणी त्या गिरणीत कामालाही असेल, लाखों वार कपडा तयार करून देत असेल; परंतु ती वस्त्रहीन आहे.

गिरणीत काम करणाऱ्या कामगारांच्या अंगावर मी चिंध्या पाहिल्या आहेत. त्यांची मुलेबाळे उघडी पाहिली आहेत. शेतातून खंडोगणती धान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यास पोटभर खायला नाही. गिरण्यांतून कोट्यावधी वार कापड तयार करणाऱ्या कामगाराला अंगभर वस्त्र नाही. मी त्या दिवशी विचारमग्न झालो. महात्माजींच्या आश्रमातून मी आलो होतो. महात्माजींचे शब्द मला आठवले. : ''जोवर मला लोकांच्या पोटात अन्न घालता येत नाही, अंगावर कापडा देता येत नाही तोवर त्यांना रामनाम कसे शिकवू ?'' स्वराज्य आणायचे आहे, एवढेच नव्हे तर खरे स्वराज्य आणायचे आहे. गरीबांचे स्वराज्य आणायचे आहे. नाही तर पुंजीपतींचे स्वराज्य यायचे.''

''खरे आहे तुझे म्हणणे. परंतु त्यासाठी समाजवादी रचनाच व्हायला हवी. समाजवादाशिवाय तरणोपाय नाही. समाज म्हणजे वेदांत असे मला वाटत असते. समाजवादी स्वराज्य भारतात येवो.''

६. गोपाळ

माझ्या लहानपणाची गोष्ट. कारण म्हणजे अति दरिद्री प्रदेश. आमच्या गावाला जिकडे–तिकडे कातळ. एका वाडीच नांवच कातळवाडी. तरी तेथेही श्रमणाऱ्यांनी दगडधोंडे फोडून शेती मधून मधून पिकवली आहे. कोकणातील फारच थोड्या लोकांना नेसूं धोतर असते. माझ्या गावातील गरीब जनता; कोठले त्यांना नीट नेसायला ? ते श्रमणारे जीव, ते लंगोटी लावूनच असतात. कोकणातील हे श्रमणारे जीव नीट वस्त्राने कधी नटतील, असे माझ्या मनात लहानपणापासूनच येई. नेसू, लंगोटी, खांद्यावर घोंगडी, हातात काठी, कमरेला विळा–कोयता असे ते शेतकरी माझ्या डोळ्यांसमोर येतात.

आमच्याकडे कामाला गडीमाणसे येत. कधी अंगण करायला, कधी कुंपण खनिवटा तयार करायला, कधी कुंपण घालायला, कधी मांडव घालायला, कधी घर चाळायला, कधी आंबे उतरायला– नाना कामांसाठी गडीमाणसे येत. कधी कधी काम असले म्हणजे गोपाळला आम्ही बोलवत असू. आम्हा मुलांचे त्याच्यावर फार प्रेम. तोही घरच्यासारखा होता. त्याचे कातळवाडीकडे घर होते. घर म्हणजे झोपडी. त्याच्या घराजवळ अळविणीचे

झाड होते. तो आम्हास पिकलेले अळू आणून द्यायचा. हिरवागार अळू; परंतु जरा कोठे पिकलेला असला तर तो आम्ही मुठीत धरून असू. भरभर तो मुठीच्या उबेनेच पिकत जाई. मौज. रानचे मेवेही गोपाळ आमच्यासाठी आणी. काजू आणी, बोंडे आणी, बकुळे आणी, करवंदे आणी आणि एकदा एक पक्ष्याचे सुंदर घरटे त्याने मला आणून दिले होते. गोपाळ प्रेममूर्ती होता. त्याला दोन–चार मुले होती. त्याची पत्नीही कामाला जायची. दळण–कांडण करायला जायची.

गोपाळ कामाला आला म्हणजे आमच्याकडेच जेवायला असे. आम्ही शाळेत गेलेले असू. परंतु दुपारच्या वेळेला थोडा वेळ आम्ही घरी असू. गोपाळ तेव्हा विसावा घेई. शाळा सुटून घरी सायंकाळी यावे तो गोपाळची घरी जायची तयारी असायची. ''आलांव शाळेतून?'' तो विचारायचा. किती घरोबा होता त्याचा–आमचा !

तुळशीचे लग्न जवळ आले होते. अंगण करायचे होते. पावसाळ्यात अंगण खडबडीत झालेले, नवरात्र उजाडले की, नवी अंगणी करायला कोकणात सुरुवात होते. घरांसमोर आणि घरांमागे स्वच्छ सारवलेली अंगणी, बाजूला झेंडू वगैरे फुले, तुळशी, दुर्वा. कोकणची ती स्वच्छ सुंदरता असते. ती साधी संस्कृती असते. गोपाळ अंगण खणायला आला होता. आम्ही मुलेही रविवार असल्यामुळे खणू लागलो होतो. जमीन अजून ओलसर होती. म्हणून खणायला सोपे होते. मोठमोठी ढिपळे एका घावाला आम्ही काढीत होतो. परंतु आम्हा मुलांच्या हाताला फोड आले.

''गोपाळ, तुझ्या हाताला फोड आले का रे ? बघू तुझे हात.'' आम्ही त्याला म्हटले.

गोपाळचा हात मी कधी विसरणार नाही. कष्ट करून टणक झालेला, घट्टे पडलेला तो पवित्र हात.

''आम्ही खणावे; तुम्ही खेळावे.'' गोपाळ म्हणाला. दुपारची वेळ झाली. आमची जेवणे झाली. गोपाळ कळशी घेऊन विहिरीवर गेला. आंघोळ करून तो जेवायला आला. आई त्याच्यासाठी पत्रावळ लावीत होती.

''केवढी पत्रावळ !'' मी म्हटले.

''अरे, गोपाळाला मोठीच लागते.'' आई म्हणाली, गोपाळ आंघोळ करून पडवीत येऊन बसला. निर्मळ, प्रसन्नपावन गोपाळ ! लंगोटी लावलेला तो कष्टणारा गोपाळ. आईने पत्रावळ मांडली. मीठ, चटणी, भाजी वाढली. भात वाढला. नमस्कार करून, ''वैनी, बसू ना !'' विचारून गोपाळ जेवू लागला.

''अरे, तुला लोणचे वाढते हो.'' आई म्हणाली.

''वाढा, आणि मिरचीही वाढा. तुमच्याकडची फोडणीची मिरची लई छान.''

आईने त्याला लोणचे, मिरची वाढली. तिने पुन्हा भात वाढायला आणला. पानभर भात वाढला.

''आं, किती वाढलास भात ?'' मी म्हटले.

''अरे, गोपाळाला पोटभर जेवू दे. सावकाश जेवण गोपाळ पुन्हा वाढीन हो.'' आई म्हणाली आणि आईने पुन्हा तिसऱ्यांदा भात वाढला. ताक वाढले. गोपाळ जेवत होता.

''गोपाळ, तू किती जेवतोस !'' मी म्हटले. गोपाळ क्षणभर काही बोलला नाही. परंतु थोड्या वेळाने म्हणाला,

''तुमच्याकडे येतो, त्या दिवशीच मी पोटभर जेवतो. रोज घरी एवढे कुठून खाऊ? मला तीन निठव्यांचा भात हवा. कुठून आणू घरी ? खरं ना वैनी ?''

''तू जेव पोटभर. त्या पोरांचे नको मनावर घेऊस.'' आई म्हणाली.

मी तेव्हा लहान होतो. गोपाळाच्या त्या शब्दांतील गंभीरता त्या वेळेस मला कळली नव्हती; परंतु ते शब्द अजून आम्हाला आठवतात. मी बहिणीकडे कधी गेलो, लहानपणाच्या आठवणी निघाल्या, की गोपाळचीही आठवण येते नि माझी बहीण म्हणते, कसा म्हणायचा गोपाळ, ''वैनी, तुमच्याकडे येतो तेव्हा पोटभर जेवतो. रोज घरी इतके तांदूळ कुठून आणू?'' कष्ट करणारा, श्रमणारा गोपाळ. त्याला का बरे पोटभर खायला मिळू नये? त्याला मालकीची जमीन का असू नये? जमीन असती तर तेथे खपता, पोटभर खाता. कधी मिळणार या श्रमणाऱ्यांना जमीन, स्वतःच्या सत्तेची जमीन समाजवाद येईल तेव्हा. जमीनदारी, खोती सारे प्रकार नष्ट होतील तेव्हा. खपेल, श्रमेल त्याची जमीन. ती वाटून द्या वा सामुदायिक सहकारी पद्धतीने पिकवा; परंतु त्यांना पोटभर जेवण मिळालं पाहिजे, अंगभर कपडा मिळाला पाहिजे. एवढेच नव्हे तर त्यास शिक्षण हवे, विश्रांती हवी, आनंद हवा. सारे जीवनच नवीन व्हायला हवे. केव्हा होईल हे सारे ?

१. पाला खाणारी माणसे

काही वर्षांपूर्वीचा तो अनुभव. चार–पाच वर्षे त्या गोष्टीला झाली. मी बोर्डीला गेलो होतो. तेथील सुंदर समुद्रशोभा रोज बघत होतो.

''तुम्ही जवळची आदिवासींची गावे बघायला याल? चला, नाही म्हणू नका.'' एक मित्र म्हणाले.

''जाऊ.'' मी म्हटले.

आणि आम्ही दोघे गेलो. पावसाळा नुकताच संपला होता. आजूबाजूला हिरवी पिवळी शेते. मधून मधून नाले होते. बांधाबांधाने जात होतो. एका बाजूला गवताळ भाग दिसला.

''हे का कुरण आहे?'' मी विचारले.

''ही खरे म्हणजे शेतीची जमीन आहे. परंतु गवताला भाव आहे म्हणून मालक गवतच करीत आहेण पुन्हा गवताचा खर्च नाही. एक राखोळी ठेवली म्हणजे झाले.'' मित्र म्हणाला.

''तिकडे अधिक धान्य पिकवा मोहीम आहे आणि इतके गवत वाढवले जात आहे. हे कसे काय?''

''अधिकाऱ्याची मूठ भरली की सारे चालते.''

''ही जमीन आदिवासींना का देत नाही?''

''आदिवासींना का शेती करायला येईल? उद्या स्वराज्यात त्यांना मिलिटरीत पाठवावे.''

''आदिवासी का माणसे नाहीत? तुमच्या शेतातून तेच राबतात. तुमच्या वाड्या तेच करतात. त्यांना सारे येईल. मिलिटरीत वेळ आली तर सर्वांनी जायला हवे. देशाच्या रक्षणासाठी उभे रहायला हवे. आदिवासींनीच का जावे? पारश्यांनी का नये जाऊ ? तुम्ही आम्ही का नये जाऊ?''

असे बोलत आम्ही चाललो होतो आणि लहान लहान झोपड्या दिसू लागल्या. एका झोपडीजवळ आम्ही आलो. झोपडीचे दोन भाग होते. एका भागात बकऱ्या बांधलेल्या होत्या. दुसऱ्या भागात माणसे राहत. एकीकडे बकऱ्यांची पोरे, दुसरीकडे आदिवासींची मुले. निजायला शिंदीची चटई. कापडे फारसे दिसलेच नाहीत. मातीची मकडी हीच इस्टेट. एक तरुण तेथे तापाने आजारी होता. मी त्याच्या अंगाला हात लावला. ताप पुष्कळ असावा. ना पांघरूण, ना औषध. ना फळ, ना दूध. त्या झोपडीत निराशा, दारिद्र्य, दैन्य यांचेच राज्य होते.

तेथे एक म्हातारी होती. अस्थिपंजरमय केवळ ती होती. लहानशी चिंधी नेसू होती. तिच्यासमोर एक पाटी होती. पाटीत चिरलेला पाला होता.

''कशाला हा पाला ?'' मी विचारले.

''हा शिजवतो नि खातो.'' ती म्हणाली.

''नुसता पाला? त्यात डाळ, तांदूळ, कण्या काही तरी मिसळीत असाल?''

''नाही रे दादा. आम्हाला कुठले डाळतांदूळ? आमची का शेतीवाडी

आहे? थोडी शेती खंडाने करतो. ते भात किती दिवस पुरणार ! मजुरी मिळाली तर करावी आणि हा पाला खावा. शेळ्या–बकऱ्या पालाच नाही का खात ? आम्ही तशीच. पाला थोडा फार मिळतो हीच देवाची कृपा. उद्या पालाही घेऊ नका म्हणून जमीनदार म्हणायचा. मग तर हवा खाऊनच राहावे लागेल.''

त्या म्हातारीचे शब्द बंदुकीच्या गोळीप्रमाणे हृदयात घुसत गेले तशी खाली मान घातली. क्षणभर तेथे उभे राहून दुसऱ्या झोपडीकडे मी निघालो.

तेथेही तसेच दृश्य. तेथे दोन मायबहिणी कसले तरी कंद विळीवर निशीत होत्या. कसले होते ते कंद ? ती रताळी नव्हती, तो बीट नव्हता, ते बटाटे नव्हते, कांदे नव्हते ती कणगरे नव्हती. ते करींदे नव्हते, कसले होते कंद?

''कसले हे कंद ?'' विचारले.

''रानातून आणले.''

''गोड आहेत वाटते ? बघू.''

त्या कंदाचा एक तुकडा मोडून मी तोंडात टाकला तो कडूकडू लागला.

''हे कडू कंद तुम्ही खाता? रताळी, बटाटे का नाही आणीत?''

''गरीबांची दादा थट्टा करू नये. बटाटे–रताळी तुम्हाला. डाळतांदूळ, गहू तुम्हाला. ती तुमची खाणी, आम्हाला कुठली ? आण आम्हाला ती सोसतील तरी का? जंगलचा पाला, जंगलचे कंद.''

''तुम्हाला हे कडू नाही लागत ?''

''हे कंद रात्रभर उकडून तसेच मडक्यात ठेवतो. त्यांचा राप सकाळला कमी होतो. कडूपणा कमी होतो. मग ते आम्ही खातो. एकदा सवय झाली म्हणजे सारे चालते.''

मी त्या श्रमजीवी लोकांना प्रणाम करून निघालो. ही आदिवासी जनता. हे मूळचे मालक. त्यांच्या जमिनी त्यांना केव्हा मिळतील ? केव्हा नीट राहतील, धुष्टपुष्ट होतील ? केव्हा त्यांची मुलेबाळे गुबगुबीत होतील ? घरदार, ज्ञानविज्ञान, कला, आनंद, विश्रांती सारे त्यांना कधी बरे मिळेल ? पिढ्या न् पिढ्या ही माणसे अर्धपोटी जगत आहेत. उपाशी लोकांना सद्गुणांची संथा नका देत बसू. आधी जमिनी द्या; मग दारू पिऊ नका सांगा. नुसत्या नैतिक गोष्टी निरुपयोगी आहेत. भगवान बुद्ध म्हणत, उपाशी माणसाला अन्न देणे म्हणजे त्याला धर्म शिकवणे. उपाशी माणसाची धर्मज्ञानाची भाषा अन्न ही असते. आमच्या हे कधी लक्षात येणार ? ही लक्षावधी जीवने कधी हसणार, फुलणार ?

''आपण परत जाऊ. दोन दृश्ये मला जन्मभर पुरतील. स्वराज्यात काय करायचे त्यांचे ज्ञान तेथे येऊन झाले, चला. आपण परत जाऊ.'' मी म्हटले.

आणि विचार करीत आम्ही दोघे माघारी गेलो.

८. हिंग कामगारांचे हाल

हिंग, हिरा हिंग याच्या जाहिराती असतात. हिंग म्हणजे फोडणीचा प्राण. स्वयंपाकघरात फोडणी होत असेल तर ओटीवर वास जातो. कोकणातून लहानपणी कधी मुंबईस आलो तर येताना हिंगाचा डबा घेऊन ये असे निरोप असायचे. ताकाच्या फोडणीला हिंगाचा वास किती छान येतो !

आपण नाना वस्तू, नाना पदार्थ उपभोगीत असतो. परंतु आपणास त्या वस्तू, ते पदार्थ मिळावेत म्हणून कितीजण तरी तडफडत असतात ! किती जणांची तरी आयुष्ये जगाला सुखाने नांदता यावे म्हणून कमी होत असतात. जमशेटपूरचा टाटांचा लोखंडाचा कारखाना देशाला लोखंड, पोलाद पुरवीत आहे. परंतु हजारो कामगार तेथे भट्टीजवळ राबून क्षीणायु होत असतात. पंधरा वर्षांहून अधिक काम म्हणे तेथे करता येत नाही. डोळे बिघडतात, आयुष्य कमी होते.

परंतु टाटांच्या अजस्र भट्ट्यांनीच आयुष्य कमी होते, डोळे अधू होतात, असे नाही, तुम्ही आम्ही रोज जो हिंग वापरतो, तो तयार करणाऱ्यांचेही डोळे असेच अधू होत असतात. त्या शेकडो श्रमणाऱ्यांची आपणास कल्पनाही नसते.

मुंबईच्या मांडवी भागात एका मित्राबरोबर एकदा गेलो. तिकडे सारी श्रमणाऱ्यांची वस्ती, मोठमोठे धंदेवाले, वखारीवाले तिकडे आहेत आणि त्यांच्या वखारीतून शेकडो कामगार काम करता करता बेजार होत असतात. इकडील कामगारांच्या संघटना नाहीत. मुंबई सरकारचा औद्योगिक कलह निवारण कायदा तिकडे मोठमोठ्या उद्योगधंद्यांना लागू पडतो. परंतु इकडे यांत्रिक उत्पादन थोडेच आहे ? इकडे हमाल लोक. कोणी खंडोगणती धान्याचे पीठ तयार करीत असतात ! नाकातोंडात ते पीठ जात असते. परंतु मालक देईल ती मजुरी. त्यांची संघटना कोण करणार? कोणी पीठ तयार करणारे, तर कोणी, कुटून कुटून हिंग तयार करणारे. हिंग तयार करण्याची कहाणी मोठी दुःखदायक आहे.

''तुम्हाला हिंग कामगारांना बघायचे आहे ? येता ?'' मित्राने विचारले.

''हिंग तयार करतात म्हणजे काय?''

''चला. आपण पाहू.''

या मित्राबरोबर त्या लहानलहान रस्त्यांतून मी जात होतो. सर्व हिंगाचा उग्र दर्प पसरला होता. हिंग कुटायचा आवाज येत होता. बायामाणसेही काम करीत होती. एका घरात आम्ही शिरलो. लहानशा जिन्याने वर गेलो. काही मंडळी विश्रांती घेत होती. आम्ही जाताच ते उठले. त्यांच्या गळ्यात माळा होत्या. ते वारकरी असावेत. भिंतीवर तसबिरी होत्या. तेथेच झोपावे, तेथेच बसावे, तेथेच भजन, तेथेच भोजन. ना घर, ना दार. कोठे तरी सार्वजनिक नळावर आंघोळ. कोठेतरी सार्वजनिक शौचकूपात मलमूत्र विसर्जन असे ते घरदारहीन लोक होते. काहीजण विश्रांती घेत होते; परंतु काहींचे काम चालूच होते. परदेशातून, अफगाणिस्तानातून वगैरे अस्सल हिंग येतो. तेथे तो हिंग फोडतात आणि त्यात लाकडी तुकडे मिसळतात. लाकडी भुसा व

अस्सल हिंग याचे मिश्रण करण्याचें काम येथे चालत असते. मूळ हिंगात किती लाकूड मिसळतात, हरी जाणे ! अशा रीतीने अपार नफा कारखानदार मिळवीत असतो. त्यांचे काम एकच, अस्सल हिंग आणून त्यात लाकडी भुसा मिसळून तो वाढवायचा नि पैसा कमवायचा.

मी तेथे होतो. परंतु तो उग्र वास मला सहन होईना. एखादे वेळेस कपाळ दुखताना हिंग उगाळून कपाळावर घालतात. परंतु त्याचा किती मिरमिर असतो ! डोळ्यांना तो हात लागला तर डोळा सारखा चुरचुरत राहतो. मग या लोकांचे कसे होत असेल ? मिठागारात काम करणाऱ्यांच्या पायांना ज्याप्रमाणे क्षते पडतात, उन्हात चमकणाऱ्या मिठात काम करून त्यांचे डोळे अधू होतात. तसाच प्रकार येथेही असेल. तेथे बसलेल्या बंधू-भगिनींकडे पाहून मला वाईट वाटले.

''तुमच्याने कसे करवते हे काम? किती उग्र हा दर्प ! मी थोडा वेळ येथे आहे. तोच कसे तरी होत आहे, वर्षानुवर्षे तुम्ही हे काम करता?'' मी विचारले.

''हौसेने का दादा काम करतो? पोटासाठी सारे करायचे. आवडी-निवडीचा प्रश्न थोडाच आहे? मालक शंभराचे हजार करतो. खऱ्या हिंगात लाकडू मिसळायचे आणि पैसे मिळवायचे. तो हिंग फोडताना आणि त्यात लाकूड मिसळून कुटताना आमचा जीव हैराण होतो. डोळे तर सारखे चुरचुरत असतात. पाणी येते. त्या पुन्हा हात लागला तर आणखीच चुरचुर आणि हातांची नुसती आग होते. तो अस्सल हिंग असतो. रद्दी हिंग लागला डोळ्याला तरी असह्य होते. मग आमची काय होत असेल दशा, कल्पना करा.'' तो कामकरी सांगत होता. त्याचे डोळे मिणमिण करीत होते. ते तेजस्वी डोळे निस्तेज होत होते. मी काय बोलू ?

''तुम्ही येथे किती वर्षे काम करता?'' मी पुन्हा विचारले.

''येथे फार वर्षे काम करता येत नाही,कापडाच्या गिरणीत तीस तीस वर्षेही काम करतात; परंतु येथे नाही करता येणार. दहा–पंधरा वर्षे होताच डोळे बिघडू लागतात. हे हिंगफोडीचे काम म्हणजे आंधळे करणारे डोळ्यांना हा उग्र वास सहन होत नाही, आम्ही शेवटी आंधळे होते, कमी दिसू लागले की संपले काम. पुन्हा बेकार ते बेकार !''

''मालक तुमच्यासाठी काय करतो ?''

''भरपूर काम होईनासे झाले तर घालवून देतो. डोळे अधू झाले आहेत. जरा सबुरीने घ्या. तितके काम नाही होत साहेब, असे म्हटले तर शिव्या मिळतात. तुम्हा आंधळ्यांना पोसायला हा काय पांजरपोळ आहे ? असे मालक म्हणतो. घरी चालते व्हा, मरा, येथे का फुकट मजुरी देऊ ? काम नसेल होत तर राहता कशाला? अशी मालकांची मगरूर बोलणी काय सांगायचे तुम्हाला ? आपल्या देशात माणूस होणे पाप. व्यापारी लोक पांजरपोळ ठेवीतील व आंधळ्या, लुळ्या गायीगुरांना पोसतील. कबुतरांना दाणे घालतील. मुंग्यांना साखर पेरतील, कुत्र्याला खिरी देतील. परंतु या देशात माणसांची किंमत नाही. आम्ही आमचे अमोल डोळे देऊन यांच्या खिशात लाखो रुपये ओततो. आम्ही आमचे अमोल डोळे देऊन यांच्या खिशात लाखो रुपये ओततो. आम्ही येथे उग्र वासात झोपतो. ना कोठे नीट खोली, ना निवारा. सारे जीवन येथे दडवायचे, आंधळे होण्यासाठी येथे काम करायचे. पुढची शाश्वती नाही.''

एक भगिनी म्हणाली, ''फोडणीला हिंग लागतो. परंतु येथे आमच्या दुःखावर डागणी बसते. घरोघरी हिंग घेतात. लोणच्याला हवा, मिरचीला हवा, परंतु लोकांना हिंग मिळावा म्हणून आम्ही किती दुःख भोगतो ! डोळे

गेल्यावर कोण पुसतो दादा ? आमची नाही काही व्यवस्था, ना कोणी घेत दादफिर्याद.''

''तुम्हाला पंधरा वर्षानंतर वृद्धवेतन मिळायला हवे. डोळ्यांना काही तरी संरक्षण मिळेल असे करायला हवे. पंधरा वर्षानंतर तरी तुम्हाला आराम नको का ?'' मी म्हटले.

''तुम्ही म्हणता खरे; परंतु हे कसे व्हायचे ? येथे ना कायदा ना वायदा. मालक वाटेल तेव्हा नको म्हणतो, चालते व्हा म्हणतो. त्याची लहर कायदा. कधी येणार गरिबांचे स्वराज्य? लई ऐकले आजवर; परंतु तो सोन्याचा दिवस येईल तेव्हा खरा.''

''तुमच्या संघटनेशिवाय कसा येणार तो दिवस ? तुम्ही संघटीत झाले पाहिजे. संघटनेमार्फत सरकारकडे दाद मागितली पाहिजे. वर्तमानपत्रातून स्थिती जाहीर केली पाहिजे. खरे ना ? आपणास आपण होऊन कोण देणार? नुसते रडून का होणार नाही. तुमची हिंग कामगार संघटना उभी करा. मालक त्रास देतील. तोंड द्या. एकजूट ठेवा. मी तरी काय सांगू?''

''वर्तमानपत्रातून आमची हकीकत कोण देतो ?''

''नवी वर्तमानपत्रे निघतील समाजवादी पक्षाची. ती तुमच्या दुःखाला वाचा फोडतील.''

''छान होईल. समाजवादी पक्षाला यश येवो.''

''यश तुम्ही द्यायचे. सर्वत्र समाजवादी पक्षाला पाठिंबा द्यायचा. समाजवाद, असे सर्वत्र झाले पाहिजे. हे आपलेच काम आहे.''

''आमच्याकडे कोणी पाठवीत जा. आम्ही करू संघटना. समाजवादी पक्षाला ती जोडू.''

''छान ! मी येतो आता.''

त्यांचा निरोप घेऊन मी गेलो. परंतु हिंग फोडणाऱ्या बंधू–भगिनींचे ते मिणमिण करणारे डोळे सारखे माझ्या डोळ्यांसमोर येत असतात. पळीत फोडणी पाहिली की, ती आंधळी होणारी, हिंगाचा उग्र दर्पात जळणारी ती जीवने माझ्या डोळ्यांसमोर उभी राहतात. वर्तमानपत्रातील हिंगाच्या जाहिराती वाचन माझ्या मनात अपार विचार उसळतात. त्या श्रमणाऱ्यांना किती दिवस हे असे नरकप्राय जीवन कंठावे लागणार ? ना आनंद, ना विश्रांती आणि अखेरीस ते आंधळेपण ?

याला उपाय एकच. समाजवादी समाजरचना निर्माण व्हायला हवी. सर्वांना शाश्वती हवी. सर्वांची जीवने मोलाची आहेत. ही जाणीव तेव्हाच येईल. आजच्या समाजरचनेत मानवी जीवन मातीमोल आहे. आजची रचना मानवभक्षक आहे, मानवसंहारक आहे. ही रचना मानवरक्षक, जीवनविकास अशी करायची आहे. सारे समाजवाद आणण्यासाठी धडपडू तरच हे होईल. तोच युगधर्म–मानवधर्म!

१. पडका धक्का

''आमचा गाव मध्यवर्ती. आजूबाजूला पाचपंचवीस खेडी. येथे प्रसूतिसदन व्हायला हवे. आमच्या गावच्या लोकांनी त्यासाठी जमीन विकत घेऊन ठेवली आहे. पावसाळ्यात फार अडचण पडते. तिकडे गोव्याची हद्द, इकडे अनेक खाड्या, तिकडे जाता येत नाही. इकडे काळी नदीची खाडी. पावसाळ्यात कोणी भारी आजारी पडला तर जवळपास ना दवाखाना, ना डॉक्टर. विशेषतः बाळंतिणीची फार गैरसोय होते. त्यांना पावसातून कोठे न्यायच? शिवाय तो धक्का नीट नाही. ते तीस हजार रुपये जमलेले आहेत ना? या गावीच मॅटर्निटी होम करा, नाही म्हणू नका. त्या गावच्या प्रमुखांनी कलेक्टरसाहेबांस सांगितले. परंतु कलेक्टरांची मर्जी दिसेना. कमिशनरसाहेबांकडेही अर्ज गेला. परंतु दाद कोण घेतो? शहरांतून साऱ्या सोयी केल्या जात आहेत. परंतु खेड्यापाड्यातील लोक उठल्या-बसल्या लांब शहरात कोठे जातील ? दहा-दहा वीस-वीस खेड्यांच्या मध्ये मॅटर्निटी होम हवे. तेथे इतर औषधांची सोय असावी. जेथे वाहनांची अडचण असते, तेथे तर मरणावाचून गत्यंतर नसते.

त्या गावचे लोक दुःखी कष्टी झाले. आसपासच्या गावकऱ्यांचीही निराशा झाली. काय करतील बिचारे? आणि आमची काळी त्याच गावची. दिसायला काळीसावळी; परंतु मोठी तरतरीत पोर. लहान होती तेव्हाही रानात जाई नि हिरवागार चारा कापून आणि नि विकी. एकदा केवढा मोठा साप तिने मारला ! तिच्या निर्भयपणाचे लोकांना आश्चर्य वाटायचे. ती उंच झाडावर चढे, जणू खारखुंडीच आणि विहिरीतही उड्या मारायला, पोहायला शिकली होती. आईबापांची ती आवडती. साऱ्या गावची आवडती. परंतु पुढे लग्न झाले. जवळच्या गावचा कृष्णा मुंबईला छापखान्यात कामाला होता. त्याच्याशी लग्न झाले. लग्न लावल्यावर कृष्णा एकटाच मुंबईला गेला. कारनॅक बंदराच्या बाजूला त्याला लहान खोली मिळाली. त्याने काळीला बोलावले.

आज काळी नवऱ्याच्या रोजगारावर जात होती. नवऱ्याच्या मित्राबरोबर निघाली. लक्ष्मण त्याचे नाव. आईबापही पोचवायला आले. खाडी ओलांडून पलीकडे जायचे होते. सारी तेथवर पायी आली. पलीकडे मोटर होती. काळी तेथे उभी होती. नव्या खणाची अंगात चोळी होती. नेसू नवीन चीट होते. कृष्णानेच ते पाठवले होते.,नावते माणसे चढू लागली. एका बाजूला फरशी जरा फुटली होती. धक्का जरा कोसळला होता आणि शेवाळाने निसरडे झालेले. लोक जपून जात होते आणि तेथे पाण्यातून जावे लागे. तो दोन हात धक्का नीट वाढवते तर ? परंतु कोण वाढविणार नि बांधणार ? म्हातारीकोतारी डोक्यावर ओझी घेऊन तशीच धडपडत जात होती. काळी आईबापांच्या पाया पडली. आईने तिला पोटाशी धरले.

''उगी, नको रडूस. पुढे शिमग्याला ये.'' आई म्हणाली.

''पोरी, रडतेस काय ? नवऱ्याकडे जाताना हसायचे की रडायचे?''

एक म्हातारा म्हणाला. काळीच्या डोक्यावर लहानसा गोणता होता. हातात एक पिशवी होती. पिशवीत काजूगर होते आणि गोणत्यात फणस होता, आणखी काही सामान होते. काळी नावेत बसली.

''थांबा, जरा थांबा.'' एक म्हातारी ओरडली. ती घाईघाईने येत होती. परंतु तिचा पाय घसरला. पडायचीच पाण्यात परंतु कोणी हात दिला.

''अग म्हातारे, का जीव द्यायला आलीस ?'' खलाशी म्हणाला.

''मेली तर काय झाले ? म्हाताऱ्यांचे काय काम ?'' कोणी थट्टा केली.

''आणि तू मेलास तर ? मला का मारतोस? माझी चार नातवंडे आहेत त्यांना का मी नको? म्हणे म्हातारी मेली म्हणून काय झाले ! तुम्हीच मरा. काय तुमचा उपयोग ? म्हातारीला गर्दीत पुढेही जाऊ देत नाही. आधी तुम्ही घुसता; हा तुमचा तरण्यांचा उपयोग !''

''पुरे तुझी बडबड. बस खाली.'' खलाशी म्हणाला.

नाव निघाली. काळी आईबापांना खुणावीत होती. तिच्या डोळ्यांतून पाणी येत होते. दूर मुंबईस जाणार. शेजारीपाजारी कोण असतील? अंजारी पडले तर कोण? लहानशा खोलीत संसार मांडायचा. ना तेथे अंगण, ना मोकळी जागा. ना डोंगर, ना माळ. ना चढायला झाड, ना डुंबायला नदी. काळीला काळजी वाटत होती.

नावेत नाना लोकांची नाना प्रकारची बोलणी चालली होती.

''येथे जरा धक्का नीट बांधला तर? किती अर्ज केले. मागे ते इंजिनिअर येऊन गेले. हजार रुपयात काम होईल. परंतु अजून आरंभ होत नाही. तिकडे कोटीकोटींच्या योजना कागदावर आहेत. परंतु येथे हे

साधे काम होत नाही.''

''अहो, हा वेडावाकडा धक्का आहे. तोही मागे गोरा साहेब पडला म्हणून झाला. आता कोणी काँग्रेसचा साहेब पडेल तेव्हा होईल हात दोन हात नवा धक्का.''

''काँग्रेसचा साहेब आपल्या खेड्यापाड्यात येतील कशाला? तुम्ही आम्हीच पडू. आता उद्या पावसाळा सुरू होईन. नाव कधी रात्रीही सोडावी लागते. कोणी आजारी पडतो, कधी बाळंतीण अडते. नाना अडचणी. येथे नाही डॉक्टर. नाव ओलांडून पलिकडे जाऊ तेव्हा डॉक्टर नि साऱ्या सोयी. परंतु पावसाळी हवेत, वाऱ्यापाण्यात येथे कसे चढायचे? रातच्या अंधारात काय फजिती होते येथे ! मागच्या वर्षी त्या सीतारामचे पोट दुखत होते, त्याला रात्री नावेत घालून नेले. काय त्रास ! नाव दूर उभी. हा धक्का पडलेला.''

''गांधी बाप्पा गेला. आता कोणी नाही गरीबांकडे ध्यान द्यायला.'' ती म्हातारी म्हणाली.

''म्हातारी बोलली !'' कोणी म्हणाले.

'सतिला गांधीबाप्पाही माहीत आहे.'' दुसरा हसून म्हणाला.

''अरे, त्यांचे नाव साऱ्या दुनियेला माहीत आहे. देवादिकांना माहीत आहे. माझ्या घरात त्यांचा फोटो आहे. त्याला फूल वाहिल्याशिवाय मी पाणी पीत नाही. म्हातारी म्हातारी म्हणून माझी टवाळी करता; पण तुमचे गांधीबाप्पावर प्रेम असते तर अशी म्हाताऱ्या माणसाची टवाळी नसती केलीत. आहे गांधीबाप्पावर तुमचे प्रेम?''

''शाबास म्हातारे !''

''फाजील आहात तुम्ही. तुमची शाबासकी नको मला. बस तुझी

शाबासकी घेऊन !''

नाव झरझर जात होती आणि काळी एकदम उभी राहिली. आईबाप दिसतात का ती बघत होती.

''अग, खाली बस पोरी.''

''ती आईकडे बघते.''

''आता नवऱ्याकडे बघायचे तर आईकडे कशाला? मुंबईला चाललीस ना ? आता तूच होशील आई थोड्या दिवसांनी. बस खाली आणि त्या गोणत्यांत काय आहे ?''

''मासे की काय ?''

''फणस आहे वाटते ? वास सुटलाय.''

''नवऱ्याला फणस घेऊन चाललीस पोरी?''

''आणि चुंफायला आंबे ग ?''

अशी बोलणी चालली. कोणी हसले काळी लाजून खाली बसली. नाव तीराजवळ आली. लोकांची आता उतरायची गर्दी. मघा चढायची; आता उतरायची. व्यवस्था माहीतच नाही.

''त्या म्हातारीला आधी उतरू द्या.'' कोणी थट्टेने म्हणाला.

''येथे सरळ उतरायचे. येथे कोणी पडणार नाही. घाबरू नको म्हतारे.'' दुसरा म्हणाला. म्हातारी बोलली नाही. काळी आणि लक्ष्मण उतरली. मोटार तयारच होती. मोटारीत दोघे बसली. घनदाट जंगलात रस्ता होता. अजून समुद्र मधून मधून दिसत होता. स्वच्छ फेस दिसत होता. काळी समुद्राकडे बघे आणि तिचा हृदयसमुद्र भरून येई. वाटेत सतीच्या कट्ट्यावर ती उतरली. तिने तेथे नारळ ठेवला. फुले वाहिली. ती पुन्हा मोटारीत बसली आणि एके ठिकाणी वाटेत बकुळीच्या फुलांचे गजरे विकायला

होते. तिने एक गजरा घेतला, आंबाड्यावर बांधला. फुलांची काळीला फार हौस.

मोटार स्टेशनवर आली. रात्र होती. लक्ष्मण व काळी यांनी फराळ केला. काळीला घास जाईना.

''रडू नकोस'' लक्ष्मण म्हणाला.

''लहान भावंडांची आठवण येते. आईची आठवण येते.'' ती म्हणाली.

''उद्या मुंबईला जाशील, सिनेमा बघशील, आईबापांना विसरशील.''

''त्याना कशी विसरेन दादा?''

फराळ झाला आणि पुण्याला जाणारी गाडी आली. कशी तरी लक्ष्मण नि काळी गाडीत चढली. तिच्या गोणत्यावर एकाने ट्रंक ठेवली.

''अरे, फणस फुटेल दादा.'' ती म्हणाली.

''आणलास कशाला फणस ?'' तो गृहस्थ म्हणाला. लक्ष्मण रागावला त्याने ट्रंक दूर लोटली. लोकांनी शांत केले आणि काळी त्या टंकेवर बसली.

''तुलाच बसायला झाली की नाही?'' ट्रंकेचा मालक म्हणाला.

काळी काही बोलली नाही. मधून मधून तिचा डोळा लागे. ती का मोठा होती? पंधरा वर्षांची असेल नसेल आणि केव्हा तरी मिरज गेले. सातारा गेला. पुणे आले. काळी उतरली. लक्ष्मणने सारे सामान उतरले. मुंबईच्या गाडीत दोघे जाऊन बसली. वेळ होता गाडीला. दोघे तोंड धुवून आली. लक्ष्मणने काळीला चहा दिला. स्वतःही घेतला. निघाली मुंबईची गाडी. काळीची मुखकळी हसत होती. मध्येच ती हसे. पुन्हा गंभीर होई आणि कर्जतला तिने करवंदे घेतली. दोन द्रोण लहान पिशवीत ठेवले.

''त्यांना होतील.'' ती म्हणाली.

''इतक्यात त्याची काळजी करू लागलीस तू !'' लक्ष्मण म्हणाला आणि दादर आले. कृष्णा स्टेशनवर आला होता. आता लोकल गाडीतून मशिद बंदरला जायचे होते. कृष्णाने काळीकडे पाहिले. तिने मान खाली घातली.

''पिशवीत काय आहे ?''

''काजू, करवंदे.''

''आणि गोणत्यात फणस वाटते ? छान ! कशाला ओझे आणलेस?''

काळी काही बोलली नाही. लोकल गाडीत सारी बसली. लक्ष्मच चिंच पोकळीस उतरला आणि दोघे मशिदला गेली. उतरली. व्हिक्टोरिया करून नवरा-बायको निघाली. काळी गर्दीकडे बघत होती. आणि ती चाळ आली. ती लहानशी खोली. कृष्णाने स्वयंपाक केला होता. आज त्याची रात्रपाळी होती, जेवून काळी निजली.

आणि दिवस जात होते. कृष्णा सिनेमाला तिला नेई, निरनिराळी ठिकाणे दाखवी. तो तिला फुलांची वेणी आणी आणि काळीने आता पोलकी शिवली. ती निराळी दिसू लागली. एके दिवशी कृष्णाने तिला कुडी आणली.

''कशाला ही ?'' ती म्हणाली.

''स्वस्त असतात ही. ही खरी मोती नव्हते. परंतु दिसतात छान. गरीबाला बेश आहे. तुझ्या कानात शोभतील. घाल.''

आणि तिने घातली. काळीच्या कानात मोती झळाळली. पावसाळा संपला. गौरीगणपतीचे दिवस गेले. दसरा-दिवाळी तेही दिवस आले नि गेले.

काळीला बरे नव्हते. वांत्या होत. तापही आला. शेजारची म्हातारी म्हणाली,

''घाबरू नकोस पोरी. तुला दिवस गेले आहेत. हे आहेत डोहाळे. चार दिशी बरी होशील. बाळ पोटात वाढू लागले.''

आणि थोड्या दिवसांनी काळी बरी झाली. तिच्या तोंडावर तेज फुलले. ती आनंदी दिसे. किती हसे ! आणि कृष्णा सारी हौस पुरवायचा. त्याने तिला हिरव्या रंगाचे लुगडे आणले. काळीला तर आवडले. पुढे माहेराहून कागद आला. आईबापांनी काळीला घरीच बाळंतपणाला बोलावले होते. कृष्णाने रजा घेतली. काळीला घेऊन तो निघाला. काळी आईबापांना भेटली, भावंडांना भेटली. कृष्णा आपल्या आईबापांना भेटला. दोन दिवस तो होता; परंतु त्याला परत जाणे भाग होते.

''जपा. मी जातो. डॉक्टर लागला तर बोलावा. पैशाकडे पाहू नका.'' सासऱ्याला म्हणाला.

''जावा तुम्ही. काळजी घेऊ.'' सासरा म्हणाला. कृष्णाने काळीजवळ पंचवीस रुपये देऊन ठेवले. तो गेला. काळी दूरवर बघत होती.

उन्हाळा संपत आला. काळी जपून होती. फार आंबे खात नसे. फार फणस खात नसे. तिची भावंडे करवंदे आणीत, जांभळे आणीत, परंतु काळी म्हणे, नको. बाळाला बाधेल तिला वाटे. एवढीशी काळी, परंतु ती आई होणार होती. पोटातील बाळाला ती जपत होती.

रोहिणी आल्या. पाऊस सुरू झाला. सों सों वारा वाहत होता. यंदा लौकरच पाऊस सुरू झाला, शेतकऱ्याची कोण धांदल ! कोणाची भाजावळही राहिली होती. कोणाची घरे शिवायची होती. काळीचे घर शिवून झाले होते. आईबापांना तिची काळजी. रोहिणी नक्षत्र गेले आणि मृग आले. पावसाची झड सुरू झाली.

सायंकाळची वेय. काळीचा बाप अजून शेतात होता. काळीचे पोट

दुखू लागले. आई जवळ बसली. गावातील सुईण आली. भावंडे जेवून झोपली. बाप घरी आला. परंतु पोट फार दुखे, काळी रडू लागली. सुईण म्हणाली, ''लक्षण बरे नाही.'' आता काय करायचे ? बाहेर पाऊस. नाव तरी कोण सोडील? वारा धों धों करीत होता.

तरीही काळीच्या बापाने गाडी जुंपली. कंदील घेतले लावून. दोन–चार मित्र बरोबर निघाले. गाडीत गादी घालून काळीला उचलून ठेवण्यात आले. जवळ आई बसली. काळी विव्हळत होती. गाडीचे धक्के लागत होते.

पावसांतून गाडी आली आणि काळीनदीची खाडी आली नावाडी नाव सोडणार का? त्यांची खूप प्रार्थना करण्यात आली. ते तयार झाले. काळीला ते पहिले मुंबईला जाणे आठवले. नावेतील लोकांची ती बोलणी आठवली. कोणी आजारी पडले, कसे जायचे, धक्का नीट नाही ते शब्द आठवले आणि वडिलांनी तिला उचलून घेतले. पाठोपाठ मित्र होते. आई होती. ''जपून चाल'' नावाडी सांगत होते. परंतु प्रभूची इच्छा निराळीच होती बापाचा पाय घसरला नि काळी पडली. नाव आणि मोडका धक्का यांच्यामध्ये ती सापडली. वाऱ्याने नाव तिच्यावर आपटली. काळीची किंकाळू ऐकू आली. तेथील प्रसंग कसा वर्णू ? एक नवी बाळ जन्माला येत हते; परंतु ते जन्माला न येता आईलाच घेऊन गेले. पाऊस पडत होता. शेते हिरवीगार होत होती. सृष्टीच नवजीवन येत होते, परंतु येथे मरण होते नावाड्यांनी काळीला वर काढले. पलिकडच्या तीरावर तिला नेण्यात आले.

''आता आत नाही घेता येणार. सकाळी आठ वाजता.'' तेथील शिपाई म्हणाले.

''अहो, प्राण आहे का बघा.'' काळीचा बाप म्हणाला.

ती मंडळी तेथे रडत बसली आणि दोन तासांनी डॉक्टर आले.

''सारे खलास !'' ते म्हणाले.

सकाळी पुन्हा पंचनामा. परंतु पाण्यात पडून मृत्यू सर्वांनी सांगितले.

आई–बाप प्रेत घेऊन परत आले. शेवटचे संस्कार झाले. भावंडे रडत होती. शेजारीपाजारी रडले. काळी, कशी होती पोर ! साऱ्या गावची ती आवडती. मुंबईस गेली काय, आली काय, देवाघरी जाते काय !

कृष्णा पत्राची वाट बघत होता. तो ते करुण पत्र आले, काळीवर त्याचे प्रेम. दोन दिवस जेवला नाही. त्याची खोली काळीने सजवली होती. तेथे गांधीजींचे चित्र होते. काळी गांधीबाप्पांना नमस्कार करायची. कोठे गेली काळी?

त्या मोडक्या धक्क्याने तिचा बळी घेतला, आणखी असे किती बळी तेथे जाणार ?

१०. श्रमणारी लक्ष्मी

''बय, नको जाऊस कामाला. तू घरीच रहा आज. राहातेस का ?'' लहान बाबू म्हणाला.

''जायला हवं मला. कांडण आहे. न जाऊन कसे चालेल ? मी दोपारची येऊन जाईन हा. तू पडून रहा. दादाकडून येताना भात, लोणचे घेऊन येईन. हिंडून रहा. बाहेर जाऊ नकोस.'' लक्ष्मी बाबूच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाली.

''बाबा कुठे गेले ?''

''कुठे गेले देवाला माहीत. खरी आले तर बसतील तुझ्याजवळ. कामाला जायला ते आजारी असतात. गप्पा मारायला, चिलीमी ओढायला नसतं आजरीपण. काय करायचे ? तू पडून रहा हं.'' ती त्याच्या अंगावर पांघरून घालून म्हणाली.

ते केंबळी लहानसे घर होते. लक्ष्मी आणि तिचा नवरा रामजी तेथे राहत. लक्ष्मीला तीन मुले. मोठा मुलगा सात वर्षांचा. दुसरी मुलगी आणि तिसरा हा बाबू. मोठ्या मुलाचे नाव विठू. मुलीचे नाव काशी. विठू शेण

गोळा करायला गेला होता. काशी, 'आई येणार आहे कांडायला' असा निरोप सांगायला गेली होती. लहानगा बाबू तापाने दोन दिवस आजारी होता. लक्ष्मीचा पाय घरातून बाहेर पडत नव्हता. परंतु कामाला न जाईल तर पोटात काय , संसार कसा चालवायचा ? लक्ष्मीचा नवरा रामजी दमेकरी झाला होता आणि जरा पांगळाही झाला होता. तो उंच झाडावर चढणारा. उंच उंच आंब्यांच्या झाडांवर चढून तो आंबे काढायचा. तसेच झाडे तोडण्यात हुषार, झाड ज्या बाजूला पडायला हवे असेल, त्या बाजूला पाडायचा. गावोगावची त्याला बोलावणी यायची. परंतु रामजी एकदा झाडावरून खाली पडला. त्या दिवशी लक्ष्मी दादांकडे दळीत होती आणि बातमी आली. तशीच ती धावत गेली. माणसे जमली होती. रामजीला डोलीत घालून घरी नेण्यात आले. किती तरी उपाय केल्यावर तो थोडा बरा झाला. परंतु तेव्हापासून तो कामाला निरुपयोगी झाला. त्याचे पाय दुखत. मैल अर्धा मैल चालणेही होत नसे आणि दम्याचीही व्यथा जडली. रामजीला सुतारकाम येत होते. ते बसून करता येण्यासारखे, परंतु आजारीपणापासून तो आळशी बनला होता. तो कामाला जात नसे. लक्ष्मी अधूनमधून त्याला म्हणे. एकदा तो तिच्या अंगावर धावून गेला. तेव्हापासून लक्ष्मी बोलत नसे. रामजीला कामासाठी चालवत नसे. परंतु गप्पा मारायला गावभर जाई. चिलमी ओढी. मग खोकत घरी येई. रामजीचा लहान भाऊ मात्र कोठे कामाला जाई. मध्यंतरी मुंबईलाही गेला. गिरणीत कामाला लागला. परंतु संपात नोकरी गेली. तो परत घरी आला. मुंबईत नको म्हणे. गावतच एका चहाच्या दुकानात तो आता कामाला होता. परंतु पगार मिळे तो सारा घरी नसे आणून देत. आपल्या लग्नासाठी त्यातून शिल्लक ठेवी. लक्ष्मीला काही पैसे आणून देई. परंतु जेवायला मात्र येई. लक्ष्मी बोलत नसे. दिराचा थोडा तरी आधार आहे असे तिला वाटे.

''घरी आणतील तर सारे पैसे संपतील. उद्या लगीन तर व्हायला हवं. मी कोठून आणू चार दिडक्या ? तिकडे नारायणरावांकडे नेऊन ठेवतात तचे बेश. त्यांचा आज ना उद्या हवाच संसार मांडायला.'' लक्ष्मी म्हणायची.

असा तो गरीबांचा जीवनक्रम चालला होता. वैनी आजारी होती म्हणून मी घरी गेलो होतो. वैनीची मुलगी लहान. असेल चार–पाच वर्षांची. ही लक्ष्मी तिचे सारे करी. ती तिची वेणी घाली, तिला न्हाऊ घाली, तिचे नाव सुधा आणि सुधाच्या आईचेही तीच सारे काम करी. ते करून इतर ठिकाणी पुन्हा कामाला जाई, कोठे मोलमजुरीला जाई. कधी तिचे घरचे काम. लहानसे शेत ती व तिचा दीर हरी मिळून मक्त्याने करीत. त्या शेताच्याच बाजूला त्यांनी ते लहानसे झोपडे बांधले होते. मालकाला मक्ता घालीत आणि तेथे राहत.

''बाय कांडायला येणार आहे.'' काशी येऊन म्हणाली.

'' काग ग काशी, तुझ्या भावाचा ताप कसा आहे ?'' मी विचारले.

''ताप आहे.'' असे म्हणून ती पोर पळाली. वैनी क्षयरोगाने आजारी होती. बरी होणे कठीण. दादाही अशक्त व थकलेले. सुधा लहान जीव. हसे, खेळे, फुले आणी. आजारी आईला ती फुले आणून द्यायची. आईचा हात तिच्या केसांवरून फिरे. मीच घरात स्वयंपाक वगैरे करीत असे. सुधासाठी सकाळी थोडा गुरगुऱ्या भात करीत असे. वैनीला आवडेल ती थोडी भाजी करावी. असे चालले होते.

लक्ष्मी कांडायला आली तिने भात काढून घेतले. मध्येच कांडण थांबवून तिने वैनीला अंगाला तेल लावले. वैनीला दुसरे लुगडे तिने नेसवले. नंतर सुधाची तिने वेणी घातली आणि पुन्हा कांडू लागली.

दुपारची जेवणे झाली. मी मुद्दामच भात जास्त करीत असे. लक्ष्मीला द्यायला होई. तिने भांडी घासली.

''लक्ष्मी, हा भात आहे. खाऊन घेतेस ?'' मी म्हटले.

''मी घरी घेऊन जाते. लौकरच परत येईन.'' ती म्हणाली.

आजारी मुलासाठी ती तो भात घेऊन जात होती. लोणचे दिले. लक्ष्मी गेली

रामजी, हरी, विठू, काशी भाकर खात होती. लक्ष्मीने सकाळी करून ठेवली होती. तो ती गेली.

''बय, आलीस ?'' बाबू म्हणाला.

''होय, बाळा.'' ती त्याच्याजवळ बसून म्हणाली. तिने सर्वांना थोडथोडे लोणचे वाढले. तेथे दोन-चार हिरव्या मिरच्या होत्या. रामजीने कोठून तरी आणल्या होत्या.

''ऊठ, बाबू. जेव थोडे.'' लक्ष्मी म्हणाली.

''तूच भरव.'' तो म्हणाला.

लक्ष्मीने त्याला भरवले. नंतर उरलीसुरली भाकर खाऊन ती पुन्हा कामाला आली.

कांडण आटोपून, कण्या धापट, थोडे तांदूळ घेऊन ती सायंकाळी घरी परत गेली. असे दिवस जात होते.

एके दिवशी लक्ष्मीबरोबर दुसरी एक बाई आली.

''लक्ष्मी, ही कोण ?'' मी विचारले.

''ही नणंद. करंजणी असते. आता दिवाळी आहे म्हणून माहेरी आली आहे. माघारपण नको करायला?''लक्ष्मी म्हणाली.

''माघारपण का तू करणार?'' मी विचारले.

''हो, तिची आई नाही. मग मीच करायला हवं. राहील, दोन दिवसांनी जाईल. म्हणाली, मी पण येते दादांकडे दळायला. नको सांगितले. आलीस माघारपणाला तर विसावा घे म्हटले, तर ऐकेना.'' लक्ष्मी कौतुकानं सांगत होती.

''तुझ्या नणंदेचे नाव काय?''

''त्यांचे नाव चंद्रा.''

त्या दोघी दळीत होत्या. मधून हसत होत्या. नणंदभावजयांचे ते प्रेम पाहून मला आनंद वाटला. लक्ष्मी गरीब. घरी खायला पंचाईत. नवरा बेकार नि आळशी; परंतु नणंदेला दोन दिवस माघारपणाला लक्ष्मीने आणले. या गरिबीतही ती कर्तव्यदक्ष होती, उदार होती, प्रेमळ होती.

मी विहिरीवर गेलो होतो. कपडे धूत होती. तो लक्ष्मी आली. ती तेथे उभी होती.

''काय ग लक्ष्मी ?''

''दादा, अदमण भात द्याल ? हरी येईल, त्यांच्याबरोबर द्या. आम्ही पुढे पैसे फेडू. मोलमजुरी करून पैसे वाळून टाकू !''

''लक्ष्मी, तू आमच्याकडे किती काम करतेस ! वैनीची लुगडी धुतेस, ती थुंकीची भांडी घासतेस, सारे मनापासून करतेस; लहान सुधाची तू जणू आई बनली आहेस. तिची वेणी घालतेस, केसात तिच्या शेवंतीची फुले घालतेस. तुझा हक्कच आहे. तू घरातलीच आहेस. दादांना विचारीन नि देईन हो भात. तुझी नणंदही आली आहे. दोन दिवस पोटभर जेवा.'' मी म्हटले.

लक्ष्मी गेली. थोड्या वेळाने हरी आला. त्याला मी अदमण भात दिले. गेले काही दिवस. त्या दिवशी लक्ष्मी जरा उशीराने आली. मी वाट

बघत होतो.

''का ग लक्ष्मी, उशीरसा ?'' मी विचारले.

''दादा, रातभर जागरण. उजाडता डोळा लागला.''

''मुलगा तर बरा आहे ना?''

''हो, परंतु काल मोठे संकट टळले. घरात दोन साप निघाले. मी चुलीजवळ होते. तो आला. मी घाबरले. हरीने येऊन मारला. आम्ही रातची सारी निजलो. मला झोप येत नव्हती. तो माझ्या पायाला काही गार लागले. मी एकदम उठले. दिवा लावला. पोरांना बाजूला केले, तो दुसरा साप. त्यालाही मारले. मग मात्र झोप येईना. दिवा तसाच ठेवला. आधीच तेल मिळत नाही. परंतु भय वाटले. आणखी साप येणार की काय असे वाटले. पोरेही घाबरली. असा गोंधळ. रानात घर. परंतु असे दोन साप नाही काही घरात आले. काय करायचे?''

लक्ष्मी कामाला लागली. तो तिचा दीर हरी चहाच्या दुकानातून आला. तो संतापून आला होता. काय भानगड?

''वैनी–''

''काय ?''

''चहाचा मालक माझ्यावर चोरीचा आळ घेतो. म्हणाला, येथले चार आणे घेतलेस ? मी कशाला घेऊ त्याचे चार आणे. चालता हो म्हणाला. वाटेल त्या शिव्या दिल्या त्याने.''

''आम्ही काय गरीब म्हणून चोर ? मरू, पण चोरी नाही करणार. चल, मी येते.'' असे म्हणून लक्ष्मी तणतणत गेली. तो चहाचा दुकानवाला पान खात होता.

''तू माझ्या दिराला बोललास ? गरीब पाहून का वाटेल ते बोलावे ?

उपाशी मरू, पण दुसऱ्याच्या वस्तूला आम्ही हात लावणार नाही. कशाला घेऊल तो तुझे चार आणे ? त्या चार आण्यांनी का आम्हाला माड्या बांधता येणार आहेत? तो नाही पीत विडी, नाही खात सुपारी. कशाला घेईल तुमचे चार आणे ?''

''अग, पण येथले गेले कोठे ?''

''ते शोधा तुम्ही.''

इतक्यात तेथे एक लहान मुलगा होता. तो इकडेतिकडे बघत होता.

''अहो, ते पहा चार आणे. कुडाजवळ पडले आहेत.'' तो मुलगा म्हणाला. चार आणे सापडले.

''बघा. आणि गरीबावर चोरीचा आळ.''

''मग, म्हटले म्हणून काय झाले ? त्याला कोठे काम मिळत नव्हते. मुंबईत त्याला रोजगार भेटेना. तेथून आला भीक मागत परत. मी म्हणून कपबशा विसळायला तरी ठेवले. नाही दिसले चार आणे म्हणून म्हटले. आजवर नाही म्हटले ते ? एवढी मिजास असेल, तर येऊ नको कामाला. कामाला वाटेल तेवढी दुसरी पोरे मिळतील.'' मालक म्हणाला.

''नाहीच येत कामाला.'' हरी म्हणाला.

''हो चालता.'' मालक गरजला.

माझा पगार द्या.

''महिनाअखेर ये. असा मध्येच नाही मिळत.'' हरी निघून गेला. लक्ष्मी गेली. परंतु दिराची नोकरी गेली म्हणून तिला वाईट वाटले आणि आणखी संकटे येऊ लागली. यंदा तिने मळणी काढली. भात फार झाले नाही. कोठून घालणार मक्ता? आदल्या दोन वर्षांचीही दोन मण बाकी होती. मालकाने सांगितले, ''सारे भात घाला. मागील वर्षांचे नि यंदाचे.

नाही तर शेत काढून घेऊन दुसऱ्यास देतो.'' काय करायचे ? शेताचा थोडा आधार होता. आणि शेत काढून घेतले म्हणजे राहायचे कुठे ? ते शेत ती मक्त्याने करीत म्हणून तेथेच झोपडीत राहत. लक्ष्मी सचिंत झाली.

''तुम्ही तुमचे पैसे आणता मागून ? नारायणरावांकडे तुमची किती रक्कम आहे ?'' लक्ष्मी दिराला म्हणाली.

''मी उद्या मुंबईला जातो. मला हवेत ते पैसे. त्यातले देऊन मी काय करू?'' म्हणाला.

''शेताच्या मालकाला देऊ.''

''मी मुंबईला कसा जाऊ ? या गावात राहणे नको. मी नि माझे नशीब. कधी काही मिळाले तर तुम्हाला पाठवीन. नारायणरावांकडे पंचवीस–तीस रुपये असतील; त्यातून किती देणार ? मला काय उरणार ?''

लक्ष्मी बोलली नाही. एके दिवशी हरी मुंबईला जातो सांगून निघून गेला.

त्या दिवशी वैनीचे अधिक होते. आम्ही सारे दुःख होती. सायंकाळची वेळ. मी तुळशीच्या अंगणात उभा होतो आणि लक्ष्मी मजकडे आली.

''झाले ना काम ? जा हो.'' वैनी उद्या असेल की नाही, देव जाणे. माझ्या डोळ्यांत पाणी आले. लक्ष्मी बोलली नाही. तिचेही डोळे भरून आले.

''सुधा लहान.'' एवढेच लक्ष्मी म्हणाली. परंतु ती जाईना. तिला का काही हवे होते ?

''लक्ष्मी, का घुटमळतेस ?''

''तुम्ही मला वीस रुपये द्या. शेताच्या मालकाला द्यायला हवेत.

नाहीतर शेत काढून घेईन म्हणतो. आम्ही कुठे जाऊ ? तीन पोरे. ते पायाने पांगळे. मी दिवसभर राबते. लहान पोरेही काम करतात. कसे दिवस काढायचे ? भात झोडले. दाणाही फार झाला नाही. तुम्ही दुःखात आहात. सांजच्या वेळेस मागू नये. परंतु काय करू?''

मी वीस रुपये तिला आणून दिले.

''पुढे देईन कधीतरी.'' ती म्हणाली.

''परत नकोत. तू वैनीची सेवा केली आहेस. तिचा का पैशात किंमत करायची! जा घरी. पोरे वाट बघत असतील !''

ती गेली. रात्री आम्ही वैनीजवळ बसलो होतो. सकाळ झाली आणि वैनीचे डोळे तेजस्वी दिसले.

''किती छान उजाडले आहे, किती छान !'' ती म्हणाली.

आम्हाला वाटले, वैनीला बरे वाटत असावे. परंतु तिला अनंत जीवन दिसत होते. ज्या जगात सारे सुंदर ते तिला दिसत होते.

''किती छान, छान !'' हेच तिचे शेवटचे शब्द ! वैनी गेली.

दुःखशोक गिळून आम्ही होतो. आम्ही सारी तेथून निघून जाणार होतो. लक्ष्मी आली. तिची मुले आली. वैनीची लुगडी लक्ष्मीला दिली. मुलांना खाऊला पैसे दिले.

''तुम्ही सारी जाणार. आम्हाला कोण? पोरे दोन दिवस उपाशी आहेत. हे तुम्ही दिलेले चार पैसे चार दिवस होतील. तुमचा आधार होता. सुधाच्या आईचा, दादांचा आधार होता. कधी लागले तर मागावे. दादांनी नाही म्हटले नाही. तुम्ही येथून जाणार. आम्ही कोठे जाऊ ? ही पोरे घेऊन कोठे जाऊ ? हरीही गेला. त्याचा कागद नाही. दादा, आण्णा, तुम्ही आम्हाला विसरू नका. आम्ही दिवसभर राबतो. परंतु उपाशी

राहण्याची पाळी येते. शेती यंदा तरी राहिले. पुढच्या सालाचे देवाला माहीत !'' लक्ष्मी रडू लागली.

''नको रडू लक्ष्मी. हरी तिकडे मिळवता होईल. तुझी मुले मोठी होतील. जातील हे दिवस. तुझी आठवण आम्हाला राहील.'' मी म्हटलं.

आणि आम्ही निघून गेलो. तिकडे लक्ष्मी धडपडत होती.

एके दिवशी तिच्या नवऱ्याने गंमत केली. त्याच्या घराजवळ एक दगड होता. त्या दगडाला मध्ये जरा शंकराच्या पिंडीसारखा उंचवटा होता. रामजीच्या मनात आले, ''स्वयंभू देव सापडला अशी मारावी बात.'' आणि त्याने तसे केले. त्याने त्या दगडावर आणून फुले वाहिली आणि लोकांची गर्दी जमू लागली. कोणी दिडकी ठेवी, कोणी नारळ. परंतु लक्ष्मीला ते आवडले नाही.

''तुम्ही लोकांना फसवता. पोरे त्या दगडावर सारी घाण करीत. त्याचा तुम्ही देव केलात ? काय म्हणेल देव ? तुम्हाला काम करायला नको. बसल्याबसल्या का सुतारकाम नाही करता येणार? हे हरामाचे पैसे कशाला ? मी उद्या त्या दगडावर थाबडे घालते. म्हणे स्वयंभू देव आला !'' असे लक्ष्मी रात्री नवऱ्याला म्हणाली.

रामजी हसला. तो काही बोलता नाही आणि लक्ष्मी पहाटे उठली. तिने तेथील पूजाअर्चा दूर केली आणि दगडावर शेणाची रास आणून ओतली.

कोणी लोक बघायला आले तो देव दिसेना. ''कोठे आहे स्वयंभू पिंडी ?'' लोकांनी विचारले.

''ती आली तशी गेली !'' लक्ष्मी म्हणाली. लोक माघारे गेले. रामजींचे दोन दिवसांचे वैभव गेले. परंतु तो बायकोला बोलला नाही. तेथे बसे.

चिलीम ओढी, मिळे तुकडा तो खाई.

आणि काही वर्षे गेली. काँग्रेसच्या निवडणुकीसाठी मीही दौऱ्यावर होतो आणि या लक्ष्मीच्या गावी तीन वाजता सभा होती. मला फार वेळ नव्हता. एका गावची सभा आटोपून या गावी आलो होतो. ही संपवून दुसऱ्या गावी जायचे होते. सभेला सर्व प्रकारचे लोक होते. शेतकरी होते, हरिजन होते. आश्चर्य म्हणजे काही शेतकरी आयाबायाही होत्या.

''उद्या स्वराज्यात तुम्हाला शेती मिळेल. प्रत्येकाला थोडी तरी स्वतःची जमीन होईल. एकेकाजवळ वाटेल तेवढी जमीन राहणार नाही, अधिक असेल त्याची काढून ज्याला नाही त्याला देऊ. ते खरे स्वराज्य. ती बघा लक्ष्मी तिकडे बसली आहे. तिची दशा मला आठवते. तिची मुले उपाशी असत. ती कष्ट करणारी. जरा मक्ता थकताच मालक शेत काढून घेऊ म्हणत. कोठे जाईल ती ? स्वराज्यात तिला मालकीचे शेत मिळेल. कष्ट करील, स्वाभिमानाने जगेल.'' असे मी पुष्कळ बोललो. सभा संपली.

मी मोटारजवळ गेलो तो दूर लक्ष्मी उभी होती. मी तिच्याकडे गेलो. तिला प्रणाम केला.

''सुधा बेस आहे ना ? दादा, वसंता दोघे देवाकडे गेले. अप्पा, तुम्ही बेश आहात ना ?'' ती म्हणाली. त्या श्रमणाऱ्या लक्ष्मीने चौकशी केली. माझे डोळे भरून आले. मी खिशातून काही काढून तिला देऊन म्हटले, ''मुलांना खाऊला घे. हरी कोठे आहे ?''

''त्याचा कागद नाही. कुठेही खुशाल असो. अण्णा, तुमचे स्वराज्य लौकर आणा. मला मालकीचे शेत द्या. लहानसे पुरे. हक्काने तेथे राहू. तेथे राबू, कधी येईल हे सव्राज ?''

''येईल, लक्ष्मी, येईल. तुम्ही सुखी व्हाल. आमची मोटार गेली.

पुन्हा दुसऱ्या गावी सभा आणि पुढे निवडणुका झाल्या. लढा न होता स्वातंत्र्यही आले. परंतु गरीबांचे आले का? सरकार म्हणते, ज्यांच्याजवळ अधिक जमीन आहे ती काढून ज्यांना नाही त्यांना देऊ. परंतु त्यांना विकत घ्यावी, परंतु ही लक्ष्मी कधी शिल्लक टाकील हजार दोन हजार रुपये आणि कधी मिळवील मालकीची शेती ? लक्ष्मी डोळ्यांसमोर येथे आणि मी बेचैन होतो. समाजवादाशिवाय सारे फोल आहे.

११. जयन्ता

''जयन्ता, तू पास होशीलच; पुढे काय करणार तू? तुझा मोठा भाऊ तर चळवळीत गेला. तुझ्या मनात काय आहे ?'' वडिलांनी विचारले.

''चळवळीचा भर ओसरला आहे. माझे तिकडे लक्ष नाही. मी लहान मुलगा कोठे जाणार ? परंतु मला खूप शिकायची इच्छा आहे.''

''कॉलेजचा खर्च कसा भागवायचा, बाळ ?''

''बाबा, मला नादारी मिळेल. मला मार्क चांगले मिळतील. कॉलेजमध्ये शिष्यवृत्तीही कदाचित मिळेल. कॉलेजच्या शिक्षणाचा तुमच्यावर भार पडणार नाही.''

''तुझ्या शिक्षणाचा खर्च मला करावा लागणार नाही असे धरले, तरी तुझ्याकडून घरसंसार चालवायला मदत थोडीच होणार आहे ? अरे, मी एकटा किती काम करू ? मी थकून जातो. सरकारी नोकरी, शिवाय सकाळी खाजगी नोकरी; महिनाअखेर दोन्ही टोके मिळायला तर हवीत ? घरात तुम्ही पाच-सहा भावंडे. तो मोठा गेला देशसेवेला. बी.ए. होईल, मदत करील, अशी आशा होती. परंतु घरी न सांगता गेला. जाऊ दे. देशासाठी

कोणी तरी जायला हवेच. परंतु तुम्हाला कसे पोसू ? जयन्ता, तू नोकरी धर. रेशनिंगमध्ये मिळेल; मी बोलून ठेवले आहे.'' वडील म्हणाले.

''मी पंधरा वर्षांचा; मला कोण देईल नोकरी ?''

''तेथे वयाची अट नाही. मॅट्रिक पास असलास म्हणजे पुरे. अरे, कोवळ्या मुलीही तेथे काम करतात.''

इतक्यात जयन्ताची बहीण तेथे आली. ती म्हणाली,

''बाबा, मी करू का नोकरी ? जयन्ताला शिकू दे. तो हुशार आहे. मला द्या ना कोठे मिळवून.''

''अग, तू मॅट्रिक नापास; शिवाय तुझी प्रकृती बरी नसते.''

''नोकरी करून सुधारेल. आपला काही उपयोग होत आहे असे मनात येऊन समाधान वाटेल.''

''नको, गंगू, तू नको नोकरी करू. आम्हा भावांना तू एक बहीण. तू बरी हो. तुझे वजन वाढू दे. मी करीन नोकरी. सकाळी कॉलेजात जाईन. हजारो मुले असे करीत आहेत.''

''परंतु तू अशक्त; तुला एवढा ताण सहन होईल का?''

''होईल. मनात असले म्हणजे सारे होते.''

पुढे मॅट्रिकच्या परीक्षेचा निकाल लागला. जयन्ता पास झाला. त्याला शेकडा ७० मार्क मिळाले. कोणत्याही कॉलेजात त्याला शिष्यवृत्ती मिळाली असती. त्याने कॉलेजात नाव घातले. सकाळी कॉलेजात जाणार होता, दुपारी नोकरी करणार होता. पंधरा वर्षांचा जयन्ता तास न् तास रेशनिंगचे काम करी. तो दमून जाई. शरीराची वाढ होण्याचे ते वय; परंतु त्याच वेळेस आबाळ होत होती. काय करायचे?

जयन्ता घरी आईलाही कामात मदत करी. रविवारी घर सारवी, इतर

भावंडांचे कपडे धुवी. तो क्षणभरही विश्रांती घेत नसे. घरात विजेचा दिवा नव्हता, रॉकेल मिळायचे नाही. जयन्ता एका मित्राच्या घरी रात्री अभ्यासाला जाई.

कॉलेज सुटल्यावर तो आता घरी येत नसे. तिकडेच राइस प्लेट खाऊन नोकरीवर जाई. परंतु जयन्ता अशक्त होत चालला.

''जयन्ता, तुला बरे नाही वाटत ?'' गंगूने विचारले.

''बरे वाटते तर ? तूच जप. तुला इंजेक्शन घ्यायला हवीत. त्यासाठी मी पैसे साठवून ठेवले आहेत. तू आमची एकुलती बहीण. मी देवाकडे गेलो तरी इतर भाऊ आहेत; परंतु तू गेलीस तर दुसरी बहीण कुठे आहे ?''

''असे नको बोलू. तू शीक. तू हुशार आहेस. तू मोठा होशील, खरेच जयन्ता!''

''मला खूप शिकावे असे वाटते.''

''शीक हो; परंतु प्रकृतीस जप.''

गंगू आता इंजक्शने घेऊ लागली. जयन्ताचा शब्द तिला मोडवेना. परंतु जयन्ता मात्र खंगत चालला.

''जयन्ता, तुला काय होते ?'' आईने विचारले.

''परीक्षा जवळ आली आहे. रात्री अभ्यास करतो. म्हणून तुम्हाला मी असा दिसतो. शरीर थकले तरी मनाला खूप उत्साह आहे. परीक्षा संपली की तीन महिने मग अभ्यास नाही. प्रकृती सुधारेल. आई, काळजी नको करू.''

''तो तिकडे तुरुंगात; तुझी ही अशी दशा.''

''आई, साऱ्या देशातच अशी दशा आहे. त्यातल्या त्यात आपण सुखी नाही का?''

''तू शहाणा आहेस बाळ.''

आईच्या डोळ्यांत पाणी आले. जयन्ता पुस्तक घेऊन निघून गेला.

परीक्षा जवळ आली होती. गंगू, जयन्ता दोघे त्या दिवशी फिरायला गेली होती.

''गंगू, तुला आता बरे वाटते.''

''मला तुझी काळजी वाटते.''

''वेडी आहेस तू ! मला अलीकडे खूप आनंद वाटत असतो. कॉलेजात जातो. त्यामुळे वर्ष फुकट नाही जाणार. नोकरी करतो म्हणून घरीही मदत होते. त्या दिवशी मी आईला लुगडे आणले. तिला किती आनंद झाला ! बाबांनाही बरे वाटले असेल. लहान वयाची मुले खेड्यापाड्यातून आई-बापास मदत करतात. सात-आठ वर्षांचा मुलगा गुराखी होतो. घरी मदत आणतो. पांढरपेशीची मुले घराला भार असतात. आम्हीही खपले पाहिजे. वर्तमानपत्रे विकावीत. दुसरे काही करावे. पांढरपेशी कुटुंबात एक मिळविणारा नि दहा खाणारी. ही परिस्थिती बदलली पाहिजे.''

''जयन्ता, तू मला एक हातमशीन घेऊन दे. मी घरी शिवणकाम करीत जाईन.''

''आधी बरी हो. तुझ्या येत्या वाढदिवसाला मी ती भेट देईन.''

दोघे घरी आली आणि जयन्ताची परीक्षा आली. त्याने चार दिवसांची रजा घेतली. पेपर चांगले जात होते. आज शेवटचा पेपर, घरी बहीण वाट बघत होती. का बरे नाही अजून जयन्ता आला ?

जयन्ता पेपर लिहून उठला. सारी मुले निघाली, परंतु जयन्ता एकदम घेरी येऊन पडला. मित्र धावले. त्यांनी त्याला उचलले. एक टॅक्सी करून ते त्याला घरी घेऊन आले.

''काय झाले ?'' गंगूने घाबरून विचारले.

''घेरी आली होती.'' मित्र म्हणाले.

ते मित्र गेले. गंगू भावाजवळ बसली. तिच्या डोळ्यांत अश्रू होते. वडील कामावर गेले होते. भावंडे शाळेतून अजून आली नव्हती. आई दळण घेऊन गेली होती. गंगू एकटी होती.

''बाळ जयन्ता.'' आईने हाक मारली.

जयन्ता शुद्धीवर आला. त्याने डोळे उघडले. तो एकदम उठला. त्याने आईला मिठी मारली.

''मला मृत्यू नेणार नाही.''

''पडून रहा बाळ.'' आई म्हणाली.

''तुझ्या मांडीवर निजतो.''

''ठेव डोके.''

''आई, डॉक्टरला आणू?'' गंगूने विचारले.

''गंगू, डॉक्टर कशाला ? गरीबाला डॉक्टर नकोत. ते पैसे घरी उपयोगी पडतील.'' – जयन्ता म्हणाला.

''बाळ, डॉक्टरला आणू दे हो.'' आईने समजूत घातली. गंगू गेली आणि थोड्या वेळाने ती डॉक्टरांना घेऊन आली. त्यांनी तपासले.

''थकवा आहे. मी इंजेक्शन देतो. बरे वाटेल. डोसही देईन ते चार चार तासांनी द्या. झोप लागली तर मात्र उठवू नका. विश्रांती हवी आहे. मेंदू थकला आहे.'' डॉक्टर म्हणाले.

त्यांनी इंजेक्शन दिले नि ते गेले. त्यांच्याबरोबर गंगू गेली. ती औषध घेऊन आली.

''जयन्ता, आ कर.'' ती म्हणाली.

त्याने तोंड उघडले, तिने औषध दिले, तो पडून राहिला. सायंकाळची

वेळ झाली. आई देवदर्शनास गेली होती. वडील अजून आले नव्हते. इतर भावंडे का खेळायला गेली होती.

घरी जयन्ता नि गंगू दोघेच होती.

''गंगूताई, माझ्या खिशात पैसे आहेत. तू इंजेक्शन घे आणि आपल्या आईला अंगठीची हौस होती. तूच केव्हातरी म्हणाली होतीस. या अंगठीसाठीही मी पैसे जमवून ठेवले आहेत. तू तिला अंगठी घेऊन दे.''

त्याच्याने बोलवेना. तो दमला. डोळे मिटून पडून राहिला. आता सारी घरी आली होती. जयन्ता बरा आहे असेच सर्वांना वाटत होते. जेवणे–खाणे झाली.

''तू थोडे दूध घे.'' आई म्हणाली.

''दे, तुझ्या हाताने.'' तो म्हणाला.

भावंडे निजली. वडील, आई नि गंगू बसून होती.

''तुम्ही निजा. मी त्याच्याजवळ बसतो. मग बारा वाजता गंगू, मी तुला उठवीन.'' वडील म्हणाले.

''आणि दोन वाजल्यावर गंगू, तू मला उठव. मी बसेन.'' आई म्हणाली.

''तुम्ही सारी निजा. मला आता बरे वाटत आहे खरंच बाबा. तुम्ही दिवसभर दमलेले. आणखी जागरण नको. निजा तुम्ही.'' जयन्त म्हणाला.

''जयन्ता, मला आता सवय झाली आहे दिवसभर काम करण्याची. बैल घाण्याला न जुंपला तरच आजारी पडायचा. परंतु माझ्यासमोर लहान वयात तुम्हासही घाण्याला जुंपून घ्यावे लागत आहे याचे वाईट वाटते.''

''तुम्ही वाईट नका वाटून घेऊ. कर्तव्य म्हणून सारे आनंदाने करायला हवे. आई किती कष्ट करते. दळण सुद्धा घरी दळते आणि गंगूताईला बरे नसते तरी आईला हात लावते. तुम्ही निजा, सारी निजा.''

''तू बोलू नकोस. पडू रहा.'' वडील त्याच्या डोक्यावर हात ठेवून म्हणाले.

जयन्ता शांतपणे डोळे मिटून पडला. आई नि गंगू अंथरुणावर पडल्या. वडील जयन्ताजवळ बसले होते.

बराच वेळा झाला बाराचा सुमार असावा. सिनेमा सुटून मंडळी परत जात असावी. जयन्ताने डोळे उघडले.

''बाबा, मी नोकरी धरली, किती छान केले नाही ? तुमची चिंता थोडी कमी केली. गंगूताईला इंजेक्शने घेता येतील. आता पैसे पुरतील.''

''होय हो बाळ. तू बरा हो म्हणजे झाले.''

''मी बरा नाही झालो तरी गंगूताई बरी होईल. ती मग मदत करील.''

पुन्हा खोलीत शांतता होती आणि गंगू उठली.

''बाबा, तुम्ही पडा.'' ती म्हणाली.

आणि ते झोपले. बहीण भावाजवळ बसली होती.

''तू आईला नको उठवूस.'' जयन्ता म्हणाला.

''बरे हो.'' ती म्हणाली.

पहाटेची वेळ होती. जयन्ताने ताईचा हात एकदम घट्ट धरला.

''काय रे ?''

''मी जातो आता, सुखी रहा.''

''जयन्ता?''

तो काही बोलला नाही. पहाट झाली. आई उठली. वडील उठले, भावंडे उठली. परंतु जयन्ता आता उठणार नव्हता.

थोडे दिवस गेले आणि जयन्ताचा परीक्षेचा निकाल लागला होता. परंतु तो पाहण्याचे कोणाच्या मनातही आले नाही. सायंकाळी जयन्ताचा एक मित्र

आला. हातात वृत्तपत्र होते.

''गंगूताई'' त्याने हाक मारली.

''काय निळू ?''

''जयन्ता पहिल्या वर्गात पहिला आला.''

''म्हणूनच देवाने नेला.''

मित्र निघून गेला. गंगू खिडकीतून शून्य मनाने कोठे तरी पाहात होती. परंतु काय असेल ते असो. तिचे आजारीपण गेले. तिची पाठ दुखेनाशी झाली. जयन्ता का तिचे आजारीपण घेऊन गेला ? गंगू आता नोकरी करते. घरी सर्वांना मदत करते.

जयन्ता जाऊन आज वर्ष झाले होते. गंगूने एक सुरेखशी अंगठी आणली होती.

''आई, तुझ्या बोटात घालू दे.''

''मला कशाला अंगठी ? तुम्ही मुले सुखी असा म्हणज झाले.''

''आई, जयन्ताची ही शेवटची इच्छा होती.''

''त्याची इच्छा होती ? त्याची इच्छा कशी मोडू?'' मातेने बोटात अंगठी घातली. डोळ्यांतून पाणी आले. मातेने मुलाचे श्राद्ध केले.

१२. शुक्री

दुसरे महायुद्ध नुकतेच संपले होते. अणुबाँब टाकून सुसंस्कृत अमेरिकेने जपानी शहरे क्षणात स्मशानवत् केली होती. लांबणारी लढाई पटकन् संपली. अणुबाँबचे उपकरण, कोणी मुत्सदी म्हणाले. महायुद्धाच्या काळात् सरकारला सहाय्य करणाऱ्यांची चंगळ होती. ब्रिटिशांची सारी सत्ता त्यांच्या पाठीशी त्यांच्या रक्षणार्थ असे. कारखानदार, जमीनदार सारे चैनीत होते. अपरंपार नफा मिळवीत होते. धनजीभाईची ऐट तर विचारू नका. तो लष्कराला चारा पुरवी. ठायी ठायी मिलिटरींच्या डेअरी होत्या. तेथे गाईगुरे होती. कोण त्यांची निगा ! केवढी व्यवस्था! अमेरिकेतील सोजिरांना रोगट दूध देऊन कसे चालेल ? हिंदुस्थानातील जनता रोगराईने मरत होती. त्यांना नव्हते घरदार, नव्हते नीट अन्न परंतु सरकारी डेअऱ्यांतून स्वर्ग होता.

धनाजीभाई कुबरे झाले होते. अफाट कुरणे त्यांच्या मालकीची. एवढेच नव्हे तर शेतीच्या जमिनीचीही त्यांनी कुरणे केली. अधिकाऱ्यांना ते पैसे चारीत आणि त्यांना कोणी विचारीत नसे. ते हंगामात गवत कापायला आदिवासी मजूर कामासाठी लावीत. परंतु वेळेवर मजुरी द्यायचे नाहीत. ठरवतील रुपया,

हातावर ठेवील आठ आणे ! सरकारी काम आहे, याद राखा, तुरुंगात घालीन, अशी धमकीची भाषा ते बोलायचे.

महायुद्ध संपले तरी अजून हिंदुस्थानातील परकीय सैन्य परत गेले नव्हते. एकदम बोटी कोठून मिळणार ! हळूहळू गोरे शिपाई विलायतेला, तिकडे ऑस्ट्रेलियात, मधून अमेरिकेत जात होते. विजय मिळाला होता. त्यांच्या चैनीला आता सीमा नव्हती. शहरातील चांगला भाजीपाला आधी त्यांच्याकडे जाई. डेअरीचे दूध पुरत नसे. शहरातील दूधही त्यांच्याकडे जायचे. त्यांच्यासाठी उत्कृष्ट गहू, भरपूर साखर, त्यांच्या जिवावर तर राज्ये–साम्राज्ये चालायची.

धनाजीशेटजींचा गवताचा व्यापार अजून तेजीतच होता. अजून ब्रिटिशांचीच सत्ता होती. काँग्रेसचे महान नेते अजून अहमदनगरच्या किल्ल्यातच होते. महात्माजी बाहेर होते. जीनांच्या भेटीगाठी घेत होते ! त्यातून काहीच निष्पन्न होत नव्हते. धनाजीशेटजींना जर कोणी म्हटले, ''तुमची सद्दी आता संपेल. काँग्रेसचे पुढारी सुटतील, स्वराज्य येईल, तुम्हाला आता जोरजुलूम करून चालणार नाही.'' तर त म्हणायचे, ''इंग्रज सरकार का मूर्ख आहे? ते या आपल्या हाताने साम्राज्यावर पाणी सोडतील ? इंग्रज येथून जाणार नाही, माझ्या हयातीत तरी जाणार नाही. काँग्रेस पुन्हा पुन्हा वनवासात जाईल. आमची चैन तर चालूच राहणार. आम्ही जंगलचे राजे.''

आणि धनाजीशेठ त्याच तोऱ्यात असत. पावसाळा संपला होता. यंदा मागून पाऊस पडला नाही म्हणून गवत नीट वाढले नाही, त्याच्यावर कीडही पडली. गवताला फूल आले नाही. नुसत्या गवताच्या काड्या राहिल्या. भाव कडाडले. आपले गवत आधी कापून व्हावे म्हणून धनाजीभाईंची कोण आटाआटी ! गावोगावचे आदिवासी त्यांनी कामावर आणले. धनाजीभाईंचे

पठाण, रखवालदार गावोगाव जात आणि आदिवासी बंधु-भगिनींना शेळ्यामेंढ्यांप्रमाणे हाकलून आणीत. धनाजीभाईने अधिक मजुरी कबूल केली होती. पुन्हा अकस्मात् पाऊस पडला तर याही गवताचा नाश व्हायचा असे लक्षात आणून धनाजीभाई जरा उदास झाला होता.

अंधार पडायची वेळ झाली. आज मजुरी चुकवायची होती.

''तुम्ही बरोबर काम केले नाही. मजुरी पुरी नाही मिळणार. आठ दिवसांत का इतकेच गवत कापून झाले ? तुम्ही कामचुकार लोक. ताडी पिता, काम नाही करीत. अधिक मजुरी कशाला ? ताडी प्यायला ? साले तुम्ही हरामखोर बनला. तुम्हालां चिथावणी मिळते, याद राखा. हा धनाजीभाई आहे. इंग्रज सरकारचे राज्य म्हणजे धनजीभाईचे राज्य. येरवड्याला पाठवीन एकेकाला. काम नाही करते, मजुरी मागते. साला बेकार कारभार !'' धनजीभाई तिरस्काराने संतापाने बोलत होते.

''तुम्ही मजुरी ठरल्याप्रमाणे द्या.'' एकजण म्हणाला.

''नाही दिलीत तर आम्ही संप करू.''

''येईल पाऊस. होईल नुकसान. आकाशात आभाळ येतच आहे. मजुरी रितसर दिलीत तर, तरच उद्या विळे चालतील.'' आदिवासी बोलत होते. धनजीभाई अधिक मजुरी देईना. ते आदिवासी निघून गेले. आपापली गावे सोडून ते आले होते. तेथे कुरणातच झोपड्या करून ते राहत होते.

धनजीशेठ तेथे बसून होते. थोड्या वेळाने तो पठाणास म्हणाला,

''लाला, उद्या हे लोक कामावर येणार की नाही ? साले माजले !''

''मी दंडा मारून सर्वांना कामावर आणीन. हाडे मोडीन सगळ्यांची. तुम्ही काळजी करू नका. फिकीर मत करो साब.''

''अच्छा. तो सबको सबो कामपर लाना. ये दस रुपये तेरे वास्ते.''

लाला दहा रुपयांची नोट खिशात घालून गेला.

आदिवासी स्त्री–पुरुष मंडळी भाकर खाऊन एकत्र जमली होती. उद्या काय करायचे याचा विचार चालला होता. संपावर जायची भाषा होती. सर्वच ठिकाणी संप करावा. हा अन्याय कुठवर सहन करायचा, असे काहींचे म्हणणे होते.

'धनशेठला इंगा कळायलाच पाहिजे. आमच्या श्रमावर बेट्याची मिजास. आम्हाला दोन दिडक्या देतो. स्वतः बंगले बांधतो. आम्हाला खायला नाही, याच्या चार मोटारी. आमची ताडी याला दिसते आणि स्वतः उंची दारू पितो. धनशेठचे राज्य दूर केलेच पाहिजे.'' एक तेजस्वी तरुण म्हणाला.

सर्वांनी माना डोलावल्या. रात्र बरीच झाली. सारे आपापल्या झोपड्यांत गेले. कोणी बाहेर गवतावरच झोपले. ना सापाचे भय, ना थंडीवाऱ्यांचे, पहाटेच्या दवाचे.

परंतु एका झोपडीत कुजबूज सुरू आहे. त्यांना का बरे झोप येत नाही? काय चालले आहे बोलणे?

''त्या पठाणाला मी भिते. मालकाकडे चल. तुला पंचवीस रुपये देतो म्हणाला. मला भय वाटते. तो धनजीशेट, त्याचे ते डोळे. सापाचे जणू डोळे. फोडून टाकावेत ते डोळे असे मनात येते. तुम्ही गावोगाव आग पेटवायला जाल, मी कुठे राहू ?''

''शुक्री, तू उगीच भितेस. आलीच वेळ तर खुपस विळा नि काढ त्याची आतडी बाहेर. तू सापाला भीत नाहीस, वाघाला भीत नाहीस, धनशेटला भितेस?''

''तुम्हीसुद्धा भीता. आम्ही तर बायका.''

''अग, उद्या तो मजुरी देईल. संपाची वेळ येणार नाही. नको घाबरूस.

तुझे लुगडे फाटले; नवीन घेईन. आधी तुला लुगडे मग मला कपडे.''

''तुमचे हे कसे जरा कापून घ्या. भुतासारखे दिसता. का घालून तुमच्या केसांची वेणी; का विळ्याने मीच टाकू कापून?''

''शुक्री, थोबाडीत मारीन.''

''त्या धनजीशेटच्या मारा, मग माझ्या मारलीत तरी मी आनंदाने सहन करीन. तुम्ही बायकांना माराल नि त्या धनजीशेटच्या लाथा खाल. तो पठाण दंडुका दाखवतो. तुम्ही गप्प बसता.''

''उद्या नाही गप्प बसणार.''

''बघेन सकाळी. झोपा आता.''

सर्वत्र शांतता होती. कुत्री भुंकत होती. धनजीशेट विचार करीत होता. त्याला झोप येईना. लालाने आदिवासींची बोलणी त्याला सांगितली होती. धनजीशेटने लालाला उठविले, तो म्हणाला,

''लाला, मोठ्या पहाटे जा आणि पोलिसांची पार्टी घेऊन ये. त्यांच्यातील म्होरक्यांना तुरुंगच दाखवायला हवा.''

''ठीक. पोलिस आ जाय तो अच्छा होगा. मै जल्द जाऊं और पोलिस लेकर आऊं. आप सो जाईये फिकीर नही करना शेटजी. लाला जिन्दा है तो सब ठीक है.''

शेटजी पलंगावर पडले. लाला तंबूबाहेरच्या खाटेवर पडला. मोठ्या पहाटे उठून तो जवळच्या पोलिस ठाण्याकडे जायला निघाला. आता उजाडले. आदिवासी उठले. परंतु कामाला जायचे लक्षण दिसेना. आठ वाजले तरी तेथेच होते. धनजीशेट आले. ते म्हणाले,

''काम नही करते ? मस्ती आली ?''

''शेट, शिवी देऊ नका. कबूल केल्याप्रमाणे आमची मजुर आधी चुकती

करा. मग कामाचे बघू.''

''कामात कसून नि ठरलेली मजुरी मागते ?''

''मजुरी द्या.''

''आधी कामावर जा.''

''आधी मजुरी. तेवढी मजुरी तुम्हाला परवडत नसेल, तर आम्ही येथून जातो. परंतु झालेल्या कामाची मजुरी चुकती करा. नाहीतर साऱ्या जिल्ह्यात संप पसरेल. तुमचेच नाही, तर कोणाचेच गवत कापले जाणार नाही. बसा बोंब मारीत.''

''आणि साले तुम्ही खाल काय ?''

''त्याची तुम्हाला नको काळजी.''

तिकडे शुक्री उभी होती. रानातील फुले तिने केसात घातली होती. काळीसावळी तेजसींवी शुक्री. धनजीशेट तिच्याकडे पाहत होता.

''ती शुक्री बायको ना रे तुझी ? ती बघ, जणू मुंबईवाली झाली आहे. गवत कापणारी? परंतु ऐट बघा तिची. केसात फुले'' धनजीशेट बोलले.

''मग का तुमच्या बायकांनीच फुलांनी सजावे ?'' मंगळ्या म्हणाला.

''साला आमच्या बायकांचे नाव काढतो? याद राख. दात पाडीन. मस्ती लई आली तुला होय ? तुरुंगात घालीन. तूच म्होरक्या आहेस. ताडी पितोस, शुक्रीला मारतोस. म्हणे, अधिक मजुरी हवी. तुझ्यासारख्या कुत्र्याला शुक्रीची काय किंमत? ती बंगल्यात हवी. तिला गुलाब मिळतील, मस्त राहील.''

मंगळ्याने धावून धनजीशेटच्या थोबाडीत मारली. बाकीचे घाबरले. त्यांनी मंगळ्याला आवरले. शुक्री धावून आली. ती संतापून म्हणाली, ''का त्यांना आवरता? त्या पापी चांडाळाचे डोळे फोडू दे त्यांना. सोडा त्यांना. हा

शेट म्हणजे मांग आहे मागं.''

इतक्यात शिट्या आल्या. पोलीस बंदुका घेऊन येत होते. लाला होता. आदिवासी पळाले. पोलीस का गोळीबार करणार ? का पकडणार? सारे आपापल्या झोपड्यांत जाऊन बसले. धनजी पोलिसांना सामोरा गेला. त्यांना तो तिखटमीठ लावून हकीगत सांगत होता. त्यांना घेऊन तो आदिवासींच्या हंगामी झोपड्यांकडे आला.

''आधी याला पकडा, हा माझा खून करणार होता. बायकोलाही हा मारतो. हाच मुख्य आहे. हाच आग लावणारा.'' धनजी मंगळ्याकडे बोट करून म्हणाला. पोलिसांनी त्याला हातकड्या घातल्या.

''मलाही पकडा. मी कशी राहू?'' शुक्री म्हणाली.

''तू माझ्या बंगल्यावर काम कर. घाबरू नकोस.'' धनजी म्हणाला.

''शेण पडो तुझ्या तोंडात !'' ती म्हणाली.

''गप्प.'' एक पोलीस म्हणाला.

''तुम्हाला येथे काम करायचे की नाही?'' अधिकाऱ्याने विचारले.

''ठरल्याप्रमाणे आधी मजुरी घ्या.''

''ते देतील ती मजुरी घ्या.''

''आम्ही घेणार नाही.''

''मग चालते व्हा येथून.''

''हे चाललो. याद राखा. मात्र सारा जिल्हा पेटेल.''

''इंग्रजांचे राज्य आहे अजून. आग विझवू आम्ही.''

ते आदिवासी गेले. पोलिसांनी दोघाचौघांना पकडले. मडकी, गाडगी घेऊन ते आदिवासी निघाले आणि गावोगाव बातमी गेली. सर्वत्र संप सुरू झाला. गवताला कोणी हात लावीना. कापलेले बांधीना. पाऊस पडला तर

आधीच कमी असलेले गवतही नाहीसे होईल. कापून बांधलेले गवत नेण्यासाठी बैलगाड्या मिळेनात. काही ठिकाणी आगी लागल्याच्याही बातम्या आल्या.

जमीनदार, गवताचे व्यापारी हेही स्वस्थ बसले नव्हते. पठाणांना हाताशी धरून, पोलिसांना हाताशी धरून एकदम एखाद्या गावी ते जात. तुला पैसे दिले होते, कामाला येतोस की नेऊ पकडून, अशा धमक्या देत. पोलीस, पठाण मारहाण करीत.

आणि शुक्री कुठे होती ? एके दिवशी धनजीभाईने तिला पकडून आणले. त्याच्या कोंडवाड्यात ती गाय सापडली. लांडग्याच्या तावडीत हरिणी सापडली.

''तू माझ्याकडे राहा. तो मंगळ्या तुला मारी, ताडी पिई. तू इथे रहा. तू माझी राणी; रानची राणी. तुला काही कमी नाही पडणार. पोटभर खायला, सुंदर पातळ. गुलाबाची फुले. रहा येथे शुक्र.'' असे तो म्हणाला. तिने त्याच्या हाताला कडकडून डासा घेतला. धनजी ओरडला. परंतु तो उंची दारू प्यायला होता. तो पशू झाला होता. त्याच्या पशुतेने तिच्या सतित्वाचा बळी घेतला.

दिवस जात होते. दंगल वाढणार असे वाटू लागले. सरकारने मध्यस्थी करावी असे कोणी म्हणू लागले.

त्या दिवशी एक सभा होती. सरकारी अधिकारी, जमीनदार, व्यापारी यांचे पुढारी, आदिवासींचे पुढारी, सारे एकत्र जमले होते. काही उदारवृत्तीचे सज्जनही होते. आदिवासी मंडळीत निरपेक्षपणे सेवा करणारेही काही होते. बोलणी सुरू झाली. मजुरीचा दर काय असावा, याविषयी चर्चा झाली. तो प्रश्न सुटला.

''आमच्या मायबहिणींची अब्रही यांनी घेतली आहे, त्याचे काय?''

म्हाताऱ्या बुध्याने विचारले.

''पुरावा आहे का?'' सरकारी अधिकारी म्हणाले.

''पोर झाल्यावर पुरावा.'' एक आदिवासी गंभीरपणे दुःखसंतापाने बोलला.

''या धनजीशेटने पाप केले की नाही विचारा. मंगळ्याची शुक्री याच्या पठाणाने पळवून नेली आणि एके दिवशी रानात तिला त्यानी सोडले. ती रडत होती. जीव देऊ पाहत होती. मंगळ्या तुरुंगात. असे हे इंग्रजी राज्य. आमची अब्रू सुरक्षित नाही. आम्ही का जनावरे ?'' म्हातारा बुध्या बोलत होता.

''मग आता म्हणणे काय?'' एक जमीनदार म्हणाला.

''न्याय हवा.'' बुध्या म्हणाला.

''शुक्रीला शंभर रुपये दंडाचे म्हणून धनजीशेटने द्यावे.'' अधिकारी म्हणाले.

''एखाद्या आदिवासीने जमीनदाराची बायको पळविली असती, तिला भ्रष्ट के ले असते तर त्या जमीनदाराच्या बायकोला शंभर रुपये दंड म्हणून आदिवासीने द्यावे असे तुम्ही म्हटले असते का ? त्या आदिवासीला तुम्ही पाच–सात वर्षांची शिक्षा दिली असती. आदिवासी भगिनींची अब्रू म्हणजे का चार दिडक्या ?'' एक आदिवासी सेवक म्हणाला.

''अहो, दंड एक रुपया की हजार हा प्रश्न नाही, पुष्कळ वेळा श्रीमंतांना एक पै दंड केल्याची उदाहरणे आहेत. त्या पैनेही त्यांची प्रतिष्ठा जाते. त्यांच्या कृत्यावर काही पांघरून घालीत नाही आपण. काय धनजीशेट ?'' अधिकाऱ्यांनी ऐटीत विचारले.

''मी तो बिलकूल निरपराधी. पाप नाही केला. सो रुपये द्या म्हणता,

देतो. परंतु ती शुक्रीच चावट. जंगलात म्हणायची, नवरा ठोकतो, ताडी पितो. तुम्ही सांभाळा. मी पीडा नको म्हटले तरी आली. तिला नेऊन सोडून दिले. या लोकांना खरेखोटे काही नाही. रानटी जात !'' धनजीशेट म्हणाले.

''जपून बोला.'' बुधा म्हणाला.

''काय जपून?'' धनजीशेट उसळून म्हणाला.

''रानटी आम्ही नाही, तुम्ही आहात. गरिबांच्या रक्तावर जगणारे, बायामाणसांची अब्रू घेणारे. तुम्हाला न्यायनीत नाही. दिल्या शब्दाची किंमत नाही, केलेल्या वायद्याची, कराराची कदर नाही. तुम्ही रानटी. बंगल्यात राहणारे, ब्रँडी पिणारे तुम्ही रानटी. आम्ही नाही रानटी. आम्ही देवाला भिऊन वागतो.'' बुध्या बोलला.

''जाऊ द्या. झाले- गेले विसरा. मग मजुरीचा नवा दर ठरवा ना? धनजीशेट, तुम्ही शंभर रुपये शुक्री किंवा मंगळ्या यांच्याकडे पाठवा. मंगळ्या वगैरे सारे सोडून देण्यात येतील. संप थांबवा. शांती राखा.'' अधिकारी म्हणाले.

आदिवासी गेले. बडी मंडळी बसली होती. खादीचा कार्यक्रम होता. चहा, फळफळावळ, बिस्किटे, चिवडा सारे होते.

''न्याय शेवटी वर्गदूषित असतो.'' आदिवासी सेवक म्हणाले.

''तुम्हीसुद्धा वर्गयुद्धाची भाषा बोलू लागलात? आश्यर्च.'' अधिकारी म्हणाले.

''धनजीशेटनी स्त्रीवर अत्याचार केला. तुम्ही त्यांना शंभर रुपये दंड करता,गरीबांच्या बायकांची तुमच्या न्यायदेवतेसमोर हीच का किंमत ? सर्वत्र हाच प्रकार. अमेरिकेत एखाद्या निग्रोने गोऱ्या स्त्रीला हात लावला तर, त्याला जिवंत जाळतात, परंतु निग्रो स्त्रियांवर गोऱ्यांनी अत्याचार केले तर ? त्यांना

होईल का फाशीची शिक्षा ? निदान तुरुंगात ५–१० वर्षे तरी पाठवतील का? ज्यांच्या हातात पैसा, त्यांच्यासाठी न्याय असतो. कायद्यासमोर सारे समान, हे झूट आहे. श्रीमंत पुन्हा वकील, बॅरिस्टर देईल, वाटेल ते सिद्ध करील. गरिबाला कायद्याचा सल्ला द्यायलाही कोणी नसते. हे सारे फोल आहे.'' ते सेवक म्हणाले.

''तुम्ही अजून खरे गांधीवादी नाही झाले.'' एक शेटजी म्हणाले.

''युद्धाच्या काळात ऑस्ट्रोलियन सोजिरांनी मुंबईत चावटपणा सुरू केला तेव्हा महात्माजींनी लिहिले की, हिंसाअहिंसेचा सवाल नाही. सतित्वाचे रक्षण झालेच पाहिजे ! मला गांधीवाद तुम्ही नको शिकवायला.'' ते आदिवासी सेवक म्हणाले.

नमस्कार झाले. सलाम झाले. साहेबजी प्रकार झाले.

शुक्री संचित असे. तिच्या तोंडावर अलीकडे कधी हसू दिसत नसे. गरीब लोक दुःखे उगाळीत कधी बसत नाहीत. एकप्रकारे संपूर्ण जीवन ते जगत असतात. दुःखाचा बाऊ करण्याची शिष्ट लोकांची पद्धत असते, गरीब दुःखांना महत्त्व देतील तर त्यांना जगताच येणार नाही. साधे फूल पाहून, एखादा सुंदर पक्षी पाहून, एखादा मासा मिळाला, एखादा ताडीचा द्रोण मिळाला तर लगेच दुःख विसरून ते हसतील, आनंदतील. मग शुक्री अशी का बरे ? वास्तविक तिचा स्वभाव आनंदी. ती अजून झाडांवर चढे, फांद्यावर झोके घेई. ती रानफुले आणी व केसात गुंफी. परंतु अलीकडे हा सारा खेळकरपणा पार लोपला. काय झाले ? तिच्या जीवनचंद्राला कोणते ग्रहण लागले होते ?

त्या दिवशी तिचा नवरा खुषीत होता. मंगळ्या शुक्रीकडे पाहून हसे. त्याला आनंद झाला होता. परंतु शुक्रीचे मन खिन्न नि उदासच होते. त्याच्या

श्री शिवछत्रपती वाचनालय
१०, अजिंक्य कॉलनी, कॅम्प सदरबझार
सातारा. पि. नं. ४१५००१

आनंदाचे प्रतिबिंब तिच्या तोंडावर उठेना, उमटेना. का बरे असे ?

''अग, हस की जरा ! मी हसतो आहे आणि तुझे तोंड का कोणी मेल्यावाणी? तुला किती दिवसांत मारले नाही म्हणून का राग ? दोन तडाखे देऊ म्हणजे हसशील? बायकांचे सारे न्यारे. त्यांना हसायला जावे तर त्या रडतात. त्यांना रडवायला जावे तर त्या हसतात. माज्या हातच्या थपडा तुला गोड वाडतात. होय ना? बोल की सटवे !''

शुक्री काही बोलली नाही. ती झोपडीतून उठून बाहेर गेली. शून्य मनाने ती कोठे तरी पाहत होती. मंगळ्या पाठोपाठ आला. एका झाडाखाली ती पाठमोरी बसली होती. त्याने हळूच जाऊन तिचे डोळे धरले.

''हे काय ? रडतेस तू ? झाले काय तुला ? अग, तुझे पोट मोठे पाहून मला मघासारखे हसू येत होते. माझा आनंद मनात मावत नव्हता. शुक्रीला बाळ होणार म्हणून मी खुशीत होतो. अशी रडतेस का ? तुला का चिंता वाटते ? त्या पाद्र्याच्या इस्पितळात तुला नेऊन ठेवू ? शुक्री, काळजी नको करूस. या झाडाला बाळासाठी झोका बांधू. त्याला आपण गाणी गाऊ. नको रडूस.''

असे म्हणून त्याने तिचे डोळ पुसले. दोघे तेथे होती. चांदणे पडले होते. दूर कुत्री भुंकत होती. पुन्हा शुक्रीचा हुंदका आला.

''अग, झाले काय तुला रडायला ?''

''तुम्हाला एक सांगायचे आहे.''

''काय?''

''तुम्ही ऐकाल ?''

''ऐकेन.''

''तुम्ही आठ–पंधरा दिवस कुठे तरी चालते व्हा.''

''का ?''

''म्हणजे मी नीट बाळंत होईन. तुम्ही याल तेव्हा घरात बाळ असेल.''

''माझी का तुला भीती वाटते ?''

''होय.''

''आणि येथे तू एकटी राहशील ?''

''राहीन.''

''कोणी धनजी आला तर ?''

''त्याचा प्राण घेईन.''

''त्या वेळेस का घेतला नाहीस ?''

''त्या वेळेसही आठवण राहील असा कडकडून चावा त्याला मी घेतला होता. दुष्ट, पाजी.''

''शुक्री, मी खरेच का जाऊ ? तुझ्या पोटात कळा येतील. कोण धीर द्यायला?''

''त्या कळा मला सुख देतील. त्यातून बाळ येईल.''

''तुला मुलगा होईल की मुलगी?''

''मी काय सांगू ?''

''त्याचा रंग कसा असेल ? काळा की गोरा ?''

''आपण दोघं काळी आहोत.''

''शुक्री, मी जाऊ ?''

''जा.''

आणि खरेच मंगळ्या निघून गेला. त्या जंगलात शुक्री एकटी होती. रात्र गेली. दुसरा दिवस उजाडला. ती झोपडीतच होती. काही कंद शिजवून तिने

खाल्ले. पाल्याची भाजी करून तिने खाल्ली. शेळीबकरीचे जणू जीवन.

तिच्या पोटात तिसरे प्रहर कळा येऊ लागल्या. ती तेथे विव्हळत होती. जवळ कोणी नाही. बाळ जन्मणार ? एका आजीबाईला तिने सारे विचारून ठेवले होते. बांबूचा चाकू करून तिने ठेवला होता. ती कण्हत होती. श्वास दाटे. जवळ कोणी नाही. तिकडे झाडावर वटवाघळे आवाज करीत होती आणि लांब कुत्रा भों भों करीत होता. शुक्रीचे लक्ष प्रसूतीकडे होते आणि बाळ जन्मले. गोरे गोरे बाळ. शुक्रीने किंकाळी फोडली. तिने ते बाळ तेथेच टाकले. ते ओरडू लागले.

***

आज तिसरा दिवस ! रात्रीची वेळ आहे. शुक्री उठली आहे. तिने हातात काहीतरी घेतले आहे. कुठे जाते आह ती ? थरथरत होती. एकाएकी तिच्या हातून काहीतरी खाली पडले. काय आहे ते ? सप्रमाण आहे की निष्प्राण आहे. ना आवाज, ना रडणे. ते मूल का सजीव नाही ? त्याच्या गळ्याला का कोणी नख लावले ? शुक्री, काय केलेस तू ?''

इतक्यात कोणीतरी येत आहे असे तिला वाटले. ती घाबरली. बॅटरीचा उजेड पडला. ते पोलीस होते. ती खाली वाकली. ते जवळ आले.

''कोण आहे ?'' कोणी दरडावले.

शुक्री रडू लागली. पोलिसांनी तिला घेतले.

''बाळ गेला माझा.''

पोलिसांनी त्या फडक्यातले मूल पाहिले. हे मृत मूल, गोरे गोरेपान मूल. पोलीस चकीत झाले.

''कोणाचे हे मूल ?''

शुक्री बोलेना. ती रडत होती, थरथरत होती.

''अग, कोणाचे हे मूल ?''

''माझे.''

''तुझे मूल? असे गोरे गोरे ? तुझा नवरा का गोरा आहे ?''

''हे मूल माझं; पण माझे नव्हे.''

''काय आहे ही कथा?''

''धनजीशेटना विचारा.'' ती रडू लागली.

''तू हे मूल मारलेस. खरे की नाही ?''

''मग जिवंत कसे ठेवू ? माझ्या बेअब्रूची ही खूण ! माझे लोक काय म्हणतील? माझ्या जातीत असले मूल नको. गोरे परंतु उद्या करणीने काळे होणारे. श्रीमंताची ही अवलाद. गरिबांचे रक्त पिणारे, त्यांचे हे बीज नको. नको हे मूल. मी कसे तोंड दाखवू ? मी देवाला आळवीत होते की काळे मूल जन्म दे. माझ्या पतीने मूल. परंतु हे धनजीचे पाप फळले. मला ते गाडू दे.''

पोलिसांनी तिला पकडले. ते मूल बरोबर घेतले. शुक्रीला अटक झाली. ती तुरुंगात होती. धनजीशेटने हजारो रुपये अधिकाऱ्यांना दिले. ते मूल पुरले गेले. मुलाचा पुरावा दूर करण्यात आला. शुक्रीवर मात्र खटला भरण्यात आला. हिने आपले मूल मारले असा तिच्यावर आरोप ठेवण्यात आला. शुक्रीला सात वर्षांची शिक्षा देण्यात आली.

मंगळ्या कुठे आहे ? तो सूडबुद्धीने पेटला आहे. धनजीशेटची खांडोळी करीन तरच नावाचा मंगळ्या ! अशी त्याने प्रतिज्ञा केली आणि एके दिवशी रात्री धनजीशेट आपल्या बंगल्याबाहेर अंगणात बसले होते. हातात फुले होती. मंगळ्या दारूने तर्र झाला होता. त्याच्या हातात कुऱ्हाड होती. तो आत आला. धनजीशेटच्या डोक्यात त्याने कुऱ्हाड घातली. एक भेसूर किंकाळी! पुन्हा घाव घालण्यात आला. धनजीशेट तेथे मरून पडले. घरातील

मंडळी धावून आली. गडी माणसे धावली. तिथला आकांत कोण वर्णील ?

***

मंगळ्याच्या खटल्याचा निकाल लागून त्याला फाशी देण्यात आली. तुरुंगातील फाशी कोठ्यात तो आहे. तो शांत आहे. एकदा शुक्री भेटली तर बरे होईल असे त्याच्या मनात येई. एके दिवशी त्याने तुरुंगाच्या अधिकाऱ्यास प्रार्थना केली. शुक्री त्याच तुरुंगातील औरतकोठ्यात होती. तिने सारी हकीगत ऐकली होती. तिने अन्न जवळजवळ वर्ज्य केले होते. तिच्या जीवनातील सारा आनंद निघून गेला होता.

फाशी कोठ्याच्या कोठडीत मंगळ्या बसला आहे आणि शुक्री बाहेर उभी आहे. सभोवती पोलीस आहेत.

''शुक्री, रडू नकोस ! त्या पाप्याने पापाचा पुरावा दूर करवून, बदनाम करून तुला शिक्षा देवविली. मी त्याचा सूड घेतला. मी सुखाने मरेन. तुझी वरती वाट पाहत बसेन. तेथे भेटू, हसू,खेळू, पूस ते डोळे. रानात जशी हसत हसत तशी एकदा हासू पाहू. तुझ्या प्रेमासाठी मी मरत आहे. मंगळ्याने तुला कधी थपडा मारल्या असतील त्या विसरून जा. शुक्री, एके दिवशी तुला झाडाला बांधून झोडपले. मी ताडी पिऊन आलो होतो. पशू बनलो होतो. परंतु दुसऱ्या दिवशी मी तुझे अंग चेपले, तू मंगळ्याचे वाईट विसर, भले ते आठव.'' त्याला बोलवेना.

''मी कशी जगू ? तुरुंगात मी तिकडे. तुम्ही इकडे. अशी राहिलो असतो तरीही थोडी आशा होती, परंतु तुम्ही कायमचे जाणार ? माझेही प्राण जावोत !'' असे बोलत शुक्री रडू लागली.

फाशी जायला दोन दिवस होते. शुक्रीने अन्न वर्ज्य केले. ती एक घास घेई व उठे, तिचेही का प्राण जाणार ? मंगळ्या मस्त होता, तो गाणी गुणगुणे.

तुझी माझी खरी प्रीत
जगाला मी नाही भीत
फासाचा दोर मला फुलांचा हार
लौकर ये वरती मला मिठी मार

शिपाई म्हणत, ''मंगळ्या, मरण जवळ आले. लेका. देवाचे नाव घे.''

''मी कशाला देवाचे नाव घेऊ? मी का पाप केले आहे? पाप करणाऱ्यांनी घ्यावे त्याचे नाव. मी शुक्रीचे नाव घेईन. आम्ही वर भेटू. ती जेवत नाही ऐकतो. माझ्या हातची थप्पड मिळाल्याशिवाय तिचे पोट भरत नाही. ती इथे कशी राहील?''

त्या दिवशी उजाडता त्याला बाहेर काढण्यात आले. क्षणात सारा खेळ खलास झाला आणि तिकडे औरतकोठ्यात शुक्रीही मरून पडली. ती अंथरुणावर त्या घोंगडीवर होती. परंतु तिला उठवायला जातात तो काय? तेथे निश्चेष्ट देह पडलेला होता. प्राणहंस निघून गेला होता. दोन पाखरे प्रेमाच्या राज्यात निघून गेली!

१३. रामकृष्ण

सायंकाळची वेळ होती. महालक्ष्मी स्टेशनात मी होतो. गाड्या भरून येत होत्या. जागा मिळेना घुसायला, दार धरून उभे राहायला. मला धैर्य होत नव्हते. जेव्हा मोकळी जागा मिळेल तेव्हाच गाडीत बसेन असे ठरवून मी एका बाकावर वळलो होतो. इतक्यात पंधरा-सोळा वर्षाचा एक तरुण मुलगा माझ्याकडे आला. त्याच्या अंगावर चिंध्या होत्या. त्याची ती उंच देहयष्टी कृश दिसत होती. त्याच्या डोळ्यात करुणा होती. त्याचे ते ओठ थरथरत होते. मी त्याच्याकडे बघत राहिलो. तो माझ्याकडे बघत होता. आम्ही एकमेकांच्या हृदयाला जणू भेटू पाहत होतो. तो माझ्या डोळ्यांत सहानुभूती शोधीत होता. मी त्याच्या डोळ्यांत प्रामाणिकता शोधीत होतो.

''दादा...'' त्याने शब्द उच्चारला.

''काय पाहिले तुला? का डोळ्यांत अश्रू?''

''मी बेकार आहे. मुंबईत पोटाला मिळावे म्हणून मी आलो. चार दिवस झाले. मी उपाशी आहे. चार आणे द्या. थोडे खाईन.''

''तु कुठला, कोण?''

मी दूरचा आहे. धामणी माझे गाव. घरी आईबाप आहेत. लहान भावंडे आहेत. परंतू खायला नाही. ना धंदा, ना मालकीची जमीन. नेहमी 'मुंबईला जा. पोटाला मिळव. उरले तर घरी आम्हाला पाठव.' असे बाप म्हणायचा. अखेर गाव सोडले नि मी येथे आलो. येथे ना ओळख ना देख. भटकत असतो.''

त्याला बोलवेना, मी चार आणे काढून त्याला दिले.

''अहो, फसवतात हे लोक.'' शेजारी उभा असलेला एक गृहस्थ म्हणाला.

''फसवू दे, मोठमोठे कारखानदार फसवीत आहेत. व्यापारी फसवीत आहेत. बडीबडी माणसे फसवीत आहेत. या मुलाने चार आण्यासाठी फसवले तर फसवले.'' मी म्हटले.

''अहो, दान सत्पात्री करावे, शास्त्र सांगते.'' ते गृहस्थधर्म सांगू लागले.

त्या मुलाचे डोळे त्या गृहस्थाला उत्तर देत होते. मला खलील जिब्रानचे शब्द आठवले. ईश्वराने आयुष्याची थोर देणगी द्यायला ज्याला पात्र ठरविले, तो तुझ्या दोन दिडक्या घ्यायला पात्र नाही का? या जगात ज्याचा उपयोग नसेल, त्याला विश्वशक्ती येथे राखील तरी कशाला?

''तुमचे उपकार.'' तो मुलगा म्हणाला.

''उपकार कसळे, बाळ?'' ज्याच्याजवळ आहे त्याने दुसऱ्याला देणे हा धर्म आहे. सारे विश्व म्हणजे कुटुंब ही भावना व्हायला हवी. तुझ्यासारखी सुंदर उमदी मुले, त्यांची अशी आबाळ व्हावी याहून अधर्म तो कोणता? कामाला तयार असणाऱ्यास जेथे काम मिळत नाही तेथे कोठून सुखसौभाग्य घेणार? ही सारी समाजरचना बदलायला हवी. समाजवाद आणायला हवा.'' मी बोलत होतो.

''समाजवाद म्हणजे थोताड!'' ते गृहस्थ म्हणाले.

दोन–तीन महिने गेले. दुपारची वेळ होती. मी चिंचपोक्ळी स्टेशनात गेलो. एका बाकावर एक तरुण निजला होता. तोच फाटका सदरा अंगात. तेच करुण मुखमंडळ. मी त्या मुलाला ओळखले. मी त्याच्याजवळ बसलो. त्याला थोपटावे असे वाटले. हा जेवला असेल का? असा मनात विचार आला आणि जेवला नसेल तर? मी माझ्या खिशात हात घातला. फ़क्त दोन आणे खिशात होते. मला वाईट वाटत होते.

इतक्यात एक जाडजूड गृहस्थ आले. तलम धोतर ते नसले होते. अंगात स्वच्छ, लांब कोट. गळपट्टीचा कोट. डोक्यावर एक श्रीमंती टोपी. हातात सिगरेट, बोटांतून अंगठ्या झळकत होत्या. पायांतील बूट नुकतेच पॉलिश केलेले चकाकत होते. ते गृहस्थ बाकाजवळ आले. त्यांच्या ऐसपैस देहाला बसायला बाकावर जागा नव्हती. कडेला त्यांना बूड टेकता आले असते.परंतू त्यांच्या प्रतिष्ठेचा तो अपमान झाला असता.

''उठ ए सोनेवाला, उठ जाव. ही का झोपायची वेळ आहे का? खुशाल झोपला आहे. उठकर बैठो.'' तो रुबाबदार मनुष्य गरजला.

''निजू दे त्याला. तुम्ही येथे बसा.'' मी म्हटले.

''अहो ही का झोपायची वेळ? रात्री चोऱ्या करतात, नि दिवसा झोपा काढतात. ही बाके जणू यांच्या बापाची इस्टेट!'' ते गृहस्थ बसल्या बसल्या बडबडत होते.

तो मुलगा उठून बसला. त्याने माझ्याकडे पाहिले. तो उभा राहिला.

''दादा, बसा तुम्ही.'' तो प्रमाने म्हणाला.

मी त्याच्याजवळ बसलो. त्याचे डोळे भरून आले होते.

''आज काही खाल्ले आहे का?'' मी विचारले.

''होय, दादा. मला एक गिरणीत काम मिळाले आहे. रात्री जातो कामाला. हळूहळू तेथे शिकेन. सध्या थोडेफार मिळते. घरीही दहा रुपये पाठवले. ज्या दिवशी मनिऑर्डर पाठवली, त्या दिवशी मला किती आनंद झाला होता सांगू.''

''कुठे राहतोस, कुठे झोपतोस?''

''असाच कुठेतरी राहतो नि झोपतो. स्टेशन हे घर. एखाद्या सार्वजनिक नळावर आंघोळ करतो, कपडे वाळवतो. स्टेशनात बाकावर येऊन पडतो. कधी राणीच्या बागेत बसतो. कारण स्टेशनात तरी कोण निजू देतो? अशी मोठी माणसे येतात. हजारो येणार... त्यांना जागा हवी. या मुलाला रात्रपाळी असेल, झोपायला जागा नसेल, थकून मागून येथे झोपला असेल, असा विचार कोण करणार दादा?''

तो मुलगा कसे बोलत होता म्हणून सांगू. साधे सरळ सत्यकथन. ना जगावर राग, ना रुसवा. स्टेशनात एक केळिविक्या बसला होता. पटकन् नि दोन आण्याची केळी घेवून आलो.

''घे.'' मी त्याला म्हटले.

''कशाला आणलीत?''

''दुसरे काय देऊ?''

''तुम्ही त्या दिवशी ते चार आणे दिलेत, तेच लाखोंच्या ठिकाणी होते. त्या दिवशी मी गळून गेलो होतो. तुम्ही अन्नदाते भेटलात. तुम्ही सारे काही दिलेत, सहानुभूती दिलीत, खरे ना? गरिबांबद्दल कुणाला आहे आस्था. कोण करतो त्यांच्या सुखदु:खांचा विचार? कधी संपलीत हे गरिबांचे हाल?''

''समाजवाद येईल तेव्हा.''

''कधी येईल?''

''तुम्ही आणाल तेव्हा. तो का आकाशातून पडणार आहे? तुझ्यासारख्या तरुण मुलांनी अभ्यास करायला हवा, संघटनेत सामील व्हायला हवे. कधी गावी गेलास तर तेथेही हे विचार न्यायला हवेत. खरे ना? आपल्यासाठी दुसरा कोण काय करणार?''

''तुम्ही मला सोपी पुस्तके द्याल?''

''तू किती शिकलास?''

''चार बुके शिकलो. वाचता येते.''

''जनवाणी वाच, साधना वाच.''

''तुम्ही कुठं भेटत जाल?''

मी त्याला माझा पत्ता दिला. इतक्यात गाडी आली.

''मी जातो. तुझे नाव काय?''

''रामकृष्णा.''

''तो. रामकृष्णा, सुखी रहा.''

''तुमचा समाजवाद येईल तेव्हा खरा सुखी होईन. मग सुखाचा प्रश्न सुटेल.'' तो मजकडे पाहून म्हणाला.

किंमत रु. ७५/-

अभिनंदन प्रकाशन

वितरक :
अभिनंदन बुक डेपो
१४९५, बी वॉर्ड, इंदुमती अपार्टमेंट, गुलाब गल्ली, मंगळवार पेठ, कोल्हापूर-१२.
दूरध्वनी : ०२३१-३२९६९०९, मो.: ९४२३०४१९६५